ISSN-0971-8397

विकास समर्पित मासिक

# योजना

वर्ष ४२ अंक १० पाने ५६ मे २०१५ मूल्य १० रु.

## पर्यटन क्षेत्र

पर्यटन, दारिद्रय आणि बारावी पंचवार्षिक योजना
संजय महाजन

वैद्यकीय पर्यटन - भारतातील नवीन उदयोन्मुख व्यवसाय
डॉक्टर हरिहरन

इ- पर्यटन व्हिसा- पर्यटनासाठी प्रवास आता आणखी सुखकर
श्रीमती नानू भसीन व श्रीमती नवनीत कौर

## विशेष लेख

भारतातील पर्यावरण पर्यटन: वन्यजीव भितरकणिका अभयारण्याचे उदाहरण
मधुमिता दास आणि बानी चॅटर्जी

## फोकस

भारतातील शैक्षणिक पर्यटन : इतिहास, वर्तमान आणि भविष्य
- अर्चना कुमारी आणि दिव्यांशु कुमार



मराठी मासिक

# योजना

## योजना घरी आणा.
## आजच वर्गणी भरा.




विकासाचे सर्व पैलू, सर्व सामाजिक प्रश्न आणि चालू घडामोडी प्रसिध्द करणारे योजना हे एकमेव मासिक आहे. या मासिकात सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांनी लिहिलेले अभ्यासपूर्ण व अचूक माहिती देणारे लेख असतात. त्यामुळे आपल्याला प्रत्येक क्षेत्रातील बिनचुक माहिती मिळते.

हे मासिक विद्यार्थीवर्ग व विद्वत्जनांचे आवडते आहे .स्पर्धात्मक परीक्षांना बसणाऱ्यांनी योजना वाचणे आवश्यक आहे. यातील माहिती साधारणत: इतरत्र प्रकाशित होण्याआधीच आपल्यापर्यंत येते.

## वर्गणीचे दर

| | |
|---|---|
| नियमित अंक मूल्य | १०.०० रुपये |
| विशेषांक | २०.०० रुपये |
| वार्षिक वर्गणी | १००.०० रुपये |
| द्विवार्षिक वर्गणी | १८०.०० रुपये |
| त्रिवार्षिक वर्गणी | २५०.०० रुपये |

वर्गणी, मनीऑर्डर
किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे संपादक,योजना (मराठी)यांचे नावाने
७०१, ''बी'' विंग (७ वा मजला) केन्द्रीय सदन,
बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
या पत्त्यावर पाठवावी.

**वर्गणी मनीऑर्डरने पाठविताना आपले नाव व पत्ता कूपनमध्ये सुवाच्य अक्षरात लिहा.**

विक्रीचे ठिकाण : ७०१ सी, ७०१बी , केंद्रीय सदन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४

योजना मासिक भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे प्रसिध्द केले जाते.

# योजना

## विकास समर्पित मासिक

❖ वर्ष ४२ ❖ ❖ अंक १० ❖ ❖ मे २०१५ ❖ ❖ मूल्य १० रु. ❖

मुख्य संपादक
**दिपीका कांचल**

संपादक
**भावना गोखले**

मुखपृष्ठ
**जी.पी. धोपे**

**'योजना' हे निती आयोगाच्या वतीने, केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे हिंदी, इंग्रजी, मराठी, गुजराती, कन्नड, तेलुगू, पंजाबी, उर्दू, बंगाली, तमिळ, मल्याळम, उडिया व आसामी भाषांतून प्रकाशित होते. देशाच्या सर्वांगीण विकासाची खुली चर्चा करणारे ते व्यासपीठ आहे. 'योजना'त प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील मते त्या त्या लेखकांची असतात.**

**योजना वर्गणीचे नवे दर**

| | | |
|---|---|---|
| **वार्षिक** | : | रू. १०० |
| **किरकोळ किंमत** | : | रू. १० |
| **शेजारी राष्ट्रे (एअरमेल) वार्षिक** | : | रू. ५३० |
| **युरोप व अन्य राष्ट्रे (एअरमेल) वार्षिक** | : | रू. ७३० |

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| **भारतातील शैक्षणिक पर्यटन : इतिहास, वर्तमान आणि भविष्य** | - अर्चना कुमारी आणि दिव्यांशु कुमार | ५ |
| **पर्यटन, दारिद्र्य आणि बारावी पंचवार्षिक योजना** | - संजय महाजन | १० |
| **पर्यटन शैक्षणिक संस्थाचे माहेर घर 'गोवा'** | - भावना गोखले | २० |
| **भारतातील पर्यटन क्षेत्राचा आढावा - उत्कृष्ठ पर्यटन विकास** | - रत्नदीप बॅनर्जी | २६ |
| **वैद्यकीय पर्यटन - भारतातील नवीन उदयोन्मुख व्यवसाय** | - डॉक्टर हरिहरन | ३४ |
| **इ- पर्यटन व्हिसा- पर्यटनासाठी प्रवास आता आणखी सुखकर** | - श्रीमती नानू भसीन व श्रीमती नवनीत कौर | ४० |
| **भारतातील पर्यावरण पर्यटन: वन्यजीव भितरकणिका अभयारण्याचे उदाहरण (विशेष लेख)** | - मधुमिता दास आणि बानी चॅटर्जी | ४४ |
| **पर्यटन व्यवसाय क्षेत्र : महिला उद्योजकता स्वप्नपूर्तीसाठी पर्यटन व्यवसाय एक नामी संधी** | - डॉ.अंजली कदम - नारायणे | ५१ |


योजनेसाठी लेख, वर्गणी, जाहिरात इ. सर्व पत्रव्यवहारासाठी पत्ता :
**योजना मासिक कार्यालय**
७०१, 'बी' विंग (७वा मजला), केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. दुरध्वनी - योजना -२७५६६५८२
email - myojanadpd@gmail.com

# संपादकीय

## केल्याने देशाटन

''जग पुस्तकासारखे आहे व जे प्रवास करीत नाहीत ते फक्त पुस्तकाचे एक पान वाचतात''. असे सुचवत सेंट ऑगस्टिनने प्रवासाचा आशय एका वाक्यात मांडला आहे. सतत काही तरी नवीन घडत असलेल्या भारतात पर्यटकांना आपली निवड करण्यासाठी अनेक कारणे पुरवितो. निसर्ग सौंदर्य, ऐतिहासिक वास्तू, वारसा, तेजस्वी रंग, संस्कृती, खाद्य संस्कृती, तीर्थक्षेत्रे ह्या सर्वातील विविधता ह्यात अफाट पर्यटन क्षमता आहे. गेल्या काही वर्षांत शैक्षणिक, वैद्यकीय, साहसी, ग्रामीण व पर्यावरणीय पर्यटन यांसारख्या नव्या पैलूंचा भारतीय पर्यटन उद्योगात समावेश झाला आहे. फक्त आंतरराष्ट्रीयच नाही तर देशांतर्गत पर्यटनानेही उंच भरारी घेतली आहे. अलिकडे उपलब्ध झालेल्या महितीनुसार गेल्या दशकभरात भारताने एकूण जीडीपीच्या ६.६ टक्के योगदान देत पर्यटन क्षेत्रात लक्षणीय वाढ केली.

जगभरातील पर्यटन व्यवसायाने सेवायोजन निर्मिती, विदेशी चलन स्रोत व आर्थिक अभिवृद्धी यात महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. ऐश्वर्यसंपन्न वैविध्यपूर्ण संस्कृती, निसर्ग, ऐतिहासिक वारसा, चहल-पहलयुक्त बाजारपेठा, पारंपारिक आतिथ्य, या पर्यटनाला उपयुक्त बाबी भारतात पुरेशा प्रमाणात आहेत. फक्त ते आकर्षक पद्धतीने ग्राहकांसमोर मांडणे आवश्यक आहे. कोणत्याही देशातील पर्यटन उद्योग समृद्ध होण्यासाठी स्पर्धात्मक पातळीवर पायाभूत सोयीसुविधा, राहण्याच्या जागा, वाहतूकीच्या सोयी व मनोरंजन यांची आवश्यकता असते. तेव्हा केंद्र व राज्य शासनापासून उद्योजक व संपूर्ण समाज ह्या सर्वांची भूमिका त्यात महत्त्वाची ठरते.

शासकीय धोरणांमुळे या क्षेत्राला चालना मिळून अभिवृद्धीचे सुलभीकरण होण्यासाठी संदर्भ चौकट तयार केली जाते. त्यामुळे पर्यटकांचा ओघ वाढविण्यासाठी आखलेली मार्गदर्शक तत्त्वे व धोरणे ह्यांचा योग्य अर्थ लागण्यास मदत होते. त्याचप्रमाणे शासकीय धोरणांमार्फत स्रोत संधी व रोजगार संधी पुरवल्या जातात. केंद्र शासनाचे ध्येय २०१६-१७ सालच्या अखेरपर्यंत एक टक्का आंतरराष्ट्रीय पर्यटक मिळवणे हे आहे. अलिकडच्या काळात जगातील ४४ देशांत 'आगमनानंतर व्हिसा' ही योजना राबवण्यात आली. येत्या काळात हा आकडा १०६ पर्यंत वाढवण्याचा प्रयत्न सुरू आहे, सहल आयोजक, निवडक हॉटेल्स यांची माहिती देणारे मोबाईल ॲप व अतिथ्य संस्थेचे ई-व्यवस्थापन ही ह्या दिशेने नेणारी महत्त्वाची पाऊले असतील. 'स्वदेश दर्शन' सारखी विषयाधारित परिपथाचा विकास करणारी योजना, सर्वधर्मीय तीर्थस्थानांचे पुनरुज्जीवन आणि वाढ प्राप्त करण्यासाठी राष्ट्रीय मिशन, तीर्थक्षेत्रांची सुधारणा व सौंदर्यीकरण यासाठी 'प्रसाद', ह्याद्वारे २०१६-१७च्या अखेरीस १४५ कोटी देशांतर्गत पर्यटकांची वाढ अपेक्षित आहे. याशिवाय ''हुनर से रोजगार तक'' व ''हुनर जायका" आदी कार्यक्रमांच्या अमंल बजावणीमुळे रोजगार निर्मितीचा उद्देश साध्य केला जात आहे.

असे असले तरी उद्योजकाला दृष्टी व गुणवत्तेच्या आधारावर या योजनांमध्ये आर्थिक मूल्य जोडून त्याचा समाजाच्या भल्यासाठी व त्यांच्या स्वत:च्या आर्थिक सुबत्तेसाठी उपयोग करून घेता येईल. पर्यटन उद्योगातील संबंधित सर्व क्षेत्रांमध्ये व्यवसायाच्या दृष्टीने वाहतूक, राहण्याची व्यवस्था व खाद्यपेय व्यवस्था, प्रवास पॅकेज, मनोरंजन इत्यादी सारख्या व्यावसायिक उपक्रमांचा सहभाग असतो. अभिनव व अपारंपरिक पर्यटन स्थळे शोधणे, आतापर्यंत प्रकाशात न आलेल्या स्थळांचा प्रसार हीच यशस्वी उद्योजकता व भारतीय पर्यटनाच्या शाश्वततेची गुरुकिल्ली आहे.

''अतिथी देवो भव" या भारताच्या विचारप्रणालीनुसार पर्यटक पाहुणे व समाज यजमानाच्या भूमिकेत असतात. तथापि याचे दूरगामी चित्र पाहता समाज दोन प्रकारची कामे करतो सेवा पुरवठादार व अंतिम लाभाधिकारी. पर्यटन समाजाची समावेशक अभिवृद्धी वाढवण्यासाठी सुयोग्य वाहनाचे काम करते आणि गरिबी कमी करण्यासाठी व विकासासाठी सकारात्मक अंशदान देते. आयुष्य बदलण्याची व दृष्टिकोनात बदल करण्याची क्षमता पर्यटन उद्योगात आहे. तथापि या उद्योगाने पर्यावरण व समाजाची हानी न होऊ देता काळजीपूर्वक व सातत्याने खताची वाढ करणे आवश्यक आहे. विधायक दिशा देण्यासाठी पर्यटकांची व यजमान समाजाची सुरक्षा, सुरक्षितता व सकारात्मक दृष्टिकोन हे महत्त्वाचे घटक आहेत.

भारतातील पर्यटन क्षेत्राचे भविष्य नक्कीच उज्ज्वल आहे परंतु तरीही बराच मोठा पल्ला अजून गाठायचा आहे.

लाओ त्सू या तत्ववेत्त्याने म्हटल्याप्रमाणे एक पाऊल टाकून हजारो मैलांचा प्रवास सुरू करता येतो, आणि अलिकडे क्षेत्रीय विकासाच्या माध्यमातून आपण ते पहिले पाऊल आधीच उचलले आहे. विविध क्षेत्र बघण्याची इच्छा आणि पर्यटनाचे उद्दिष्ट ठरविले तरचं देशाटन होऊ शकते.

# भारतातील शैक्षणिक पर्यटन : इतिहास, वर्तमान आणि भविष्य

**- अर्चना कुमारी आणि दिव्यांशु कुमार**



**भारतातील प्राचीन विद्यापीठांमध्ये तक्षशीला, नालंदा आणि विक्रमशींग विद्यापीठे फारपुर्वीपासुन आंतरराष्ट्रीय पर्यटकांसाठी आकर्षक शैक्षणिक केंद्रे होती. विविध विकास, तंतज्ञान व संशोधनाच्या आधारावर जगातील इतर प्रमुख देशांनी त्यांची पर्यटन स्थळे विकसीत केली आहेत. भारतात बदलत्या काळानुरूप आवश्यक बदल आत्मसात करण्याची विविध राज्यांची कल्पकता वाखणण्या जोगीअसुन विदेशी पर्यटकांना आकर्षित करणे तसेच देशांतर्गत विद्यार्थ्यांचा विदेशी शिक्षणाचा ओघ कमी करणे ही प्रमुख कारणे यामागे आहेत. पर्यटन विकासाच्या केवळ गोष्टी न करता पर्यटनाचे दुष्परिणाम, त्यावरील उपाययोजना, विपरीत कारणांवर अंकुश आणि निखळ शैक्षणिक पर्यटनाला प्रोत्साहन हे जमले तर पर्यटनाबरोबरचं संबंधित इतर क्षेत्रांचा विकास होण्यास मदत होईल.**

दक्षिण आशियाई देशांमध्ये भारत हा प्राचीन काळापासूनच शिक्षणाचे अत्यंत महत्वाचे केंद्र राहिला आहे. तक्षशीला विद्यापीठ, नालंदा मानाची आणि विक्रमशीला विद्यापीठ ही त्याची प्रतीके राहिली असून ज्ञान संपादन व वितरणासाठी अंतरदेशीयच नव्हे तर परदेशी प्रवाशांसाठीही भेट देण्यासाठी सर्वाधिक पसंतीची ठिकाणे राहिली आहेत. शैक्षणिक पर्यटनाचे प्रमुख केंद्र म्हणून हा वैभव संपन्न वारसा लाभलेला असूनही भारत आज प्रमुख शैक्षणिक केंद्र म्हणून स्वत:ला जगापुढे आणण्यासाठी झगडतो आहे. तरीही पर्यटन आणि शिक्षण क्षेत्रातील प्रचंड विकासामुळे संपूर्ण जगासाठी आणि विशेषत: शेजारी देशांसाठी प्रशंसापात्र शैक्षणिक पर्यटन केंद्र म्हणून उदयास येण्याची मोठी क्षमता भारतात आहे.

या मुद्यावर अधिक लक्ष केंद्रित करण्यापूर्वी प्रथम शैक्षणिक पर्यटन म्हणजे काय ते समजून घ्यायला हवे. शैक्षणिक पर्यटन किंवा एज्यु टुरिझम याचा अर्थ कोणताही असा कार्यक्रम ज्यात सहभागी झालेल्या लोकांचा प्राथमिक उद्देश्य त्या स्थळाशी थेट संबंधित असा शैक्षणिक अनुभव घेण्याचा असतो. (बोजर, १९९८, पृ.२८) शैक्षणिक उद्देश्यासाठी फिरण्याची ही संकल्पना नवी नाही आणि काही महान विचारवंतांच्या मते तर पर्यटन बाजारपेठेत तिची लोकप्रियता आणखी वाढण्याचीच अपेक्षा आहे. (गिब्सन १९९८, होल्डनॅक आणि हॉलंड, १९९६) देशांतर्गत आणि जागतिक स्तरावर शिक्षण क्षेत्रातील आपला महत्वाचा वाटा भारतानेही ओळखला असून सर्व जगभरातील विद्यार्थ्यांसाठी भारत आकर्षक ठिकाण म्हणून स्वत:ला सादर करण्याची संधी पडताळून पाहत आहे. भारताच्या दृष्टीने यासाठी काही अनुकूल घटक असे आहेत.

- भारत जगातील सर्वाधिक जलद गतीने विकसित होणारी अर्थव्यवस्था आहे.
- प्रमुख पर्यटन केंद्र म्हणून भारत उदयास येत आहे.
- भारतात राहणे हे कित्येक विकसित देशांपेक्षा खूपच स्वस्त आहे.
- सर्व प्रकारची साधनसंपत्ती आणि सुविधा असलेल्या अनेक चांगल्या शैक्षणिक संस्था भारतात आहेत.
- विकसित देशांना कुशल मनुष्यबळ पुरवणारा भारत हा प्रमुख पुरवठादार देश आहे.

भारतातील शैक्षणिक पर्यटनासाठी अनुकूल घटकांवर तपशीलात चर्चा करण्याआधी, प्राचीन काळात भारताला सर्वात उत्तम शैक्षणिक पर्यटन केंद्र बनण्यासाठी कोणते घटक लाभदायक ठरले, हे पाहू या.

### वैभवशाली इतिहास

वैभवाला चढलेल्या तक्षशीला आणि नालंदा विद्यापीठांशिवाय भारतात त्या काळात इतरही अनेक विद्यापीठे होती. त्यापैकी काही म्हणजे बिहारमधील ओदंतपुरी (५५०-१०४०), बांगलादेशातील सोमापुरा मौर्य (गुप्त कालापासून मुघलांच्या राजवटीपर्यंत), बंगालमधील जगढ़द्दाला( पाल राजवटीपासून ते मुघल राजवटीपर्यंत), आंध्रप्रदेशातील नागार्जुनकोंडा, बिहारमधील विक्रमशीला (८०० ते १०४०), आजच्या काश्मीरमधील शारदापीठ, गुजरातमधील वलभी (मैत्रक कालापासून ते अरबी धाडीपर्यंत), उत्तरप्रदेशातील वाराणसी (आठव्या शतकापासून ते आजतागायत), तामिळनाडूतील कांचीपुरम, कर्नाटकातील मान्यखेता, ओडिशातील पुष्पागिरी, रत्नागिरी, श्रीलंकेतील बौद्ध धर्म शिक्षणाचे सुनेत्रादेवी पिरीवेन्ना केंद्र १४१५ ए.डी. मध्ये स्थापन झाले होते.

मात्र, वरील सर्व विद्यापीठांमधील सर्वात लोकप्रिय आणि प्रतिष्ठेची केंद्रे म्हणजे तक्षशीला (इसवी सन पूर्व पाचवे शतक ते इसवी सन पाचवे शतक) आणि नालंदा विद्यापीठे (सन ४२७ ते ११९७) हीच होती. भारताच्या तीन महान व्यक्तींसाठी तक्षशीला विद्यापीठ प्रसिद्ध होते त्या म्हणजे चाणक्य, चंद्रगुप्त आणि चरक. अर्थशास्त्र आणि राजकारणावरील प्रसिद्ध पुस्तक अर्थशास्त्र हे चाणक्याने येथेच लिहीले, असे मानले जाते. भारताचा महान सम्राट चंद्रगुप्त येथेच शिकला आणि प्रसिद्ध चरक संहिता लिहीणारा चरक हा आयुर्वेदशास्त्रज्ञाने तक्षशीला विद्यापीठात अभ्यास केला होता.

साधारणपणे सोळाव्या वर्षी तक्षशीला विद्यापीठात विद्यार्थी प्रवेश करत असे. न्यायशास्त्र, वैद्यकीय शास्त्र आणि लष्करी प्रशिक्षणाशिवाय तिरंदाजी, शिकार आणि हत्तीविद्या यासारख्या कौशल्यांचा समावेश असलेल्या अठरा कला आणि वेदांचे शिक्षण दिले जाई. तक्षशीला हे वैदिक शिक्षणाचे केवळ पीठ होते असे नव्हे तर बौद्ध परंपरेतील ते अत्यंत महत्वाचे स्थळ आहे, कारण महायान हा पंथ येथेच उदयाला आला, असे मानले जाते. (२)

एकाच छताखाली सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन त्यांना विविध शास्त्रांचे शिक्षण देण्याचे हे एकमेव वैशिष्ट्य जगातील सर्व भागातून ज्ञान संपादन करू इच्छीणाऱ्यांसाठी आकर्षण होते, असे दिसते. त्या काळात सर्व शेजारच्या बौद्ध देशांना तीर्थयात्रा आणि बौद्ध तत्वज्ञानाचा अभ्यास करण्यासाठी भारताला भेट देणे अत्यावश्यक वाटत असे. अशा धार्मिक शिक्षणासोबतच लोकप्रिय कौशल्येही या विद्यापीठात शिकवली जात असल्यामुळे विद्यापीठाचे शैक्षणिक मूल्य आणखी वाढण्यास हातभार लागत असे.

याच परिस्थितीत नालंदा विद्यापीठाचीही भरभराट होत होती. मगध राजवट संपूर्ण भारतात होती आणि बुद्धीवादाच्या केंद्राचे आश्रयदाते राहण्यावर बौद्धिक साम्राज्याचा विश्वास होता. या केंद्रातही पुन्हा बौद्ध आणि बिगरबौद्ध तत्वज्ञान पूर्णपणे शिकवले जात असे, जे समग्र ज्ञानाची निर्मिती करणारी भूमी म्हणून समोर आले होते. ऐतिहासिक सूत्रांनुसार, या विद्यापीठात २,००० शिक्षक व १०,००० विद्यार्थी असत.(३)

या विद्यापीठातील ज्ञानदानाची पद्धती आणि शिक्षकांचे सखोल ज्ञान यामुळे चीन, कोरिया, जपान, तिबेट, मंगोलिया, तुर्कस्थान, श्रीलंका आणि अन्य काही आग्नेय आशियाई देशांतील विद्यार्थी आकर्षित होऊन येत असत. विद्यापीठातील वातावरण, तेथील शिकवण्याची पद्धती, अनोखे स्थापत्य आणि जीवनशैली याबद्दल विद्यार्थी भरभरून बोलत असत. विशेषत: चीनी विद्वान युआन श्वांग याने विद्यापीठातील जीवनाचे बारकाईने वर्णन करून ठेवले आहे.(४)

जेव्हा प्रवास आणि संदेशवहन दोन्हीही अत्यंत कठीण होते, त्या काळात जगभरातील शैक्षणिक पर्यटकांना आकर्षून घेणाऱ्या भारतातील जगप्रसिद्ध विद्यापीठांबाबत वर उल्लेख केलेल्या घटकांचे विश्लेषण केल्यावर या विद्यापीठांच्या आकर्षणाबाबत काही महत्वाचे मुद्दे समोर येतात.

- भारत हा बहुधार्मिक आणि बहुसांस्कृतिक देश असल्याने धार्मिक व सांस्कृतिक अभ्यासासाठी नेहमीच आकर्षण केंद्र राहिला आहे.
- केवळ अभ्यासच नव्हे तर संस्थांतर्गत वातावरण, शिकवणे आणि शिकण्याची अनोखी पद्धती, निसर्गाबरोबर सहजीवन यामुळेही देश तसेच परदेशांतूनही शैक्षणिक पर्यटक येत असत.
- विविध राज्यकर्त्यांच्या राजवटीत दीर्घकाल ही विद्यापीठे अस्तित्वात

असल्याने त्यांची प्रसिद्धी आणि कौशल्य कितीतरी पटींनी वाढले.

## धूसर वर्तमान

भारतात पर्यटन विशाल उद्योग म्हणून उदयाला आला आहे. पर्यटन मंत्रालयाच्या वार्षिक अहवालानुसार, २०१२-१३ मध्ये पर्यटनाचे जीडीपीतील योगदान ६.८८ टक्के राहिले असून याच वर्षी रोजगारातील योगदान १२.३६ टक्के राहिले आहे. (५) १९९० ते २०११ या कालावधीत पर्यटनाचा जीडीपीतील वाटा २२९ टक्क्यांनी वाढला असून या दशकात या क्षेत्राची वाढ दरवर्षी ७.७ टक्के होईल, असे भाकित आहे. (६) वर्ल्ड ट्रव्हल अँड टुरिझम कौन्सिलने २०११ मध्ये वर्तवलेल्या अंदाजानुसार, २०११ ते २०२१ या दशकात दरवर्षी ८.८ टक्के इतकी वाढ होईल. (७) यामुळे जगभरातील सर्वात जलद गतीने विकसित होणाऱ्या पर्यटन उद्योगात भारताचा पाचवा क्रमांक लागला आहे.

तरीही भारतातील सर्वात झपाट्याने वाढणाऱ्या पर्यटन क्षेत्रात शैक्षणिक पर्यटनाचे स्थान काय आहे, हा प्रश्न उरतो. या प्रश्नाला हात घालण्यापूर्वी आपण आर्थिक सहकार्य व विकासविषयक संघटनेच्या (ओईसीडी) दृष्टीक्षेपात शिक्षण २०१४ या अहवालतील तथ्यांचा अभ्यास करु या.

- जगभरात परदेशी विदयार्थी ५३ टक्के आशियाई विद्यार्थी शिक्षणासाठी नाव नोंदवतात. उपखंडातील सर्वाधिक विद्यार्थी हे भारत, चीन व कोरिया या देशांतील आहेत.
- आपला देश सोडून परदेशात शिक्षण घेण्यासाठी पसंतीचे स्थळ म्हणून युरोप सर्वोच्च स्थानी असून ४८ टक्के विद्यार्थी येथे शिकतात तर त्याखालोखाल उत्तर अमेरिकेचा क्रमांक लागतो जेथे २१ टक्के परदेशी विद्यार्थी शिक्षण घेतात तर आशियात १८ टक्के परदेशी विद्यार्थी आहेत.
- गेल्या तीन दशकांत आपला मूळ देश सोडून परदेशी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रमाणात नाट्यपूर्णरित्या वाढ झाली असून १९७५ मध्ये ८ लाख असलेले प्रमाण २०१२ मध्ये ४० लाख ५० हजारावर गेले असून ही पाच पट वाढ आहे.

वर उल्लेख केलेल्या तथ्यांवरून असे स्पष्ट होते की, आशिया प्रदेश आणि भारत देश हा शैक्षणिक पर्यटनाचे ठिकाण न राहता मूलस्थान आहे. विद्यार्थ्यांसाठी युरोप हे शिक्षणासाठी सर्वोच्च आवडते ठिकाण का आहे, याची कारणमीमांसा केल्यावर असे आढळले की - युरोपीय समुदाय ज्याप्रमाणे आकार घेत आहे त्याप्रमाणे त्या देशांमधील शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय संबंधांना प्रोत्साहन देण्यात असलेले स्वारस्य, क्रमिक शिक्षणासाठी जागतिक प्रवेशाच्या संधींमध्ये झालेली महत्वपूर्ण वाढ आणि स्वस्त झालेला प्रवासखर्च यामुळे हा असामान्य विस्तार झाला आहे.

विद्यार्थ्यांची जागतिक स्तरावर इतकी हालचाल होण्यामागे आणखी एक निरीक्षण नोंदवण्यात आले आहे. आंतरप्रादेशिक विस्थापनाच्या आकृती बंधाबरहुकूम (pattern)विस्थापन घडते. ओईसीडी देशांमध्ये दर्जेदार शिक्षणासाठीच्या नावनोंदणीच्या आंतरराष्ट्रीयीकरणात झालेली वाढ तसेच प्रदेशाप्रदेशांमध्ये शिक्षणासाठी विद्यार्थ्यांचे वाढलेले येणेजाणे यावरून जागतिक स्तरावरील गतिशीलतेपेक्षा प्रादेशिक पातळीवरील गतिशीलता जास्त महत्वाची असते, हेच दिसते. युरोपीय देश, पूर्व आशिया आणि सागरी प्रदेशांमध्ये विद्यार्थ्यांचा वाढता ओघ हा आशिया-पॅसिफिक देशांमध्ये निर्माण होत असलेली जवळीक आणि युरोपीय समुदायातील देशांचे समुदायाबाहेरील देशांशी वाढते सहकार्य अशा भूराजकीय उक्रांती प्रतिबिंबित करतो. (युनेस्को,२००९)

आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या प्रमाणात भारताचा क्रमांक जगात दुसरा आहे. (५.८ टक्के) ४५ टक्के भारतीय विद्यार्थ्यांनी अमेरिकेत शिक्षणासाठी नाव नोंदवलेले आहे, युनायटेड किंग्डममध्ये १७ टक्के, कॅनडात ६ टक्के तर ऑस्ट्रेलियात हे प्रमाण ५ टक्के आहे.

सर्वसाधारणपणे जगातील व विशेषत: भारतातील शैक्षणिक पर्यटनाच्या सध्याच्या चित्राबद्दल वर उल्लेख केलेल्या घटकांचे विश्लेषण केले असता खालील मुद्दे समोर आले आहेत.

- सध्याच्या शैक्षणिक पर्यटनाच्या परिस्थितीवरून ५.८ टक्के विद्यार्थी आपल्या देशात शिक्षण घेण्याऐवजी परदेशात शिक्षणासाठी जातात आणि त्यामुळे देशांतर्गत पर्यटनाला फटका बसतो.
- जागतिक स्तरावरील गतिशीलतेपेक्षा विद्यार्थी प्रादेशिक गतिशीलतेला प्राधान्य देतात.

- कोणत्याही देशात शैक्षणिक पर्यटन वाढीसाठी देशादेशांमधील शैक्षणिक, सांस्कृतिक,सामाजिक आणि राजकीय संबंध मजबूत करण्याला प्रोत्साहन देणे, एकमेकांच्या देशात जाण्यासाठी प्रवास खर्च स्वस्त ठेवणे आणि सुलभ व्हिसा प्रक्रिया हे सर्वात पोषक तत्वे आहेत.

अशा तऱ्हेने, परदेशाच्या दिशेने निघालेल्या शैक्षणिक पर्यटनाबाबत धूसर चित्र यामुळे पुढे येत असले तरीही भारतात देशांतर्गत शैक्षणिक पर्यटन प्रदीर्घ कालापासून आहेच. पर्यटन मंत्रालयाने २०१५ मध्ये सादर केलेल्या अहवालानुसार, २०१३ मध्ये देशांतर्गत शैक्षणिक पर्यटनासाठी भेट देण्याचे प्रमाण ११४५ दशलक्ष (अंदाजे) इतके असून २०१२ पेक्षा ही वाढ ९.५९ टक्के इतकी होती. ग्रामीण भाग आणि लहान शहरांतील पालक आपल्या मुलांना अधिक चांगल्या शैक्षणिक सुविधांसाठी मोठ्या शहरांमध्ये पाठवतात. ते ही लोकांच्या आर्थिक क्षमतांवर अवलंबून असते. मात्र आपण जेव्हा भारतातील शैक्षणिक पर्यटनाबाबत बोलतो तेव्हा शैक्षणिक उद्दिष्टांसाठी प्रमुख पर्यटन केंद्र म्हणून उदयास येत असलेला विकसनशील भारत अभिप्रेत असतो. भारत सरकारने संभाव्य क्षमतेची जाणीव न करुन घेता शैक्षणिक पर्यटनाची ओळख केली.

## आश्वासक भविष्य

शैक्षणिक पर्यटनाला अनुकूल अशा अनेक तथ्यांवर जागतिक अहवालांनी प्रकाश टाकला आहे. हेच घटक भारतातही मोठ्या प्रमाणावर आहेत, ज्यामुळे शैक्षणिक पर्यटनाची भरभराट होण्याचा आशेचा किरण दिसतो. अगदी पर्यटन मंत्रालयाच्या २०१५ च्या वार्षिक अहवालातही असे म्हटले आहे की, अन्य नागर संस्कृतीशी भारताचे आलेले संबंध भाषा, आहार, परंपरा, कला आणि हस्तव्यवसाय यांच्या माध्यमातून येथील लोकांच्या सांस्कृतिक वैविध्यात प्रतिबिंबित झालेले आढळतात. अलिकडील काही वर्षांत भारतात परदेशी पर्यटकांच्या प्रमाणात प्रभावी वाढ झाली असली तरीही भारताकडे अद्याप मोठ्या प्रमाणावर क्षमता आहे, जी वापरली गेलेली नाही.

## भारतातील शैक्षणिक पर्यटनासाठी साधनसंपत्तीचा पाया

शैक्षणिक पर्यटनासाठी आधार म्हणून वापरता येण्याजोगी विपुल प्रमाणातील पर्यटन साधनसंपत्ती भारताकडे आहे. त्यापैकी काही घटक असे आहेत : सांस्कृतिक अथवा ऐतिहासिक पर्यटन, पर्यावरणीय अथवा निसर्गाधारित, ग्रामीण, वैद्यकीय पर्यटन आदी.याबरोबरच विद्यापीठातील काही विद्यार्थी आणि शिक्षक आदानप्रदान कार्यक्रम ज्यामुळे परदेशी विद्यार्थी आणि शिक्षक भारतात काही काळ व्यतीत करू शकतात. शैक्षणिक पर्यटनासाठी पुढील पैकी काही कल्पना राबवता येतील : सांस्कृतिक आणि ऐतिहासिक संकल्पनांमध्ये कला आणि हस्तकला, स्थापत्य, भाषा, पुरातत्व स्थळे, संगीत, नृत्य आदी.पर्यावरणीय पर्यटनात ३५० सस्तन प्राणी, ४०८ सरपटणारे प्राणी, १९७ उभयचर प्राणी, १२४४ पक्षी, २५४६ प्रकारचे मासे यासह प्राण्यांच्या ६५,००० प्रजाती आणि १५,००० वनस्पती प्रजाती यांच्या अभ्यासाचा समावेश होऊ शकेल. (१०) देशात ८० राष्ट्रीय उद्याने आणि ४४१ अभयारण्ये असून त्यापैकी काही तर आशियातील सर्वात मोठी वन्यप्राणी अभयारण्ये आहेत. पर्यटनासाठी धार्मिक कल्पनांही राबवता येतील ज्यात मंदिरांचा वारसा आणि त्यामागील परंपरा व विश्वासाचा शोध घेण्याचा समावेश करता येईल.

## भारतातील शैक्षणिक पर्यटनासाठी बाजारपेठ

सध्या भारतात शैक्षणिक पर्यटनासाठी मोठी बाजारपेठ नसली तरीही अशी बाजारपेठ विकसित होण्याची प्रक्रिया सुरू आहे, याचे संकेत देणारे काही घटक आहेत. पर्यटन मंत्रालयाचा २०१५ चा वार्षिक अहवाल आणि ओईसीडीच्या दृष्टीक्षेपात शिक्षण अहवालातील काही घटकांकडे काळजीपूर्वक लक्ष दिले पाहिजे.

- २०१४ मध्ये भारतात परदेशी पर्यटकांच्या येण्याचे प्रमाण १०.६ टक्क्यांनी वाढले, जे जागतिक स्तरावर आंतरराष्ट्रीय पर्यटकांच्या आगमनाच्या ४.७ टक्के या मध्यम वाढीच्या दरापेक्षा अधिक होते.
- अनेकदा देशात वापरल्या जाणाऱ्या भाषेवरून कोणत्या देशात शिक्षण घ्यायचे, याचा निर्णय विद्यार्थी घेतात. ज्या देशांतील भाषा व्यापक प्रमाणावर वापरली व बोलली जाते, उदाहरणार्थ इंग्लीश, ते देश संपूर्ण आणि सापेक्ष दोन्ही बाबतीत परदेशी विद्यार्थ्यांच्या पसंतीत आघाडीवर असतात.

- शिक्षणाचा दर्जा आणि उच्च शिक्षणाचे उपलब्ध अभ्यासक्रम याबाबत मोठ्या प्रमाणावर मिळणाऱ्या छापील आणि ऑनलाईन माहितीवरून आंतरराष्ट्रीय विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी परदेशी स्थळ निवडतात.
- शिक्षणासाठी देश निवडताना तेथील शुल्कही महत्वाची भूमिका बजावते, मात्र शिक्षणाचा दर्जा जोपर्यंत उच्च आहे आणि केलेल्या गुंतवणुकीचा योग्य मोबदला मिळण्याची क्षमता आहे, तोपर्यंत शिक्षण शुल्क भावी आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना फारसे निरुत्साही करत नाही.
- गेल्या काही वर्षांत ओईसीडी देशांनी आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना तात्पुरता किंवा कायमस्वरूपी व्हिसा देण्यासाठी व्हिसा धोरण शिथील केले आहे. (ओईसीडी २००८) यामुळे विद्यार्थ्यांसाठी हे देश अधिक आकर्षित करणारे ठरले असून त्यांची कामगारशक्ती मजबूत झाली आहे. त्यामुळे व्हिसा धोरण आणि शिक्षण शुल्क यावर आधारित विद्यार्थ्यांच्या निर्णयावर परिणाम करतात.
- कुठे शिक्षण घ्यायचे याबाबतचा निर्णय विद्यार्थी आणखी काही बाबींवरूनही घेतात. ते घटक असे आहेत. विशिष्ट संस्था अथवा अभ्यासक्रमांची शैक्षणिक महती, पदवीसाठी किती काळ घालवावा लागणार, याच्या मोजमापातील देशादेशांतील लवचिकता, परदेशी पदव्यांना असलेले महत्व, मायदेशातील दर्जेदार शिक्षणाच्या मर्यादा, देशांतर्गत विद्यापीठांच्या प्रवेशाबाबतच्या मर्यादा, देशादेशांतील भौगोलिक, व्यापारी अथवा ऐतिहासिक संबंध, भविष्यतील रोजगाराच्या संधी, सांस्कृतिक आकांक्षा, मायदेश व परदेशातील कर्ज पुरवठ्याबाबत सरकारी धोरण.

वर उल्लेख केलेल्या सर्व घटकांचे बारकाईने विश्लेषण केल्यावर आपल्याला असे आढळते की, इंग्लीश ही जागतिक मान्यता मिळालेली आणि भारतात व्यावसायिक भाषा म्हणुन अंगीकारल्याने ती मोठ्या शहरांत व्यापक प्रमाणावर बोलली व वाचली जाते. आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना नाउमेद करण्याइतके भारताचे व्हिसा धोरण अत्यंत जाचक नाही.मात्र भारतात दिल्या जाणाऱ्या पदव्या या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या समजल्या जात नाहीत आणि भारत व अन्य देशांत कर्ज हस्तांतरणाची सुयोग्य यंत्रणा नाही. आमच्या शिक्षण व्यवस्थेत आम्ही या त्रुटींत सुधारणा करू शकलो आणि परदेशी विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी सर्व सुविधा देऊ केल्या तर शैक्षणिक पर्यटनासाठी इकडे येणाऱ्या आणि बाहेर जाणाऱ्या दोन्ही विद्यार्थ्यांसाठी भारत सर्वाधिक पसंतीचा देश ठरेल, हे निश्चित आहे.

**संदर्भ :**

[1] http://www.aicte-india.org/downloads/ancient.pdf retrieved on April 9, 2015.

[2] http://www.nalandauniv.edu.in/abt-history.html retrieved on April 9, 2015.

[3] ibid.

[4] अरुणमोझी टी.आणि पन्नीरसेल्वम ए. (२०१३) भारतातील पर्यटनाचे प्रकार. इंटरनॅशनल जर्नल ऑफ करंट रिसर्च अँड अकेडेमिक रिव्हू. व्हॉल्युम १, क्र.१

[5] http://shodhganga.inflibnet.ac.in/bitstream/10603/6703/6/06_chapter%201.pdf retrieved on April 12, 2015.

[6] पर्यटन मंत्रालय वार्षिक अहवाल, २०१४-१५

[7] बोजर डी. (१९९८) लिजर, लर्निंग अँड ट्रव्हल. जर्नल ऑफ फिजीकर एज्युकेशन, रिक्रिएशन अँड

[8] डान्स, ६९(४), २८-३१

[9] होल्डनॅक ए.आणि होलँड एस. (१९९६) एज्यु टुरिझम व्हेकेशनिंग टु लर्न : पार्क्स अँड रिक्रिएशन, ७२-७५

[10] युनेस्को, २००९ ग्लोबल एज्युकेशन डायजेस्ट २००९ : कम्पेअरिंग एज्युकेशन स्टॅटिस्टिक्स ऍक्रॉस द वर्ल्ड, युनेस्को इन्स्टिट्यूट फॉर स्टॅटिस्टिक्स, मॉन्ट्रिअल.

(***अर्चना कुमारी** या केंद्रीय विद्यापीठ जम्मु येथे सहाय्यक प्राध्यापक आहेत तर **दिव्यांशु कुमार** हे भारतीय माध्यम व संचार संस्था दिल्ली येथे सहाय्यक प्राध्यापक म्हणुन कार्यरत आहेत*).

**संपर्कासाठी ई-मेल -**

kumardivyanshu@gmail.com

# पर्यटन, दारिद्रय आणि बारावी पंचवार्षिक योजना

- संजय महाजन




**पर्यटनाचा विकास करण्यासाठी विविध व्यूहरचनांच्या अंमल बजावणीमध्ये सर्व पणधारकांदरम्यान (Stakeholders) औपचारिक आणि अनौपचारिक संपर्क विकसित करणे आणि सरकारी पातळीवर समन्वय प्रस्थापित करण्याचा समावेश आहे. पर्यटन विकासासाठी राष्ट्रीय स्थानिक सरकारांमध्ये एक 'संपूर्ण सरकारी' कार्य सूचि बनविण्याची आवश्यकता आहे. जेणेकरून कार्यक्रमांमध्ये एक केंद्राभिमुखता आणि सहक्रिया (Convergence and Synergy) प्रस्थापित करता येऊ शकेल. स्थानिक लोकांच्या उपजिविकेमध्ये पर्यटन क्षेत्राच्या योगदानाबाबत सर्व पणधारक व सरकार या दरम्यान जागरूकता निर्माण करणे आणि त्यांना स्थानिक आर्थिक विकास व दारिद्रय निर्मुलनासाठी संयुक्तरित्या कार्य करण्यास भाग पाडण्याची आवश्यकता आहे.**

**प्रस्तावना :-** पर्यटन हे क्षेत्र देशातील सर्वात मोठा सेवा उदयोग आहे. या क्षेत्राचे महत्व देशाच्या विशेषत: दूरवरती व मागास भागात आर्थिक विकास व रोजगार संधी निर्माण करण्याचे एक साधन या दृष्टीने अधिक आहे. या क्षेत्रामध्ये समाजातील विविध वर्गांसाठी उच्च विशेषतज्ञांपासून ते अकुशल कार्यशक्तीपर्यंत प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अशा दोन्ही प्रकारच्या रोजगार निर्माणाची मोठया प्रमाणावर क्षमता आहे. संयुक्त राष्ट्राच्या रोम येथे १९६३ मध्ये आयोजित आंतरराष्ट्रीय यात्रा आणि पर्यटन परिषदेने पर्यटनाचे केलेल्या वर्णनानुसार, कोणतीही एखादी व्यक्ति ही इतर देशांचा आनंद घेण्यासाठी, सुट्टी घालविण्यासाठी, आरोग्य ठीक करण्यासाठी, व्यापार किंवा कोणत्या तरी अन्य उद्देशाने अगर बैठक व परिषदांमध्ये भाग घेण्यासाठी यात्रा करते आणि तेथे किमान २४ तास थांबत असेल तर त्यास पर्यटन असे म्हटले जाते. पर्यटन म्हणजे अशी घटना की, ज्यामध्ये पर्यटकाने एखादया विशिष्ट ठिकाणास भेट देण्याचे ठरविल्यापासून त्या ठिकाणाला भेट देऊन परत घरी येई पर्यंत घडलेल्या वेगवेगळया क्रियांचा समावेश होतो. या क्रियांमध्ये वाणिज्य क्रिया देखील महत्वाच्या असतात. पर्यटन क्षेत्र हे दारिद्रय निर्मुलन, पर्यावरण संरक्षण, रोजगार निर्माण, महिला व इतर वंचित समूहांच्या विकासाद्वारे शाश्वत मानवी विकासाचे एक साधन बनले आहे प्रस्तुत लेखात, ''**पर्यटन, दारिद्रय आणि बारावी पंचवार्षिक योजना**'' याचा संक्षिप्त आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**पर्यटनाची प्रगती : आंतरराष्ट्रीय तुलना २०१३ :-**

जागतिक व्यापार आणि पर्यटन परिषदेनुसार, अर्थात डब्ल्यु टी टी सी नुसार जागतिक जीडीपी मध्ये संयुक्त राज्याच्या परिवहन व पर्यटन क्षेत्राचे जे ७ ट्रिलियन अमेरिकन डालरचे योगदान आहे, ते २०१३ मध्ये वाढून जागतिक जीडीपी च्या ९.५% झाले आहे. यामध्ये ४.७ मिलियन नवीन रोजगार निर्माण झाला आहे. यामाध्यमातून या क्षेत्रात एकूण रोजगार सुमारे २६६ मिलियन उपलब्ध झाला आहे की, जो जगातील अकरा नोकऱ्यांच्या हिशेबाने एक नोकरी आहे. या क्षेत्रात २०१४ पर्यंत ४.३% ची वृध्दी घडून येऊन ६.५ मिलियन नवीन नोकऱ्या निर्माण होऊ शकतात. राष्ट्रसंघाच्या जागतिक पर्यटन संघटनेच्या नवीन आकडेवारीवरून स्पष्ट होते की, सन २०१४ मध्ये १.१ बिलियन आंतरराष्ट्रीय पर्यटकांचे आगमन झाले. हे आगमन मागील वर्षाच्या तुलनेत ४.७% ने अधिक आहे आणि सन २०१५ मध्ये यामध्ये ३ ते ४% ची वृध्दी घडून येईल असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. सन २०१३ मध्ये जागतिक पर्यटक आगमनामध्ये फ्रान्सचा आणि जागतिक पर्यटनापासूनच्या प्राप्तीमध्ये संयुक्त राज्य अमेरिकेचा सर्वाधिक वाटा राहिला आहे. जागतिक पर्यटक आगमनात भारताचा

हिस्सा ६.४% राहिला आहे की, जो फ्रान्सच्या ७.८% आणि संयुक्त राज्य अमेरिकेच्या ६.४% च्या जवळपास बरोबरच आहे. व्हिएतनाम आणि इंडोनेशियाचा हिस्सा भारतापेक्षा अधिक आहे. तरी सुध्दा आंतरराष्ट्रीय पर्यटन प्राप्तीच्या दृष्टीने भारताचा जो १.५% चा हिस्सा आहे परंतु तो अमेरिकेच्या १४.५% पेक्षा अगदीच अल्प आहे एवढेच नव्हे तर विकासाच्या दृष्टीने देखील २०१३ मध्ये व्हिएतनाम इंडोनेशिया, थायलंड आणि तुर्की यासारखे देश हे भारतापेक्षा पुढे राहिले आहेत.

पर्यटनासंबंधी कार्यांचे काही भाग जसे-ट्रॅव्हल एजंट, टूर ऑपरेटर आणि इतर आरक्षणाशी संबंधित कार्ये ही प्रशासनिक व प्रोत्साहन सेवा कार्यांचा भाग आहेत. दुसरे भारतीय पर्यटन उपग्रह लेखा परीक्षणानुसार सन २०१२-१३ च्या दरम्यान एकूण GDP मध्ये पर्यटनाचे योगदान ६.९%, (३.७% प्रत्यक्ष आणि ३.१% अप्रत्यक्ष) राहिले आहे आणि एकूण रोजगारीमध्ये पर्यटनाचे योगदान १२.४% (५.३% प्रत्यक्ष आणि ७.०% अप्रत्यक्ष) राहिले आहे. सन २०१३ मध्ये पर्यटकांच्या आगमानामध्ये ५.९% वाढ घडून आली असली तरी विदेशी मुद्रा प्राप्तीची स्थिती की जी डॉलरच्या दृष्टीने ४.०% राहिली आहे, ते निश्चितच उत्तम नाही तर दुसऱ्या बाजूने सन २०१४ मध्ये विदेशी पर्यटकांचे आगमन ७.१% आणि विदेशी विनिमय प्राप्ती (FEE- 6.6%) या दोन्हीमध्ये देखील वृध्दी घडून आली आहे. सन २०१४-१५ च्या अंदाजपत्रक माध्यमातून सरकारने पर्यटन क्षेत्रावर जोर देण्याच्या आपल्या इरादयास, सेवाकरामधील अडथळे दूर करणे, गंगा नदी विश्वस्तरीय बुध्दिस्ट सर्किटचा विकास आणि विश्वस्तरीय अध्यात्मिक स्तर बनविणे यासारखे अनेकविध प्रयत्न सुरू केले आहेत. या ध्येयास पूर्व कार्यान्वित करण्यासाठी पर्यटक विजा प्रक्रिया सुलभ बनविण्यात आली आहे. या माध्यमातून ४३ देशांसाठी आगमनावर इलेक्ट्रॉनिक टॅव्हल ऑथराइजेशन द्वारे पर्यटक विजा देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

इलेक्ट्रॉनिक पर्यटन प्राधिकरणाद्वारे अर्थात इटीओ जलद, अधिक समावेशी आणि शाश्वत वृध्दीचे साधन स्वरूपात पर्यटन :- अधिक तीव्र, शाश्वत आणि अधिक समावेशी सामाजिक विकास हया बाराव्या पंचवार्षिक योजनेच्या उद्दिष्टास प्रोत्साहित करण्यात पर्यटन क्षेत्र महत्वपूर्ण भूमिका पार पाडत आहे. पर्यटन क्षेत्राद्वारे गरिब समर्थक वृध्दीस (Pro-Poor Growth) प्रोत्साहित करण्याची अन्य क्षेत्रांच्या तुलनेत अधिक अपेक्षा आहे. कारण या क्षेत्रामध्ये सेवा आणि कार्यांचा संग्रह असतो आणि हा उदयोग आपल्या घरामधून मनोरंजनासाठी किंवा

**वर्ष २०१३ मधिल पर्यटन क्षेत्राची कामगिरी - आंतरराष्ट्रीय तुलनात्मक कोष्टक**

| देश | आंतरराष्ट्रीय पर्यटक आगमन | | | आंतरराष्ट्रीय पर्यटकांद्वारे प्राप्ति | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या (दशलक्ष) | वाटा (%) | वृद्धी (%) | मुल्य (यूएस) | वाटा (%) | वृद्धी (%) |
| फ्रान्स | 84.7 | 7.8 | 2.0 | 56.7 | 4.7 | 5.6 |
| अमेरिका | 69.8 | 6.4 | 4.7 | 173.1 | 14.5 | 7.4 |
| स्पेन | 60.8 | 5.6 | 5.6 | 60.4 | 5.1 | 7.3 |
| तुर्की | 37.8 | 3.5 | 5.9 | 28.4 | 2.3 | 10.7 |
| थायलंड | 26.5 | 2.4 | 18.8 | 42.1 | 3.5 | 24.6 |
| मलेशिया | 25.7 | 2.4 | 2.7 | 21.5 | 1.8 | 6.4 |
| सिंगापूर | 11.9 | 1.1 | 7.2 | 19.1 | 1.6 | 1.1 |
| इंडोनेशिया | 8.8 | 0.8 | 9.4 | 9.1 | 0.8 | 9.5 |
| व्हियतनाम | 7.6 | 0.7 | 10.6 | 7.5 | 0.6 | 10.3 |
| भारत | 6.8 | 0.6 | 4.1 | 18.4 | 1.5 | 4.0 |
| जागतिक | 1087 | 100.0 | 4.8 | 1195 | 100.0 | 7.2 |

**स्त्रोत -** आर्थिक सर्वेक्षण - २०१४ - १५, वित्त मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली पेज नं. ११५ व्हॉल्युम - II

अन्य कारणाने बाहेर यात्रा करणाऱ्या व्यक्ति किंवा समूहांना परिवहन, निवास, खाण्या-पिण्याच्या सेवा, किरकोळ दुकाने, मनोरंजन व्यवसाय आणि अन्य आतिथ्य सेवा उपलब्ध करून देतो. यामध्ये समाविष्ट आर्थिक कार्यांचा व्यापक परीघ हाच याच्या वृध्दीतील व्यापक भागिदारी निर्धारित करतो. यामध्ये अनौपचारिक क्षेत्राचा देखील समावेश आहे. पर्यटन व्यवसाय हा नैसर्गिक संपत्ती (उदा. वन, वन्यजीव) आणि संस्कृतीवर अवलंबून आहे. ही संपत्ती गरिबांजवळ उपलब्ध असते परंतु त्यांच्याजवळ वित्तीय संसाधने नसतात. याच कारणाने पर्यटन व्यवसाय हा संपूर्ण जगभरात रोजगार निर्माणासाठी सर्वात मोठा उद्योग आहे. भारतामध्ये निर्माण क्षेत्रातील ४५ नोकऱ्यांच्या तुलनेत पर्यटन व यात्रा क्षेत्रातील गुंतवणूकीचा प्रति मिलियन रूपया हा ७५ नोकऱ्या निर्माण करतो समावेशी वृध्दीला प्रोत्साहन देण्यामध्ये पर्यटनाच्या भूमिकेला जून २०१२ मध्ये मेक्सिको येथे आयोजित करण्यात आलेल्या जी-२० देशांच्या राष्ट्राध्यक्षांच्या बैठकीमध्ये सुध्दा मान्यता देण्यात आली. पर्यटन, ''वृध्दी आणि रोजगार निर्माण'' या दोन्ही दृष्टीने महत्वाचे आहे. परंतु ते शाश्वत देखील असले पाहिजे. जागतिक पर्यटन संघटनेच्या मते शाश्वत पर्यटन म्हणजे सर्व संसाधनांच्या व्यवस्थापनास अशा प्रकारे अग्रेसर केले जावे की, सामाजिक ऐक्य, आवश्यक पारिस्थितीकी प्रक्रिया, जैवविविधता आणि जीवन टिकवून ठेवणाऱ्या पध्दतींना अखंडित ठेऊन आर्थिक, सामाजिक व सौंदर्यबोधी आवश्यकतांची पूर्तता करणे होय. सन १९९२ मध्ये रिओ (Rio) येथे ओयाजित ''पृथ्वी परिषदें'' मध्ये पर्यावरणीय, आर्थिक आणि सामाजिक शाश्वततेबाबत तीन सिध्दान्त स्थापन करण्यात आले. तेव्हापासून पर्यटनाच्या क्षेत्रात संपूर्ण जगभरात शाश्वत पर्यटन (Sustainable Toruism) सिध्दान्ताचा स्वीकार करण्यात आला आहे. भारतामध्ये पर्यटन क्षेत्रात भारतीय जैवविविधता, वन, नदी व त्याची समृध्द संस्कृती आणि परंपरागत अप्रतिम अनामत ठेव्यांचा फायदा याच आधारावर घेण्यात येत आहे. या क्षेत्रासमोरील प्रमुख आव्हान हे या अनामत ठेव्यास मूळ स्वरूपात सुरक्षित ठेवणे आणि या ठेव्यापर्यंत देशीय व आंतरराष्ट्रीय पर्यटकांची पोहोच बनविण्याचे आहे. पर्यटन क्षेत्रात भारतीय नैसर्गिक व सांस्कृतिक ठेव्याचे रक्षण करण्यातच स्थानिक समाजाचे आर्थिक हित निहित असल्याने अधिक शाश्वत वृध्दी घडवून आणली जाऊ शकते.

बाराव्या पंचवार्षिक योजनेत कृषि क्षेत्राचा ४% वृध्दी दर, विनिर्माण क्षेत्राचा ८% वृध्दी दर आणि सेवा क्षेत्राची ९.१% वृध्दी साध्य करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. मागील पाच वर्षांत पर्यटन क्षेत्रामध्ये वार्षिक ८.१% वृध्दी प्राप्त झाल्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. हा वृध्दी दर ११ व्या पंचवार्षिक योजने दरम्यान प्राप्त करण्यासाठी अपेक्षित ७.९% समग्र आर्थिक वृध्दीपेक्षाही थोडा अधिक आहे. सामान्यत: व्यवसाय परिदृश्यातंर्गत सन २०११-२०२१ या कालावधीदरम्यान पर्यटन क्षेत्रात ८.८% प्रतिवर्ष वृध्दी घडून येईल अशी भविष्यवाणी करण्यात आली आहे. तरी देखील जागतिक यात्रा व पर्यटन परिषदेच्या अनुमानानुसार भारतामध्ये पर्यटन उद्योगात सन २००९ ते २०१८ या कालावधीदरम्यान १० वर्षांत सर्वाधिक वृध्दी घडून येईल अशी आशा आहे.

**अकराव्या पंचवार्षिक योजनेची समीक्षा/पुनरावलोकन** :- अकराव्या योजनेचे स्वप्न हे पर्यटन क्षेत्राची संकल्पना बहु-आयामी व्यूहरचनेच्या माध्यमातून पर्यटनाचा विकास आणि प्रोत्साहनाद्वारे उत्कृष्ट गुणवत्तेचे जीवन साध्य करण्याचे राहिले आहे. १) पर्यटन विकासाला राष्ट्रीय प्राधान्यक्रम स्वरूपात स्थापन करणे आणि त्यास टिकवून ठेवणे असे असतांना देखील यात्रा व पर्यटन उद्योगाच्या सरकारी अग्रक्रमासंबंधात जगभरात भारताचे जागतिक स्थान हे सन २००६ मध्ये ५९ होते ते घटून सन २०१० मध्ये ४० असे राहिले आहे. २) इष्टस्थळ/परिक्रमासाठी (Destination/Circuits) मूलभूत सोयीसुविधा व उत्पादानाच्या विकासामध्ये सुधारणा घडवून आणणे आणि त्याचा विस्तार करणे. यास इष्टस्थळे व परिक्रमांमध्ये उत्पादन/मूलभूत सोयी-सुविधाचा विकास नावाच्या केंद्राद्वारे प्रायोजित एका योजनेच्या माध्यमातून साध्य करण्याची मागणी करण्यात आली होती. हा पैलू लक्षात घेतला तरी देखील भारताचे पर्यटन मूलभूत सेवा-सुविधा स्तरावरील जागतिक स्थान हे (हॉटेल्समध्ये रूम्सची संख्या, वीजा कार्डाचा स्वीकार करणाऱ्या ATM ची संख्या आणि कार भाडयाने देणाऱ्या प्रमुख कंपन्या इत्यादी) सन २००६ मध्ये ९६ होते. त्यामध्ये नाममात्र सुधारणा घडून येऊन ते सन २०१० मध्ये ८९ असे राहिले आहे. ३) 'अतुल्य भारत' ब्रँडचे विपणन करण्यासाठी एका प्रभावी कार्यक्रमाचा विकास व त्याची अंमलबाजावणी करणे. केंद्र आणि राज्य या दोन्ही सरकारांनी आपल्या योजना खर्चामधून पर्यटनावर विपणन आणि सामाजिक जागरूकता अभियानांसाठी

मोठया प्रमाणात वाटप केले. विपणन व्यूहरचना परिणामकारकता संदर्भात प्रश्न उपस्थित केला जाऊ शकतो. विपणन आणि बँडिंग परिणामकारकता संदर्भातील भारताचे जागतिक स्थान सन २००६ मध्ये ५९ होते ते घटून सन २०१० मध्ये ६३ असे राहिले. ४) पर्यटन क्षेत्रात सेवा पुरवठादारांमध्ये क्षमता निर्माण करणे. या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी केंद्र सरकारने मनुष्यबळ संसाधनास प्रशिक्षित करणे आणि त्याचे प्रमाणीकरण करण्यासाठी पर्याप्त संस्थात्मक मूलभूत सेवा निर्माण करणे व त्याच्या उन्नतीसाठी एक योजना सुरू करण्यात आली आहे. ५) अकराव्या योजने दरम्यान यात्रा व पर्यटन स्पर्धात्मकता निर्देशांकामध्ये भारताचे जागतिक स्थान सन २००६ मध्ये ६५ होते त्यामध्ये सुधारणा घडून येऊन सन २००८ मध्ये ६२ झाले आणि सन २०१० मध्ये घटून ६८ असे राहिले. याचे कारण भारतामधून बाहेर फिरण्यासाठी जाणाऱ्या यात्रेकरूंची संख्या ही सन २००६ मध्ये ८.३४ मिलियन होती ती सन २०१० मध्ये वाढून १२.०७ मिलियन झाली.

**बाराव्या योजनेसाठीचे लक्ष्य** :- जरी सामान्यत: वाणिज्य परिदृश्यांतर्गत सन २०११-२१ या दरम्यान पर्यटन क्षेत्रात प्रतिवर्षी ८.१% ची वृध्दी घडून येईल अशी भविष्यवाणी वर्तविण्यात आली असली तरी जागतिक यात्रा व पर्यटन परिषदेनुसार सन २००९-२०१८ या दहा वर्षांच्या कालावधी दरम्यान भारतीय पर्यटन क्षेत्रात विकासाची संपूर्ण जगभरात सर्वाधिक संभवनीयता आहे. अंतिमत: पर्यटन क्षेत्रातील वर्तमान प्रक्षेपित वृध्दी ही या क्षेत्राचे समग्र आर्थिक वृध्दीमधील योगदान आणि या क्षेत्राची संभवनीयता (Potential) या दोन्ही स्वरूपात अपर्याप्त आहे. बाराव्या योजने दरम्यान यामध्ये बरीच सुधारणा घडवून आणण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे. पर्यटन क्षेत्रात प्रत्यक्ष रोजगारीमध्ये सन २००४-०५ ते २०१०-११ या सहा वर्षां दरम्यान २.०४% च्या वार्षिक वृध्दी दराची नोंद झाली आहे. ही बाब संपूर्ण जगभरातील पर्यटन क्षेत्रामधील ०.६५ रोजगार लवचिकतेपेक्षा बरीच कमी आहे. या संदर्भातील तीन परिदृश्यांचा उल्लेख पुढील पत्रकात करण्यात आला आहे.

**पर्यटनाचा पर्यायी वृद्धी कोष्टक**

| वर्तमान चित्र | मुख्यधारित | रोजगारात वृद्धी | पंचवार्षीक योजनेंतर्गत नवीन रोजगार संधी |
|---|---|---|---|
| Scenario – I | 10% | 4.0% | 5.5% |
| Scenario – II | 11% | 4.4% | 6.1% |
| Scenario – III | 12% | 4.8% | 6.7% |

**स्त्रोत** : १२वी पंचवार्षिक योजना, योजन आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली (व्हॉल्युम - II)

प्रत्यक्ष रोजगारीमधील वृध्दीचा अंदाज हा या गृहीतावर आधारित आहे की, मध्यम कालावधीत रोजगार लवचिकतेमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरास अनुसरून जलदगतीने वृध्दी घडून येणे व्यवहार्य नाही. परंतु बाराव्या योजना कालावधीत यामध्ये ०.४ ची वृध्दी घडून येईल. टॅव्हल्स आणि पर्यटन स्पर्धात्मकता अहवालामध्ये सन २०११ साठी करण्यात आलेल्या यात्रा व पर्यटन स्पर्धात्मकता निर्देशांकात १३९ देशांच्या श्रेणीत भारतास आशिया-प्रशांत क्षेत्रात (Asia Pacific Region) १२ व्या श्रेणीवर आणि ६८ व्या समग्र श्रेणीत ठेवण्यात आले आहे. अशा प्रकारे ही बाब सन २००९ च्या निर्देशांकापासून सहा स्थानांनी खाली आली आहे. भारतास त्याची नैसर्गिक संसाधने (८ वे स्थान) व सांस्कृतिक संसाधने (२४ वे स्थान), अनेक जागतिक वारसा स्थळे, नैसर्गिक व सांस्कृतिक दोन्ही, समृध्द वनस्पती जगत आणि अनेक जत्रा (मेळे) व प्रदर्शने व सुदृढ सृजनात्मक उद्योगांच्या स्वरूपात ओळखले जात आहे. भारताचे विकास स्थान ध्यानात घेता विशेषत: रस्ते परिवहनाच्या मूलभूत सोयी-सुविधा (श्रेणी ४३) ध्यानात घेता हवाई परिवहनामधील भारताची स्थिती

अधिक उत्तम आहे. तरी सुध्दा भारतीय पर्यटन मूलभूत सेवा-सुविधांचे काही भाग हे अद्यापही अविकसित (८९ वे स्थान) आहेत. आंतरराष्ट्रीय तुलनेत प्रतिव्यक्ति हॉटेलमधील रूम्सची कमतरता व ATM ची उपलब्धता कमी आहे. चिंतेचे एक अन्य क्षेत्र आहे आणि ते म्हणजे भारतीय धोरणात्मक वातावरण की, ज्यास १२८ व्या स्थानावर ठेवण्यात आले आहे. कारण व्यवसाय सुरू करण्यास बराच कालावधी व खर्च करावा लागतो. तसेच द्विपक्षीय वायुसेवा करारांना मुक्त स्वरूपात निर्धारित करण्यात आलेले नाही आणि जास्तीत जास्त अभ्यांगतांना (Visitors), विजा देणे अपेक्षित आहे तसेच आरोग्य व स्वच्छता मानके (Standers –११ वे स्थान), आणि देशाच्या मानवी संसाधनाकडे (९६ वे स्थान) ध्यान देण्याची आवश्यकता आहे. हा मुद्दा देखील अधिक महत्वाचा आहे की, भारतामध्ये सशक्त असा देशीय (Domestic) पर्यटनाचा आधार आहे. यामध्ये मध्यम वर्गातील आणखीन अधिक वृध्दीद्वारे खर्च करण्यास योग्य उत्पन्न (विनियोगक्षम उत्पन्न) आणि जागरूकता वाढविण्याची संधी अधिक आहे. तरी देखील देशीय पर्यटनाचा बहुतांश हिस्सा हा न्यून उद्देश (Low end) असणारा आहे आणि यास उच्च उद्देश (High end) देशीय पर्यटन स्वरूपात विकसित करण्याचे आपल्यासमोर मोठे आव्हान आहे. स्पर्धात्मकतेच्या तुलनेत न्यून मापनदंड असतांना देखील भारत पुढील दशकात समग्र योजनांची आखणी आणि अंमलबजावणी करून आपल्या पर्यटन संभवनीयतांचा फायदा घेऊ शकतो. या संभवनीयतांचा जर हुषारीने स्थिररित्या लाभ घेतला तर पर्यटन हे भारतामध्ये विकास सदृढ साधन बनू शकेल. बाराव्या योजना दृष्टीकोणात पर्यटनासंबंधातील कामगिरीमध्ये योजना कालवधी दरम्यान पर्यटन क्षेत्रात मूल्यवर्धीत १२% चा पर्याप्त उच्च वार्षिक वृध्दीदर साध्य करण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे. पर्यटन क्षेत्रातील रोजगार लवचिकतेमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत वृध्दी साध्य करण्यासाठी पर्यटन प्रोत्साहन व्यूहरचनेचे पुनर्पूर्वाभिमुखीकरण (Re-Oriented) करण्याची आवश्यकता आहे. तसेच भारतास बाराव्या पंचवार्षिक योजनेच्या अंतिम वर्षापर्यंत यात्रा व पर्यटन स्पर्धात्मकतेमध्ये स्पर्धा देशांत समाविष्ट व्हावे लागेल तसेच जागतिक विदेशी पर्यटक आगमनात १% हिस्सा वाढविण्याचा प्रयत्न करावा लागेल.

**बाराव्या योजनेदरम्यान पर्यटनाचा विकास करण्यासाठीची व्यूहरचना** :- १) भारतामध्ये पर्यटन क्षेत्रात अधिक जलदगतीने, शाश्वत आणि अधिक समावेशी विकास घडून येण्याची संभवनीयता आहे. बाराव्या योजनेदरम्यान या व्यूहरचनेमध्ये अभिनव बदल करण्याची आवश्यकता आहे. जेणेकरून मागील कालावधीत निर्धारित लक्ष्यास साध्य करता येऊ शकेल. २) पर्यटन विकासासंदर्भातील परंपरागत दृष्टीकोण हा अत्यंत खुला व निर्बंधमुक्त जागतिक आर्थिक वातावरणाचा परिणाम आहे. आर्थिक लाभ पुनर्वितरणामध्ये असमानता हे या दृष्टीकोणाचे वैशिष्टय आहे. मागील दोन दशकांत नवीन बिगर-परंपरागत दृष्टीकोण पुढे आला आहे. उदा. इको-पर्यटन (Eco-Tourism) या दृष्टीकोणाचा संबंध हा दारिद्रय निर्मुलना ऐवजी पारिस्थितीकी आणि सांस्कृतिक रक्षणाशी अधिक आहे. हा दृष्टीकोण अधिक लोकप्रिय ठरला आहे. बाराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये पर्यटन विकास दृष्टीकोणास दारिद्रय दूर करण्यासाठी पुनर्पुर्वाभिमुख करण्याचे लक्ष्य आहे. ३) नियोजन आयोगाद्वारे प्रकाशित करण्यात आलेल्या बाराव्या योजना दृष्टीक्षेप पत्र दस्तऐवजामध्ये पर्यटन क्षेत्रातील भावी संभवनीयतेचा उपयोग करून घेण्यासाठी समग्र व्यूहरचनेचे निर्धारण करण्यात आले आहे. दारिद्रय निर्मुलनात पर्यटन वृध्दीचे योगदान राहील अशी व्यवस्था करण्याच्या आवश्यकतेचे महत्व देखील मान्य करण्यात आले आहे. कदाचित हे लाभ आर्थिक, सामाजिक, पर्यावरणीय किंवा सांस्कृतिक स्वरूपाचे असू शकतात. या हेतूने दृष्टीक्षेप दस्तऐवज पत्रात उत्पादन व पायाभूत सुविधांचा विकास, विपणन, ब्रँडींग आणि प्रोत्साहन, नियोजन, धोरण व गुंतवणूक आणि यापासून निर्मित लाभ कमकुवत वर्गापर्यंत पोहोचविण्यासहित समग्र स्तरापर्यंत कार्यांच्या विविधतेसाठी व्यूहरचनेचा एक संच विकसित करण्याच्या आवश्यकतेची ओळख करून घेण्यात आली आहे. ऐतिहासिक स्थळे, धार्मिक महत्वाची ठिकाणे आणि राष्ट्रीय आकर्षण असणाऱ्या व्यापक श्रृंखलेशी संबंधित पर्यटन संभवनीयतांना ज्ञात करून घेण्यासाठी आणि या क्षेत्रांच्या आजुबाजूस असणाऱ्या क्षेत्रांना विकसित करू शकेल अशी मुख्य व्यूहरचना केली जावी. या समूहांचा/स्थळांचा विकास करण्यासाठी स्थानिक पातळीवर अनेक संस्थाबरोबरील सहकार्य अपेक्षित आहे. अंतिमत: पर्यटनाचा विकास करण्यासाठी राज्यांनी आपल्या पर्यटन स्थळांच्या विकासामध्ये अग्रणी भूमिका पार पाडण्याची

आवश्यकता आहे. यामुळे रोजगार वाढेल आणि राज्य घरगुती उत्पादन देखील वाढेल. ४) सध्या गरिबांना फायदेशीर पर्यटन ही संकल्पना अधिक लोकप्रिय झाली आहे. सन २००६ मध्ये केरळ पर्यटन विभागाने, जबाबदार पर्यटन (Responsible Tourism) उपक्रमशीलता माध्यमातून राज्य पर्यटन धोरणास गरिब समर्थक बनविण्याचा सकारात्मक प्रयत्न केला आहे. या पैलू अंतर्गत कुमाराकोम येथे पर्यटन विकसित करण्याचा प्रायोगिक प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. याच्या प्रारंभिक टप्प्यात स्थानिक कृषी भूमिला पर्यटन पायाभूत सुविधांच्या विकासासाठी रूपांतरित करण्यात आले आहे. परिणामत: कृषी उत्पादनात घट घडून आली आणि स्थानिक कामगारांच्या निर्माण कार्यामधील धावपळीमुळे वेतनात वृध्दी घडून आली आहे. पर्यटन उद्योग आणि स्थानिक लोकसंख्या यामधील तफावत वाढत असल्याचे तात्काळ स्पष्ट झाले आहे. बहुतांश गावकरी हे त्यांच्याकडील शेतजमिन गेल्याने आणि त्यांच्याकडे पर्यटन कार्यांना चालविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सामर्थ्य व कौशल्याचा अभाव असल्याकारणाने वित्तीय संकटात सापडले आहेत. ५) अंतिमत: हे स्पष्ट झाले आहे की, कुमाराकोम येथील स्थानिक रहिवाश्यांना नवीन पर्यटन व्यवसायापासून कोणत्याही प्रकारचा लाभ झाला नाही. हॉटेलमध्ये जवळपास ८०% कर्मचाऱ्यांची भरती ही कुमाराकोमच्या बाहेरून केली जात होती. यामधील बहुतांश कर्मचारी हे देशातील सर्वात गरिब असणाऱ्या भागातील (पूर्वेत्तर भारतातील) होते. तसेच पर्यटन क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांची कामाची स्थिती अत्यंत कष्टप्रद होती. कामगारांना नोकरीबाबतची कोणतीही सुरक्षा नव्हती. कित्येक अशा बाबी सामोरे आल्या आहेत की, ज्यामध्ये कोणतेही पर्याप्त कारण न देता करार मोडण्यात आले आहेत. आणि कर्मचाऱ्यांना अत्यंत अल्प वेतन दिले जात आहे. ६) कुमाराकोममधील स्थानिक रहिवासी हे अनेकविध इतर मार्गांनी देखील पर्यटन उद्योगाचे बळी ठरले आहेत. गाववाल्यांची जीवनशैली आणि व्यवसाय हा कालवे, उपसागर, सरोवर आणि समद्र किनाऱ्याशी जोडला आहे. याचा ते मासेमारी करणे, शंख-शिंपले व जलचर प्राणी पकडणे आणि वाहतुकीसाठी उपयोग करतात. परंतु अनेक आश्रयस्थान मालकांनी पर्यटकांना एकांत आणि स्थिरचित्तता उपलब्ध करुन देण्याच्या हेतूने स्थानिक रहिवाश्यांची पोहोच कालवे आणि सरोवरापर्यंत बंद केली आहे. तसेच आश्रयस्थान मालकांनी यंत्रावर चालणाऱ्या नावेद्वारे जलपर्यटनामध्ये पर्यटक समूह चालविण्यास सुरुवात केली आहे. यापासून मच्छीमाऱ्यांकडून उपयोगात आणल्या जाणाऱ्या जाळयास क्षति पोहाचली आहे. सन २००२ मध्ये गावामधील कुटूंबांच्या सखोल माहिती द्वारे करण्यात आलेल्या सर्वेक्षणावरुन स्पष्ट झाले आहे की, पर्यटन विस्ताराने पायाभूत सुविधाचा विकास आणि समूदायात राहणाऱ्या लोकांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारणेत कोणत्याही प्रकारे योगदान दिलेले नाही. कुमाराकोममध्ये पर्यटनाचा विकास केल्याने या क्षेत्राच्या समग्र विकासामध्ये काही सुधारणा घडून आली आहे का ? या प्रश्नाच्या उत्तरासंदर्भात ६२ कुटूंबातील उत्तरदात्यांनी पर्यटनाद्वारे रस्ते किंवा परिवहन व्यवस्थेत काही अधिक सुधारणा घडून आली नाही असे उत्तर दिले तर याच प्रमाणे ८७ कुटूंबातील उत्तरदात्यांनी पाणी पुरवठा आणि पाण्याची गुणवत्ता या संबंधात नकारात्मक उत्तर दिले, आणि ९९ कुटूंबातील उत्तरदात्यांनी रोजगार उपलब्धता संभवनीयतेला नाकारले आहे. ७) केरळच्या पर्यटन विभागाने कुमाराकोम या स्थानास सन २००७ मध्ये जबाबदार/उत्तरदायी पर्यटनाचे ठिकाण म्हणून प्रायोगिक तत्वावर घोषणा केली. परंतु स्थानिक लोकांनी विरोध केल्यामुळे या प्रकल्पावर काम करणे अत्यंत कठीण होते. या प्रकल्पावरील कामाची प्रत्यक्ष अंमलबजावणी ही मे २००७ मध्ये केरळ पर्यटन विभागाचे कर्मचारी आणि पंचायत प्रतिनिधींच्या आयोजित एका बैठकीमध्ये उत्तरदायी पर्यटन पैलूचे वेळापत्रक, साधने, हेतू, उद्दिष्टये प्रयोजन आणि प्रमुख उदयोगपतींनी स्पष्टीकरण दिल्यानंतर करण्यात आली. ८) कुमाराकोम येथील कृषी क्षेत्रास पुनर्जीवित करण्याचे प्रथम उद्दिष्ट होते. पर्यटन विभागाने स्थानिक लोकांना पर्यटन व्यवसाय व बाजाराशी जोडण्याच्या शक्यतेचे सर्व्हेक्षण व विश्लेषण करण्यासाठी कुडूंबश्री (Kudumbashree) पंचायत आणि केरळ यात्रा व पर्यटन अध्ययन संस्थेच्या सहकार्याची मागणी केली. या उद्दिष्टासाठी सर्वप्रथम ने KITTS सर्वाधिक अरिक्षत वर्गाची अर्थात दारिद्रय रेषेखालील शेतकरी कुटूंबे आणि अशा स्थानिक उत्पादकांची ओळख पटविण्याचा प्रयत्न केला की, जे आपले उत्पादन विक्री करण्यासाठी बाजार प्रवेशामधील अडचणींना सामोरे जात आहेत. या शिवाय KITTS च्या संशोधनकर्त्यांनी हॉटेल

आणि उपाहारगृहांच्या फळे आणि भाज्यांच्या आवश्यकतेचा शोध (माहिती) घेण्यासाठी अध्ययन केले. या सर्व्हेक्षण परिणामांच्या आधारे इष्टस्थळ स्तर उत्तरदायी पर्यटन समिती विभागाने हॉटेलांना कृषी उत्पादनांचा पुरवठा अर्थात कोणत्या कृषी वस्तूचे कधी उत्पादन केले जावे आणि हॉटेलांना किती समग्र कृषी उत्पादनाची आवश्यकता राहील हे जाणून घेण्यासाठी एक कृषी दिनदर्शिका तयार केली आहे. या प्रक्रियेद्वारे स्थानिक स्व-शासनास स्थानिक शेतकरी व हॉटेल्स दरम्यान संपर्क प्रस्थापित करणे शक्य झाले आहे. परिणामत: १८ हॉटेलांनी व उपाहारगृहांनी फळे व भाजीपाला केवळ स्थानिक उत्पादकांकडून खरेदी करण्याची तयारी दर्शविली आहे. ८) असा करार केला असतांना देखील फेब्रुवारी २००८ मध्ये जेव्हा पीक कापणीस योग्य झाले तेव्हा हॉटेल व उपाहारगृह मालकांना स्थानिकांकडून पीकाची खरेदी करण्यास नकार दिला. या संदर्भात बहुतांश हॉटेल व उपाहारगृह मालकांनी असा तर्क वर्तविला की, कुमाराकोमचे कृषी उत्पादन हे तामिळनाडूमध्ये या स्थानाच्या आजूबाजूस असणाऱ्या क्षेत्रातील उत्पादनाच्या तुलनेत अधिक महाग आहे. राज्य सरकारने हस्तक्षेप केल्यानंतर या समस्येवर उपाय निघाला आणि हॉटेल व उपाहारगृह मालकांनी या पैलूबरोबर सहकार्य आणि कराराचे पालन करण्याचे ठरविले. दोन आठवडयानंतर १५ हॉटेलांनी (यामध्ये Luxury Taj Resort and Lake Resort यांचा समावेश आहे) DLRTC व पंचायतीबरोबर लिखित आणि औपचारिक करार केला की, ते स्थानिक शेतकऱ्यांचे उत्पादन खरेदी करतील. हॉटेल आणि उपाहारगृहांनी उत्पादनाची प्रथम विक्री १८ मार्च २००८ रोजी केली. सध्या शेतकरी व पर्यटन व्यवसाय मालकांचे चांगले संबंध आहेत. कुमाराकोम उत्तरदायी पर्यटन पैलूपासून कृषी प्रकल्प माध्यमातून १३५० प्रत्यक्ष लाभार्थ्यांना फायदा मिळाला. ९) या उत्तरदायी/जबाबदार पर्यटन पैलूच्या अंमलबजावणीद्वारे एका वर्षांच्या आतच अनेक वास्तव व मोजदाद करता येतील. असे परिणाम सामोरे आले आहेत. काही प्रमुख परिणाम पुढील प्रमाणे आहेत. i) स्थानिक कृषी उत्पादनात वृध्दी घडून आली. ii) कृषी दिनदर्शिका तयार करण्यात आली. iii) मुद्रास्फिती आणि बाजारातील चढ-उतारांपासून बचाव करण्यासाठी किंमत स्थिर ठेवण्याची पध्दती विकसित करण्यात आली. iv) १० कृषक समित्यांची स्थापना करण्यात आली यामध्ये एकूण ४६० व्यक्तिंचा समावेश करण्यात आला आहे. v) २० कुडुंबश्री (Kundumbashree) , निर्माण करण्यात आले. यामध्ये एकूण २५० महिलांचा देखील समावेश आहे. vi) पाच सुक्ष्म उपक्रम निर्माण करण्यात आले यामध्ये महिलांना प्राध्यान्य देण्यता आले आहे. vii) एक महिला मत्स्य प्रक्रिया एकक viii) एक चिकन प्रक्रिया महिला एकक ix) एक चपाती प्रक्रिया (स्थानिक ब्रेड) महिला एकक आणि x) दोन नारळ पुरवठा एकके स्थापन करण्यता आली आहेत. १०) कुमाराकोममधील उत्तरदायी पर्यटन प्रकल्पास एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर काही नवीन प्रकल्प विकसित करण्यात आले जेणेकरून स्थानिक जनता ही पर्यटन बाजारामध्ये प्रवेश करून त्यापासूनच्या निर्मित लाभांचा फायदा उठवू शकतील. अनेक पर्यटकांनी हॉटेल मालक आणि काही स्थानिक कलाकारांबरोबर संपर्क प्रस्थापित केला आहे. यामाध्यमातून हॉटेल मालक दोन हस्तशील्प एकके, थिरूवथिराकलीची (Thiruvathirakaly- केरळमधील परंपरागत नृत्यकला) कामगिरी करणारा एक महिला सांस्कृतिक समूह आणि एका महिला चित्रकार समूहाकडून त्याची उत्पादने सेवा आणि त्यांच्या कलाकृती खरेदी करण्यास सहमत झाले आहेत तसेच कलेचे प्रदर्शन करणाऱ्यांना जास्तीचे उत्पन्न मिळवून देण्यासाठी या प्रकल्पामध्ये केरळच्या स्थानिक परंपरागत कला स्वरूपांना प्रोत्साहन आणि संरक्षण देण्याची व्यवस्था देखील करण्यात आली आहे. या माध्यमातून तेथे पर्यटनाचा विकास घडून येत असतांनाच सांस्कृतिक मोहभंगापासून देखील मुक्तता मिळाली आहे. ११) सन २००९ मध्ये कुमाराकोम येथे ''ग्रामीण जीवनाचा अनुभव'' या नावाने एक नवीन योजना सुरू करण्यात आली. या योजनेच्या माध्यमातून पर्यटकांना आसपासच्या गावामध्ये नेण्यात येते. याद्वारे पर्यटक ग्रामीण जीवनाचे अवलोकन करू शकतात. अर्ध्या दिवसाच्या या सहलीसाठी सुमारे १००० रूपयांचा खर्च येतो आणि या सहलीत सहकार्य करणाऱ्या गावकऱ्यांमध्ये प्राप्त उत्पन्नाचे वाटप केले जाते. १२) याशिवाय हया उत्तरदायी पर्यटन योजनेत आणि प्रकल्पामध्ये महिलांना एक विशेष भूमिका देखील पार पाडावी लागणार आहे.कुडुंबश्रीच्या (Kudumbashree) सहकार्याने ७६० महिलांना कृषी कार्यक्रमांत ३५ महिलांना

किरकोळ विक्री कार्यांत, ३० महिलांना कला आणि संस्कृती वर्गात आणि ४५ महिलांना गावातील सहल समूहात समावेश करण्यात आला आहे. कुमाराकोम येथे महिला सक्षम करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. येथील महिला समूह हे सध्या या कार्यक्रमांच्या निर्णय प्रक्रियेत आपला सहभाग नोंदवत आहेत. अशा प्रकारे काळजीपूर्व व्यवस्थापित पर्यटन उद्योग हा गरिब ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण करण्यात, त्यांचे कुटूंब व समाजामधील त्यांचे स्थान उंचावण्यात सहाय्यक ठरू शकतो. १३) केरळमधील कुमाराकोम येथील उत्तरदायी पर्यटन प्रायोगिक प्रकल्पाच्या अंमलबजावणी पासूनचा अनुभव चांगला आहे. हे पर्यटन प्रतिमान स्थानिक जनतेचे सहकार्य घेऊन संपूर्ण देशात लागू करता येऊ शकेल.

**गरिबांसाठी लाभकारक पर्यटन दृष्टीकोण (Pro-Poor Tourism Approach) :-**

उपरोक्त दृष्टीकोण समोर ठेऊन पर्यटनाचा विकास घडवून आणणे आणि बाराव्या योजनेच्या उद्दिष्टांना पुढे घेऊन जाण्यासाठी ''गरिबांना लाभकारक पर्यटन'' विकसित करण्याची आवश्यकता आहे. गरिबांसाठी लाभकारक पर्यटनाचा हेतू हा पर्यटन माध्यमातून गरिब व उपेक्षित वर्गास निव्वळ लाभ पोहोचविण्याचा आहे. या लक्ष्यास साध्य करण्याचे साधन शिक्षण व प्रशिक्षण क्षेत्राचे आणि सुक्ष्म वित्तपोषण संस्थांच्या घन (सक्षम) सहकार्यापासून त्याच्या क्षमतांचा विकास आणि कौशल्याचे हस्तांतरण करून त्यांच्यासाठी कामाच्या संधी वृध्दींगत करणे हे आहे. गरिबांसाठी लाभकारक पर्यटनाचे लक्ष्य हे समग्र राष्ट्रीय दारिद्रय निर्मुलनाचे आहे. बिगर-आर्थिक लाभ आणि आर्थिक लाभ हे दोन्ही महत्वाचे आहेत. पर्यटन उद्योगाबाबतचा सुधारित व्यवस्थापन दृष्टीकोण हा नवीन कौशल्ये, अधिक चांगले शिक्षण आणि आरोग्य देखभाल पर्यंत पोहोच, शुध्द पिण्याचे पाणी आणि वाहतूक व्यवस्था जाळयापर्यंत पोहोच उपलब्ध करून देऊ शकतो. माहितीपर्यंत पोहोच, बाहय जगताशी संपर्क साधण्याची संधी, बाजार संधीपर्यंत सर्वधित पोहोच, समुदाय संस्थान व संरचनेला सुदृढ करणे आणि समुदाय अभिमानास वृध्दींगत करणे इत्यादी सारखे अमूर्त लाभ देखील उपलब्ध करून दिले जाऊ शकतात. गरिबांसाठी लाभकारक पर्यटनाचा संबंध हा प्रामुख्याने संसाधनांचे आणि संधीचे पुनर्वितरण करण्याशी आहे तर केवळ नवीन पर्यटन उत्पादन निर्माण करण्याशी त्याचा संबंध नाही.

**व्यावहारिक व्यूहरचना :-** गरिबांसाठी लाभकारक पर्यटन या दृष्टीकोनामधिल मुलगामी सिध्दान्ताच्या आधारावर व्यावहारिक व्यूहरचनेचा समावेश आहे. या व्यावहारिक व्यूहरचनेचे मुख्य तीन सिध्दान्त आहेत जसे

**A) आर्थिक लाभांमध्ये वृध्दी** :- हे लाभ गरिबांना व्यवसाय संधी, रोजगार संधी उपलब्ध करून देणे आणि सामूहिक लाभ वृध्दींगत करणे हे आहे. गरिबांना व्यवसाय संधी ही त्यांना विशेषत: अनौपचारिक क्षेत्रामध्ये लघु उद्योग उभारणीसाठी सक्षम बनवून उपलब्ध करून दिली जाऊ शकते. या क्षेत्राची मुख्य कार्ये ही उद्यम सहाय्यता, बाजार विस्तार, हस्तव्यवसाय आणि सांस्कृतिक प्रदर्शने यासारख्या पूरक पर्यटन उदयोगांचा विकास इत्यादी असली पाहिजेत. पर्यटन उद्योगास पुरवठा करण्यासाठी स्थानिक उदयोगांचा (उदा. निवास, भोजन आणि अन्य सामग्री) विकास घडून आला पाहिजे. आर्थिक भागिदारीस सक्षम करण्यामधील अडथळयांना (उदा. ऋणाचा अभाव, अनुपयुक्त सामाजिक संघटन, असुरक्षित पदावधी, दूरस्थ ठिकाणे) दूर करण्यासाठी अनेकविध उपाययोजना केल्या जाऊ शकतात. स्थानिक उद्योजकांना उद्योजकीय कौशल्यामध्ये प्रशिक्षीत करणे. तसेच पुरवठा साधनांना (गरिबांबरोबर प्रत्यक्ष उत्पादन व कौशल्ये विकसित करणे) पर्यटन उदयोग आणि प्रचालकांमध्ये गरिबांची उत्पादने व सेवांची मागणी वृध्दींगत करण्याशी जोडण्याची आवश्यकता आहे. लघु उदयोजकांना मदत करण्याचे कार्य करणाऱ्या सहाय्यक अशासकीय संस्थांसारख्या संघटनांना प्रोत्साहित करण्याची आवश्यकता आहे. गरिबांसाठी रोजगार संधींचा विस्तार औपचारिक पर्यटन क्षेत्रातील गुंतवणूकदार आणि प्रचालक या स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्याप्रती वचनबध्द असली पाहिजे. सामूहिक समुदायाचे उत्पन्न पर्यटक व प्रचालकांवर कर आकारणी करून, अशा उद्योगांच्या समभागामध्ये भागिदारी की, ज्यामध्ये समुदायाचे व्यवहार आहेत, खाजगी प्रचालकांद्वारे भाडेपट्टाकराराचे शुल्क आणि पर्यटकांकडून डोनेशन घेऊन वृध्दींगत करता येईल. तरी देखील सक्षम, उत्तरदायी, पारदर्शक समुदाय संघटना विकसित करण्याची आवश्यकता आहे. जेणेकरून सामुदायिक उत्पन्नाचा दुरूपयोग होणार नाही. वृध्दींगत सामुहिक लाभ हे प्रत्यक्ष अर्जनकर्त्यांशिवाय अन्य लोकांना

देखील उपलब्ध करून देता येतील. **B) बिगर आर्थिक लाभ :-** बिगर आर्थिक लाभांमध्ये i) क्षमता निर्माण, प्रशिक्षण आणि सक्षमीकरण ii) गरिबांवरील पर्यटनाच्या पर्यावरणीय प्रभावाचे उपशमन करून आणि iii) पर्यटनाच्या सामाजिक व सांस्कृतिक प्रभावांचे निराकरण करून वृध्दी घडवून आणता येते. गरिबांजवळ पर्यटनापासून प्राप्त संधींचा लाभ उठविण्यासाठीचे आवश्यक असणारे ज्ञान आणि कौशल्ये असत नाही. त्यामुळे बिगर आर्थिक लाभ वृध्दींगत करण्याच्या हेतूने क्षमता निर्माण ही प्रमुख व्यूहरचना आहे. क्षमता निर्माणात गुंतवणूक अनिवार्य आहे.परंतु ही एक दीर्घकालीन प्रक्रिया आहे. त्यामुळे गरिबांना पर्यटक आणि पर्यटन उद्योगासंबंधीचे मूलभूत ज्ञान, व्यवसाय कौशल्याचे प्रशिक्षण आणि सक्षमीकरणासबंधात स्थानिक संस्थात्मक क्षमता निर्माण ज्ञान उपलब्ध करून देण्यावर मुख्य भर दिला पाहिजे. गरिबांच्या दृष्टीने लाभकारक पर्यटनाचे पर्यावरणीय स्थिरता हे एक महत्वाचे तत्व आहे. कारण पर्यटन गरिबांना त्यांच्या भूमिपासून विस्थापित करू शकते आणि भूमि या नैसर्गिक संसाधनाची अवनती घडून येते की, ज्यावर गरिब लोक अवलंबून आहेत. अंतिमत: पर्यटन व्यापक ग्रामीण विकास कार्यांशी जोडले जाण्याची आवश्यकता आहे. यामध्ये नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन कार्यांचा समावेश आहे. अशा प्रकारे स्थानिक पायाभूत सुविधा, आरोग्य देखभाल व माहिती आणि प्रसारणापर्यंत पोहोच यामध्ये सुधारणा करण्यासाठी व्यूहरचनेची आखणी व अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे. **C) धोरण/प्रक्रिया सुधारणा :-** धोरण/प्रक्रियात्मक सुधारणेसाठी i) सहभागास प्रोत्साहन ii) औपचारिक पर्यटन क्षेत्रात खाजगी क्षेत्राला स्थानिक लघु उद्योजकांबरोबर व्यवसाय भागीदारी iii) अधिक सहाय्यक धोरण आणि नियोजनाचा आराखडा तयार करण्यावर अधिक लक्ष्य देण्याची आवश्यकता. निर्णय घेण्याच्या प्रक्रियेमध्ये स्थानिक समाजाच्या भागिदारीस प्रोत्साहित करून भागिदारी वृध्दींगत केली जाऊ शकते. औपचारिक पर्यटनामध्ये खाजगी क्षेत्रास लघु उद्योजकांच्या उत्पादनासाठी (उदा. लॉजसाठी खरेदी करण्यात आलेल्या वस्तू व सेवा) अति उत्तम बाजार स्वरूपात कार्य करून व्यावयायिक भागिदारी वाढविण्याची आवश्यकता आहे. खाजगी कंपन्यांनी विशेषत: टूर ऑपरेटर आणि मध्यस्थांनी (Tour Operators and Agents) आपले पर्यटक (ग्राहक) स्थानिक समुदायातील लघु उद्योजकांकडे पाठविले पाहिजेत. स्थानिक विपणन जोडणी कौशल्ये आणि स्थानिक उद्योजकांच्या अनुभवीपणाचा (Expertise) विकास करण्याची औपचारिक पर्यटन क्षेत्राने जबाबदारी स्वीकारण्याची गरज आहे. धोरण आणि नियोजन संरचनेच्या माध्यमातून गरिबांच्या दृष्टीने लाभकारक पर्यटनामध्ये सशक्तता आणली जाऊ शकते. त्यामुळे मजबून अशा सुधारणांची अत्यंत आवश्यकता आहे.

**प्रभावी व्युहरचना :-** अधिक प्रभावी व्यूहरचनेत पुढील घटकांचा समावेश होतो. i) भागिदारी नियोजनास प्रोत्साहित करणे. ii) सरकारबरोबरील संवाद वाढविणे आणि छोटया उत्पादकांचा आवाज निर्माण करणे. iii) पर्यटन आणि अन्य क्षेत्रे (उदा. भूमि भाडेपट्टयाचा कालावधी, पायाभूत सुविधा स्थानिक नियोजन) या दोन्हीस सहाय्यक धोरणे व कायदे निर्माणासाठी सरकारी दबावगट तयार करणे. iv) स्थानिक संरक्षण प्राधिकाऱ्यास लक्ष्यित बाजार व पायाभूत सुविधा विकासात गुंतवणूक व विकासावरील प्रतिबंध हटविण्यासाठी त्यांचा दबावगट निर्माण करणे. v) आंतर-विभागीय नाविण्यास आणि समन्वयास प्रोत्साहित करणे. vi) राष्ट्रीय पर्यटन प्राधिकरणाबरोबर संबंध प्रस्थापित करणे. vii) गुंतवणूकदारांना प्रोत्साहित करण्यासाठी सवलती उपलब्ध करून देण्याच्या हेतूने सरकारी अधिकारांचा अवलंब करणे.

**महिलांची भागिदारी :-** सामान्यत: पर्यटन क्षेत्राने अर्थव्यवस्थेमधील अन्य क्षेत्रांच्या तुलनेत महिला श्रमबळास महिला उद्योजकता आणि महिलांच्या नेतृत्वाखाली महिला सहभागासाठी उत्तम संधी उपलब्ध करून दिली आहे. पर्यटन क्षेत्रात अद्यापही महिलांना अल्प वेतन दिले जात आहे. त्या अल्पशिक्षित आहेत आणि त्यांचे प्रतिनिधित्व देखील अल्पच आहे. या कारणामुळे पर्यटन त्यांना यशस्वीतेच्या संधी उपलब्ध करून देत आहे. गरिबांच्या दृष्टीने लाभकारक पर्यटन दृष्टीकोण हा महिलांचा विकास आणि त्यांच्या सक्षमीकरणाचे एक साधन बनला पाहिजे. महिला हया स्थानिक समाजामधील अधिक आरक्षित वर्गातील मोठा हिस्सा आहे. वर्ष २०१० च्या जागतिक पर्यटन अहवालात महिला भागीदारी वृद्धींगत करण्यासाठी शिफारशी देण्यात आल्याअसुन या आधारे निर्मित कार्यसुची स्विकारण्यात आली आहे. याद्वारे बाराव्या योजनेमधील समावेशी कार्यसूचींना प्रोत्साहित केले जाऊ शकेल.

पर्यटनाचा विकास करण्यासाठी विविध व्यूहरचनांच्या अंमलबजावणीमध्ये सर्व पणधारकांदरम्यान (Stakeholders) औपचारिक आणि अनौपचारिक संपर्क विकसित करणे आणि सरकारी पातळीवर समन्वय प्रस्थापित करण्याचा समावेश आहे. पर्यटन विकासासाठी राष्ट्रीय स्तरावरील विभागांदरम्यान आणि राष्ट्रीय व स्थानिक सरकारांमध्ये एक 'संपूर्ण सरकारी' कार्यसूचि बनविण्याची आवश्यकता आहे. जेणेकरून कार्यक्रमांमध्ये एककेंद्राभिमुखता आणि सहक्रिया (Convergence and Synergy) प्रस्थापित करता येऊ शकेल. स्थानिक लोकांच्या उपजिविकेमध्ये पर्यटन क्षेत्राच्या योगदानाबाबत सर्व पणधारक व सरकार या दरम्यान जागरूकता निर्माण करणे आणि त्यांना स्थानिक आर्थिक विकास व दारिद्रय निर्मुलनासाठी संयुक्तरित्या कार्य करण्यास भाग पाडण्याची आवश्यकता आहे.

देशात विशाल अशा पर्यटन संभावनीयतांचा लाभ घेतल्यास क्षमता निर्माणातील अडथळे आणि अपर्याप्त धोरणांद्वारे निर्मित बऱ्याच आव्हानांचे निराकरण करण्यास मदत होईल. या अडथळयांमध्ये अपर्याप्त परिवहन पायाभूत सुविधा, निवास, भूमि, विविध कर व उच्च करांचा समग्रभार, उद्योजकांसाठी अपर्याप्त वित्तीय संसाधने, कौशल्ये, पर्यटक आकर्षित स्थळांच्या आसपासची सुरक्षा व आरोग्य विषयक स्थिती आणि विविध मध्यस्थांद्वारे करण्यात आलेल्या कार्यांची एककेंद्राभिमुखता यांचा समावेश आहे. संघीय संरचनेमुळे ही आव्हाने आणखीनच वाढत जातात. धोरणांची आखणी आणि अंमलबजावणी करण्याचे उत्तरदायित्व हे सरकारी विविध पातळयांवर विभाजित करण्यात येते. सरकारी विविध स्तरांवर नेहमीच समन्वयाचा अभाव असतो.

**समारोप :-** पर्यटन क्षेत्रात बाराव्या पंचवार्षिक योजनेचा जलद, अधिक समावेशी, शाश्वत वृध्दीच्या उद्दिष्टांना साध्य करण्यास सहाय्यता करण्याचे सामर्थ्य आहे. हे क्षेत्र दारिद्रय निर्मुलाचे एक प्रभावी माध्यम आहे. तसेच ते गरिबांच्या वस्तू-सेवासंबंधात बाजार पोहोच नसण्याच्या शक्यतेचे उपभोक्त्यांना गरिबांच्या दारापर्यंत घेऊन जाऊन उपशमन करते. हे क्षेत्र मध्यस्थांची असणारी आवश्यकता कमी करते आणि वसुलीमध्ये सुधारणा घडवून आणते. परंतु या शक्यतेचा पूर्ण उपयोग हा तेव्हाच घेतला जाऊ शकतो की, जेव्हा मागणी आणि पुरवठा या दोहोंमधील अडथळयांना दूर करून भारतीय पर्यटन क्षेत्राच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मकतेमध्ये सुधारणा घडवून आणली जाते. गरिबांसाठी लाभकारी दृष्टीकोण हा केवळ नवीन पर्यटन उत्पादनांची निर्मिती करण्याशी संबंधित नाही तर तो मुख्यत: संसाधनांचे आणि संधींचे पुनर्वितरण करण्याशी संबंधित आहे. या संकल्पनेच्या उद्दिष्टांना प्रभावीपणे प्राप्त करण्यासाठी सरकारद्वारे एक सकारात्मक दृष्टीकोण स्वीकारला जाण्याची आवश्यकता आहे. कारण गरिब आणि वंचित वर्ग पर्यटन कंपन्यांबरोबर वाटाघाटी करण्यास सक्षम असत नाही. त्यामुळे प्राधिकाऱ्यांनी गरिब व उपेक्षित वर्गाच्या बाजूने आपले मत मांडून त्यांच्या हिताचा विचार केला पाहिजे.

References :-


1) Twelfth Five Year Plan (2012-2017), Planning Commission, Government of India, New Delhi. Volume-II, Page No. 373 to 381.

2) Twelfth Five Year Plan (2012-2017) (Hindi), Planning Commission, Government of India, New Delhi. Volume–II, Page No. 379 to 385, 394 to 395.

3) Economic Survey-2014-15, Ministry of Finance, Government of India, New Delh, Page No. 314, 315.

४) महाजन, दिक्षित (२०१३), ग्रामीण विकासाचे आयाम, राजवीर पब्लिकेशन, परभणी. पान नं. ९३.

५) योजना मासिक (मराठी), मे-२०१०, पान नं. १२, १३.




महाजन संजय बाबुराव कृष्णा कुटीर, रूम नं. ३०४, प्लॉट नं.१३५, सेक्टर- १ ई, कळंबोली. ता.पनवेल, जि.रायगड-४१०२१८.

*(**संजय महाजन** हे शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये महाविद्यालय, कळंबोली ता. पनवेल येथे सहाय्यक प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख म्हणून १-१२-१९९९ पासुन कार्यरत आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था, पर्यावरण, भारतीय जाती पध्दती इ. विषयांवर चार संदर्भग्रंथ प्रकाशीत झाले आहेत. तसेच राष्ट्रीय/ आंतरराष्ट्रीय परिषदेत व जर्नलमध्ये विविद विषयांवर संशोधनपर लेखन प्रकाशीत झाले आहे.)*

*संपर्कासाठी ईमेल* - sanjay.mahajan0106@gmail.com

# पर्यटन शैक्षणिक संस्थाचे माहेर घर ‘गोवा’

**- भावना गोखले**



**भारतातील विविध राज्यातील इतर पर्यटन स्थळांचा विचार केल्यास गोवा हे संपूर्ण राज्यचं पर्यटन स्थळ म्हणुन जागतिक नकाशावर चमकु लागले आहे. इतर पारंपारिक उद्योग जसे मत्स्यवयसाय, लघु आणि कुटीर उद्योगाबरोबरचं वाढता हॉटेल (लॉजिंग व बोर्डिंग) व्यवसाय विकासाच्या अंतिम चरणाशी येऊन ठेपला आहे. भारतीय पर्यटन विभागाचे संचालक अमेय अभ्यंकर यांनी सांगितल्याप्रमाणे विकास कृती आराखडयाची अंमलबजावणी योग्य प्रकारे झाल्यास गोवा नुसते पर्यटन स्थळ न राहता इतर अनेक पर्यटनाच्या शैक्षणिक संस्थाचे माहेर घर बनेल. यामुळे गोव्याच्या आर्थिक विकासाबरोबर इतर पर्यायी पर्यटन व्यवसायांना तेजी येऊन त्याचा सकारात्मक परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होईल.**

गेल्या पाच दशकांमध्ये संपूर्ण जगभरात ‘पर्यटन’ या विषयाची संकल्पनाच पूर्णपणे बदलली आहे. अर्थात त्यामुळे प्रवाशांना अतिशय सुखावह, आरामदायी सहलींचा लाभ होत असुन. एकदा का तुम्ही एखाद्या देशाला भेट देण्याचे ठरविले तर त्या देशाची इत्यंभूत माहिती देणाऱ्या असंख्य वेबसाईट्स घडविणाऱ्या अनेक संस्था आजमितीला कार्यरत आहेत. अर्थात ही सवलत आंतरराष्ट्रीय पर्यटन संघटनेमुळे उपलब्ध झाली आहे. आता पर्यटन व्यवसायाला पूरक ठरणारे सर्वच उद्योग देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठ्या प्रमाणावर हातभार लावत आहेत, हे लक्षात आल्यामुळे प्रवाशांचे व्यवस्थापन करणाऱ्यांच्याही व्यवसायात तेजी आली आहे. गेल्या पाच दशकांमध्ये पर्यटन व्यवसायामध्ये वेगवेगळ्या शाखा विकसित झाल्या आहेत.त्यामध्ये वैद्यकीय पर्यटन, साहसी, विज्ञान पर्यटन अशा विविध शाखांनी अनेक देशांच्या पर्यटन क्षेत्रामध्ये पाळंमुळं रूजवली आहेत. विशेष म्हणजे अशा विशिष्ट हेतूने केलेल्या पर्यटनाला अनेक देश प्राधान्याने सोयी आणि सुविधा पुरवितात. त्यामुळे पर्यटकांना कमी पैशात चांगल्या सुविधा मिळू शकतात. वैद्यकीय क्षेत्रामध्ये आधुनिक तंत्रज्ञान विकसित झाले आहे. नवनवीन उपचार पद्धतींचा अवलंब केला जात आहे. शस्त्रक्रियेसाठी आधुनिक यंत्रसामुग्री आता भारतात उपलब्ध आहे. त्यामुळे वैद्यकीय पर्यटनासाठी भारतात येणाऱ्या परदेशींची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. विशेष म्हणजे, वैद्यकीय आणि चित्रपट पर्यटनाच्या क्षेत्रात भारतातील ’गोवा’ या राज्याचे नाव जागतिक नकाशावर ठसठशीतपणे उठून दिसत आहे.

भारताच्या आर्थिक विकासाचा विचार केला तर पर्यटन व्यवसाय अतिशय महत्त्वपूर्ण आहे, आणि हाच उद्योग सातत्याने वृद्धी करतोय. या संदर्भामध्ये जागतिक प्रवासी आणि पर्यटन मंडळाने एक माहिती प्रसिद्ध केली; त्यानुसार सन २०१२ मध्ये ६.४ दशअब्ज रूपये महसूल भारताने पर्यटन व्यवसायातून जमा केला. देशांतर्गत उत्पन्नामध्ये या महसुलाचा ६.६ टक्के वाटा आहे. विशेष म्हणजे पर्यटनाला पूरक ठरणाऱ्या व्यवसायांमुळे ३९.५ दशलक्ष जणांना काम मिळाले. हे प्रमाण एकूण रोजगाराच्या ७.७ टक्के आहे. सन २०१३ ते २०२३ या दहा वर्षांच्या काळात पर्यटन क्षेत्राची प्रतिवर्षी ७.९ टक्क्यांनी वाढ होईल असा अंदाज तज्ज्ञांचा आहे. त्याच बरोबर आगामी दशकामध्ये पर्यटन क्षेत्रात प्रचंड वृद्धी अनुभवणाऱ्या देशांमध्ये भारताचा तिसरा क्रमांक असेल. भारतामध्ये सर्वात जास्त वृद्धी वैद्यकीय पर्यटन क्षेत्रामध्ये होत आहे. अलिकडे केलेल्या पाहणीत भारतात

केवळ वैद्यकीय कारणासाठी येणारे आणि आल्यानंतर उपचार घेवून प्रेक्षणीय स्थळे पाहणाऱ्या परदेशी पर्यटकांच्या संख्येत दरवर्षी सरासरी ३० टक्क्यांनी वाढ होत आहे. सन २०१५ अखेरपर्यंत वैद्यकीय पर्यटकांची संख्या ९५ अब्जांपर्यंत पोहोचेल असा अंदाज आहे. भारतात सन २०११ मध्ये आलेल्या परदेशी पर्यटकांविषयीची आकडेवारी पाहिली तर लक्षात येते की, वर्ष २०१० च्या ५.७८ दशलक्ष पर्यटकांच्या तुलनेत यावर्षी ६.२९ दशलक्ष पर्यटक भारतामध्ये आले. वर्षभरामध्ये पर्यटकांच्या संख्येमध्ये ८.९ टक्क्यांनी वाढ झाली. परदेशी पर्यटक भेट देणाऱ्या देशांच्या यादीमध्ये सन २०११ मध्ये भारत ३८ व्या क्रमांकावर होता. तर अमेरिकेचे परदेशी पर्यटक १६ टक्क्यांनी वाढले होते आणि इंग्लंडमध्ये विदेशी पर्यटक १२.६ टक्क्यांनी वाढले होते.

परदेशी प्रवाशांना आवडणारी राज्ये म्हणून महाराष्ट्र, तामिळनाडू आणि दिल्ली यांची नोंद २०११ मध्ये झाली आहे. तर देशातल्या प्रवाशांना उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेश, आणि तामिळनाडू या राज्यांमध्ये फिरायला जास्त आवडते, असे दिसून आले आहे. सन २०११ मध्ये चेन्नई, दिल्ली, मुंबई आणि आग्रा या शहरांना जास्तीत जास्त परदेशी प्रवाशांनी भेट दिल्याचे एका पाहणीमध्ये आढळून आले आहे. विशेष म्हणजे, परदेशी प्रवासी सर्वात जास्त कोणत्या शहराला भेट देतात, या संदर्भात केलेल्या पाहणीत चेन्नई शहराचा जागतिक पातळीवर ३८ वा क्रमांक लागतो. तर मुंबईचा ५० वा क्रमांक लागतो. त्यानंतर देशाच्या राजधानीचा म्हणजे दिल्लीचा ५२ वा क्रमांक लागतो. आग्रा या ऐतिहासिकदृष्ट्या महत्वाच्या शहराचा क्रमांक ६६ वा आहे तर कोलकात्याला जागतिक क्रमवारीत ९९ वे स्थान मिळाले आहे आहे. मात्र यानंतरच्या वर्षामध्ये परदेशी प्रवाशांची संख्या कमालीची घटली. विशेषत: युरोप, दक्षिण आशियाई देशांमधून येणाऱ्या प्रवाशांचा ओघ मंदावला.

ट्रव्हल अँड टुरिझम कॉम्पिटिटीव्हनेस रिपोर्ट २०१३ नुसार जगभरातल्या १४४ देशांपैकी भारत ६५ व्या क्रमांकावर होता. या अहवालानुसार देशांच्या किंमतींनाही क्रमवारी दिली आहे. त्यानुसार भारत २० व्या स्थानावर होता. तसेच भारतामध्ये तुलनेने हवाई सेवा चांगली असल्याचे मत या अहवालामध्ये नोंदवले आहे. हवाई सेवेच्याबाबतीत भारत ३९ व्या स्थानावर होता.

## गोव्याचे आकर्षण!

गोवा हे वास्तविक, भौगोलिकदृष्ट्या आकारमानाने अतिशय लहानसे राज्य आहे. परंतु पायाभूत सोयी, सुविधा, विकास आणि सांस्कृतिक वारसा यांच्या बाबतीत हे राज्य देशात क्रमांक एकवर आहे. विविध व्यापार व्यवसाय आणि इतर अनेक उपक्रम चालणाऱ्या राज्याला ४५० वर्षांची परंपरा आहे. गोव्याला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. पोर्तुगीजांचा प्रभाव आजही गोव्यावर दिसून येतो. पोर्तृगीजांच्या संस्कृतीप्रमाणेच तिथला विकास झाला आहे. विशेष सर्वात चांगली गोष्ट म्हणजे मिश्र आणि भिन्नभिन्न संस्कृतीमुळे गोव्यात प्रत्येक सण-समारंभामध्ये राष्ट्रीय एकात्मता साधली जाते.

भारतामध्ये गोवा प्रवाशांचे खूपच आवडते ठिकाण आहे. गोव्यातील कलांगूट, बागा, कोलवा, पालोम, अरंबोल आणि अंजुना हे समुद्रकिनारे प्रवाशांचे प्रिय आहेत. त्याचबरोबर सेंट फ्रान्सिस झेव्हियर, गोव्यातील जुने चर्च, मंगेशी आणि शांतादुर्गाचे मंदिर, अगौडा आणि छपोरा, दोना पावलो येथील सूर्यास्ताचे ठिकाण आदी...यांचे इथे येणाऱ्यांना आकर्षण असते. पणजी गोव्याची राजधानी आहे. मांडवी नदीच्या दक्षिण किनाऱ्यावर हे शहर वसले आहे. सुंदर नदीकिनाऱ्यामुळे पणजी शहराच्या सौंदर्यामध्ये अधिकच भर पडली आहे. पोर्तुगीजमध्ये 'पणजीम' असे या शहराचे नामाभिधान आहे. आणि त्याचा अर्थ आहे- ''पूर न येणारी भूमी''! इतर कोणत्याही राजधानीप्रमाणेच पणजी या शहराचीही काही वैशिष्ट्ये आहेत. अनेक व्यवसाय इथे गुण्यागोविंदाने चालत असले तरी पर्यटन हेच प्रमुख उत्पन्नाचे साधन इथल्या रहिवाशांचे आहे. समुद्रकिनाऱ्यामुळे नारळांच्या बागा इथे मोठ्या प्रमाणावर आहेत. तसेच मासेमारीचा मुख्य व्यवसाय इथल्या नागरिकांचा आहे. सागरी खाद्यपदार्थांवर प्रक्रिया करण्याच्या व्यवसायाला या भागात खूप प्रचंड वाव आहे. नारळापासून बनणाऱ्या इतर उपउत्पादनांचे विविध व्यवसाय कुटिरोद्योगामध्ये चालविले जातात. कुटीर उद्योगांचे प्रमाणही गोव्यात जास्त आहे. तसे पाहिले तर गोव्यात तुम्ही वर्षभरात कधीही जाऊ शकता. परंतु गोव्यातील एकात्मता अनुभवायची असेल तर फेब्रुवारी-मार्चमध्ये 'गोवा कार्निव्हल' असतो, त्यावेळी जाणे जास्त आनंददायी असते.

गोव्याच्या पर्यटनाविषयी भारतीय पर्यटन खात्याच्या गोवा विभागाचे संचालक अमेय अभ्यंकर यांनी दूरध्वनी

द्वारे विशेष माहिती दिली. आगामी चार ते पाच वर्षात पर्यटन क्षेत्रामध्ये गोवा भारतात क्रमांक एकवर येईल, अशा पद्धतीने गोव्याचा विकास करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. गोव्यामध्ये पर्यटन ही संकल्पना मध्यवर्ती ठेऊन एक कृति आराखडा तयार करण्यात आला असून येत्या ३ ते ६ महिन्यात हा आराखडा राज्याच्या विधिमंडळामध्ये मांडण्यात येणार आहे. पर्यटनाच्यादृष्टीने पूरक ठरणाऱ्या उद्योग व्यवसायांना आकर्षित करू शकणारा, त्यांना हितावह असा हा आराखडा आहे; असे अभ्यंकर यांनी सांगितले.

गोव्याच्या अर्थव्यवस्थेचा विचार केला तर पर्यटन हा व्यवसायच राज्याचा कणा आहे. त्यामुळे या क्षेत्राचा विकास केला तर आपोआपच रोजगार निर्मिती मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे. नवी दिल्ली, मुंबई यांच्या खालोखाल पर्यटक गोव्याला भेट देणे पसंत करतात, मुख्य म्हणजे गोव्यावर निसर्गाचा वरदहस्त आहे. निसर्ग आणि मानव या दोन्हींच्या संयोगाने विकासाच्या अमर्याद संभावना इथे आहेत. वारसा हक्क म्हणून जतन करण्यायोग्य घरकुले आहेत. वेगवेगळ्या प्रकारची प्रदर्शने इथे भरविले जातात.

भारत सरकारचे पर्यटन खाते आणि गोव्याचे पर्यटन महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने त्याचबरोबर खाजगी आणि सार्वजनिक सहभागातून विविध क्षेत्रात कामे करण्यात येणार आहेत. यामध्ये एरोनॉटिकल, 'हेलि-टुरिझम' विज्ञान आणि तंत्रज्ञानावर आधारित पर्यटन यांचा समावेश आहे. या सर्वस्वी नव्या योजनेनुसार नवीन उत्पादन आणि सेवेचा प्रारंभ करण्यात येणार आहे. गोव्यामध्ये संरक्षण खात्याने हेलिकॉप्टर निर्मिती केंद्र सुरू करण्याचा प्रस्ताव तयार केला आहे. लवकरच हा प्रकल्प आकाराला येणार आहे. राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था (एन आय टी) आणि भारतीय तंत्रज्ञान संस्था (आय आय टी) गोव्यात सुरू होणार असून, शिक्षण सेवेची गंगा आता गोवेकरांच्या दाराशी येणार आहे. विशेष म्हणजे वैज्ञानिक संशोधन संस्थाही गोव्यात स्थापण्यात येणार आहे. गोव्याच्या विकासासाठी केंद्र सरकारच्या अंदाजपत्रकामध्ये घसघशीत चार हजार कोटींची तरतूद करण्यात आली असल्याचे अभ्यंकर म्हणाले.

पर्यटन क्षेत्राचा विकास करावयाचा असेल तर हवाई सेवा उत्कृष्ट असली पाहिजे, हे ओळखून जगाच्या कानाकोपऱ्यातून कोठूनही ९५ टक्के थेट हवाई मार्गे गोव्याला जाता येईल, इतका प्रचंड विस्तार गोव्याच्या हवाई व्यवस्थेचा करण्यात येणार आहे. सध्या गोव्याला दरवर्षी पाच ते सहा लाख प्रवासी भेट देतात. प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेवून आणखी ३९४ हॉटेल्स उभारण्याची योजना या कृति आराखड्यात आखण्यात आली आहे. त्यामुळे जवळपास ७००० ते ८००० खोल्या प्रवाशांना उपलब्ध होऊ शकणार आहेत. बलुन्समध्ये हॉटेल, उभयचर पक्ष्यांचा प्रकल्प सागरी हवाई सेवा अशा अनेक योजना कृति आराखड्यामध्ये विकसित करण्यात येणार आहेत. अशी माहिती अमेय अभ्यंकर यांनी दिली.

सरकारने नवीन ई-व्हिसा धोरण अवलंबिले आहे. त्यामध्ये सुरुवातीला ४३ देशांचा समावेश करण्यात आला होता. आता आणखी १५० देशांनाही या धोरणामध्ये समाविष्ट करून घेण्यात येईल. ई-व्हिसा हे मोदी सरकारने उचललेले सर्वात चांगले पाऊल आहे. त्याचा फायदा पर्यटकांना नक्कीच होणार आहे. सध्या सरकारच्या एकूण महसुलापैकी २५ ते ३० टक्के उत्पन्न पर्यटन क्षेत्राशी संबंधित उद्योगातून मिळते. विपणन प्रोत्साहन धोरणानुसार भारतीय पर्यटन विभागातर्फे विविध प्रकारची प्रदर्शने भरविली जातात. रोड-शो केले जातात. जपान, हाँगकाँग, चीन, सिंगापूर यासारख्या देशांमध्ये तसेच जगात इतरत्रही भारतातील पर्यटन स्थानांची माहिती या प्रदर्शनांव्दारे दिली जाते.

बाहेरून येणाऱ्या प्रवाशांच्या सुरक्षेसाठी कोणती विशेष खबरदारी घेतली जाते, याविषयीही अमेय अभ्यंकर यांनी यावेळी माहिती दिली. गोव्यातील सर्व हॉटेल व्यवसायिक, प्रवासी मध्यस्थ तसेच सहल आयोजक, प्रवासी मार्गदर्शक, प्रवाशांसाठी असलेले टॅक्सीचालक आणि या सेवेत असणाऱ्या प्रत्येकासाठी गोव्यामध्ये जारी करण्यात आलेला सन २००१ चा कायदा लागू आहे. सर्वांना तो अनिवार्यही आहे. इथे प्रवाशांना कोणतीही सेवा द्यायची असेल तर, त्या प्रत्येक व्यक्तिला, संस्थेला, कंपनीला आधी आपली नोंदणी करावी लागते. सध्या ४५६ सुरक्षा रक्षक समुद्रावर तैनात असतात. जीवरक्षक नावाही तैनात ठेवण्यात आलेल्या असतात.याचबरोबर भारत सरकारने प्रादेशिक लष्करी दूरसंचार प्रणाली कार्यरत केली असून त्यांचे हजार ते दीड हजार जवान गोव्यात तैनात आहेत. याशिवाय आणखी सुरक्षा

म्हणून येत्या पाच वर्षात गोव्यातील सगळ्या सागरी किनाऱ्यांवर सी सी टी व्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत.

## साहसी पर्यटन

गोव्याची भौगोलिक रचना आणि मिश्र संस्कृती लक्षात घेवून इथे साहसी क्रीडाप्रकारांना तसेच धाडसी पर्यटनाला प्रोत्साहन देण्यात येणार आहे. अलिकडच्या काळात लोकांचा कलही अशा साहसी क्रीडा करण्याकडे वाढला आहे. गोव्याचा अथांग सागर लक्षात घेता समुद्रामध्ये ‘सागरी साहसी क्रीडा पर्यटनाची संकल्पना रूजवण्यात येणार आहे. अर्थात अद्याप ही योजना कशा पद्धतीने प्रत्यक्षात आणायची याविषयी प्राथमिक संकल्पना तयार करण्यात आलेली आहे. तिला अंतीम स्वरूप दिलेले नाही. गोव्यात पर्यटन व्यवस्थापनाचे विशेष प्रशिक्षण देणारी संस्था स्थापन करण्यात आली आहे. त्याव्दारे विशिष्ट क्षेत्राची निवड करून त्यामध्ये असणाऱ्या संधीचा लाभ कसा घ्यावयाचा, याविषयी विविध अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना या क्षेत्रात चांगले भविष्य घडविता येते. येथे येणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन वेळोवेळी दिले जाते.

## चित्रपट पर्यटन

गेल्या २० वर्षांपासुन म्हणजे वर्ष २००४ पासुन गोवा येथे भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालय आणि चित्रपट महोत्सव संचालनालया तर्फे, भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे आयोजन करण्यात येत असुन आशियातील सर्वाधिक चित्रपट महोत्सवांपैकी हा एक मानण्यात येतो. या महोत्सवाद्वारे जागतिक चित्रपटांना एक संयुक्त व्यासपीठ तर मिळतेच परंतु जागतिक पातळीवरील चित्रपटांचा अभ्यास या दहा दिवसाच्या कालावधीत करता येतो.

आंतरराष्ट्रीय स्तरावरील कलाकार, लेखक, दिग्दर्शक संगीतकार, पटकथा लेखक आदींचा सहभाग असलेला हा महोत्सव विविध सामाजिक, राजकीय, आर्थिक कौटुंबिक भावभावनांशी निगडीत संकल्पनेवर आधारित चित्रपट स्पर्धांचे आयोजन करीत असतो. गोवा राज्य सरकारने त्यांचे संपूर्ण सहाकार्य दरवर्षी देत असल्याने विविधांगी, नवनिर्मितीचे विविध जागतिक पैलु बघायला मिळतात. नॅशनल स्कुल ऑफ ड्रामा व अनेक व्यवसायिक चित्रपट शैक्षणिक संस्थांचे विद्यार्थी यामध्ये सहभागी होत असतात. यामुळे चित्रपट पर्यटनाला प्रोत्साहन मिळाले आहे व रोजगार निर्मिती दळवळणातर्फे महसुलात वाढ झाली आहे.

## गोव्यातील वैद्यकीय/ आरोग्यविषयक पर्यटन

वैद्यकीय पर्यटन हे नेहमीच पैसे वाचविण्याच्या दृष्टीने मदतगार ठरते. पर्यटन व्यवसायाशी सहकार्य करून विशेष वैद्यकीय तज्ज्ञांकडून शस्त्रक्रिया किंवा इतर आवश्यक ते उपचार घेता येतात. कॉर्पोरेट क्षेत्रातील कंपन्या आणि पर्यटन क्षेत्र यांच्या संयुक्त विद्यमाने ही सेवा खाजगी आणि सरकारी पातळीवर पुरविणे सहज शक्य आहे. अनेक विकसनशील देशांमध्ये अशा प्रकारच्या सेवेला आता मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन दिले जात आहे. विशेष म्हणजे आता पर्यटन आणि वैद्यकीय ही संयुक्त सेवा बनविण्याचे सरकारचे अधिकृत धोरण बनले आहे.

व्यवस्थापकीय कंपन्या परदेशातील वैद्यकीय पर्यटनाविषयी आर्थिक मदत तर

**प्रक्रिया शुल्क - भारतामध्ये आणि अमेरिकेमध्ये ( अमेरिकी डॉलर्स)**

| | अमेरिका | भारत |
|---|---|---|
| बोन मॅरो प्रत्यारोपण | २,५०,००० | ६९,००० |
| पित्ताशय प्रत्यारोपण | ३,००,००० | ६९,००० |
| हृदय शस्त्रक्रिया | ३०,००० | ८,००० |
| सांधेविषयक शस्त्रक्रिया | २०,००० | ६,००० |
| मोतीबिंदू शस्त्रक्रिया | २,००० | १,२५० |

## काही विशिष्ट निवडक शस्त्रक्रियांचे तुलनात्मक दर -

| प्रक्रिया | अमेरिका (डॉलर्स) | थायलंड (डॉलर्स) | सिंगापूर(डॉलर्स) | भारत (डॉलर्स) |
|---|---|---|---|---|
| हृदय शस्त्रक्रिया | १३०००० | ११००० | १८५०० | १०००० |
| हृदयाचा व्हॉल्व्ह बदलणे | १६०००० | १०००० | १२५०० | ९००० |
| अँजिओप्लास्टी | ५७००० | १३००० | १३००० | ११००० |
| हिप रिप्लेसमेंट | ४३००० | १२००० | १२००० | ९००० |
| हिस्टेरेक्टॉमी | २०००० | ४५०० | ६००० | ३००० |
| गुडघे बदलणे | ४०००० | १०००० | १३००० | ८५०० |
| स्पायनल फ्युजन | ६२००० | ७००० | ९००० | ५५०० |

**स्त्रोत** : ए एम ए , जून २००७

## काही विशिष्ट शस्त्रक्रियांचे तुलनात्मक दर -

| प्रक्रिया | अमेरिका (डॉलर्स) | इंग्लड(डॉलर्स) | भारत (डॉलर्स) |
|---|---|---|---|
| हृदय शस्त्रक्रिया (सीएबीजीद्ध | १००००० | ४३००० | ७५०० |
| संपूर्ण गुडघे बदलणे | ४८००० | ५२००० | ६३०० |
| हिप सरफेसिंग | ५५००० | ४८००० | ७००० |
| एल ए लॅपहिस्टेरेक्टॉमी | २२००० | २४००० | ४००० |
| लॅप कॉलिस्टेक्टॉमी | १८००० | २०००० | ३०० |
| स्पायनल डीकॉम्प्रेशन फ्यूजन | ६०००० | ६५००० | ५५०० |
| ओबेसिटी सर्जरी(गॅसट्रिक बायपास) | ६५००० | ७०००० | ९५०० |

**स्त्रोत**: वॉकहार्ड रुणालय

## सौंदर्यवर्धक शस्त्रक्रिया ( अमेरिकन डॉलर्समध्ये खर्च )

| प्रक्रिया | अमेरिका (डॉलर्स) | थायलंड (डॉलर्स) | सिंगापूर(डॉलर्स) | भारत (डॉलर्स) |
|---|---|---|---|---|
| चेहऱ्यात सुधारणा | २०००० | ४८०० | ६२५० | ३१०० |
| वक्षांचे सौंदर्य वाढविणे | १०००० | ३१५० | ८००० | २२०० |
| वक्षांचा आकार कमी करणे | १०००० | ३९०० | ८००० | ३००० |
| डोळ्यांच्या पापण्यांची शस्त्रक्रिया | ७००० | १४०० | ३७५० | २२०० |
| लायपोस्कशन | १०००० | २१०० | ५००० | २५०० |
| नाकाची शस्त्रक्रिया | ७३०० | ३८५० | ४४०० | १८०० |
| पोट कमी करणे | ८५०० | ४०५० | ६२५० | ३४०० |

**स्त्रोत** : हेल्थबेस डॉट कॉम

पुरवतातच तसेच इतर माहितीही देतात. भारतामध्ये कोठे, कोण कोणत्या प्रकारच्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध आहेत. योग्य त्या प्रमाणित वैद्यकीय तज्ज्ञांपर्यंत परदेशी प्रवाशांना पोहोचविण्याचे महत्वाचे कार्य करणाऱ्या प्रशिक्षित व्यक्तिंची जरूरी या क्षेत्रात आहे. विशेष म्हणजे ही आवश्यकता भारतामध्ये चांगल्या पद्धतीने पूर्ण होते आहे. वैद्यकीय कारणांसाठी येणाऱ्या प्रवाशांना माहितीजालाच्या माध्यमातून ताबडतोब परदेशातील तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्लाही घेणे शक्य असते. ही सुविधा भारततही उपलब्ध आहे. याचबरोबर वैद्यकीय कारणासाठी येणाऱ्या प्रवाशांना व्हिसा मिळण्यात कोणतीही अडचण येणार नाही, याची काळजी घेतली जाते. एकूणच भारतामध्ये अतिशय परवडणाऱ्या किंमतीमध्ये वैद्यकीय सुविधा परदेशी प्रवाशांना उपलब्ध करून दिल्या जातात.

भारताने २००२ मध्ये राष्ट्रीय आरोग्य धोरण निश्चित केले. त्यामध्येही परदेशी प्रवाशांवर उपचार करून भारत मोठ्या प्रमाणात परकीय चलन मिळवू शकतो, याचा विचार करूनच वेगवेगळ्या योजना आखण्यात आल्या आहेत.

भारताचे आरोग्य आणि वैद्यकीयविषयक नेमके कसे धोरण आहे, तसेच परदेशी प्रवाशांना उपचार, शस्त्रक्रिया, अवयव प्रत्यारोपण याविषयी कमीत कमी खर्चात कोणत्या सुविधा, सोयी मिळू शकतात; याविषयी सर्व माहिती www.Cheoke/hebpeJevelehes या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

कोणत्या वैद्यकीय उपचारांसाठी भारतामध्ये आणि अमेरिकेमध्ये अंदाजे किती खर्च येतो याचा तुलनात्मक तक्ता इथे देण्यात आला आहे.

गोवा वैद्यकीय पर्यटन विभागाने पणजीमधल्या प्रमुख रुग्णालयांमध्ये आरोग्य सेवा सुरू केली आहे. गोव्यात आगामी वर्षात वैद्यकीय कारणांसाठी येणाऱ्या प्रवाशांच्या संख्येत प्रचंड वाढ अपेक्षित आहे. सागरी किनारी सुट्टी घालवायची आणि त्याचबरोबर कमी खर्चात औषधोपचार करून घेण्याकडे परदेशी लोकांचा कल वाढतो आहे. अमेरिकेत चेहऱ्यावरील सुरकुत्या कमी करून घेण्यसाठी वीस हजार डॉलर्स खर्च करावे लागतात. तेच काम भारतात, गोव्यात फक्त तीन हजार शंभर डॉलर्समध्ये होते. इतर कोणत्याही शस्त्रक्रियांच्या खर्चाची तुलना केली तर लक्षात येते की, युरोप आणि अमेरिकेपेक्षा वीस टक्के तर अफ्रिकेतील देशांपेक्षा २५ ते ३० टक्के कमी खर्च भारतामध्ये येतो. ज्या शस्त्रक्रियेला गोव्यामध्ये पाच हजार डॉलर्स लागतात त्याच शस्त्रक्रियेला युरोप किंवा अमेरिकेत २५ हजार डॉलर्स रूग्णांना द्यावे लागतात. तर जवळपास १५ ते १८ हजार डॉलर्स अफ्रिकेत द्यावे लागतात, अशी माहिती डॉ. परेरा यांनी नमूद केली आहे. हे सर्व करत असतांना अस्तित्वात असलेल्या सेवा सुविधा, कुशल कर्मचारी, कामगार आणि वैद्यकीय तज्ञ यांची उपलब्धता किती व त्यांचा उपयोग कसा करुन घेता येईल हे लक्षात घेणे आवश्यक आहे अन्यथा परदेशी रुग्णांद्वारे संक्रमीत रोगांचे प्रमाण वाढून इतर गंभीर बाबी निर्माण होतील. सामाजिक आरोग्य जागरुकता आवश्यक.

**निष्कर्ष**

विशिष्ट ठिकाणी विशिष्ट कामासाठीच प्रवास करायचा आणि लाभ घ्यावयाचा याकडे आता प्रवाशांचा कल वाढत आहे. हे लक्षात घेवून सरकारनेही त्यासाठी योग्य ठरणाऱ्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यास प्रारंभ केला आहे. अर्थात प्रत्येक प्रवासी ठिकाणाची बलस्थाने ओळखून तेथे सोयी करणे आवश्यक आहे. संशोधकांसाठी तर गोवा परिसरामध्ये असंख्य संधी आहेत. विज्ञान, सागरी जनजीवन, समुद्र किनारा सांस्कृतिक वारसा, विज्ञान केंद्र यांची उदंड उपलब्धता आहे. त्यामुळे देशविदेशातले प्रवासी इथे येऊ इच्छितात. हे लक्षात घेऊन नवनवीन उद्योग व्यवसाय वृद्धीच्या अमाप संधी इथे आहेत.

विकासाच्या नवीन संधी स्वीकारून राष्ट्रीय उत्पन्न वाढीस हातभार लावणे शक्य आहे. यासाठी जनतेचा सक्रिय सहभाग अत्यंत आवश्यक आहे.

**संदर्भ -**

www.Indiatourism.com
wikipedia
Travel & Tourism Competative Report 2013.
Mediatourism.com
Assocham Report 2014-15

*(**भावना गोखले** या भारतीय माहिती सेवेच्या वरिष्ठ अधिक५ारी असुन सध्या योजना मासिकाच्या संपादक आहेत.)*

**संपर्कासाठी ईमेल** -
myojanadpd@gmail.com

# भारतातील पर्यटन क्षेत्राचा आढावा - उत्कृष्ठ पर्यटन विकास

**- रत्नदीप बॅनर्जी**




**''भारत - जागतिक पर्यटकांसाठी आकर्षक केंद्र'' असुन प्राचिन इतिहासात तिर्थयात्रा, व्यापार याद्वारे करण्यात आलेल्या पर्यटनाचे दाखले येथील संस्कुती, कला यामधुन मिळतात कारण हे पर्यटक जसे भारतीय संस्कुती सेवांबद्दलची माहिती स्वदेशात देतात त्याच प्रमाणे आपल्या संस्कुतीची छाप अनाहुत पणे भारतात सोडतात या आदानप्रदानातुन विविध पर्यटन क्षेत्रे विकसीत झालीत आणि व्यवसाय म्हणुन कार्यरत झालीत. भारतीय पर्यटनांचा विकास किती केव्हा व कुठल्या उपाय योजनांच्या अंमलबजावणीतुन झाला याही पेक्षा इतर देशांनी अवलंबविलेली विकास पद्धती आधुनिक तंत्रज्ञानयुक्त पर्यटन सेवांचा डोळसपणे विचार केल्यास भारतातील कमतरता दूर करता येतील.**

भारतातील आर्थिक स्थितीत झालेली सुधारणा आणि येथील समृद्ध संस्कृती यामुळे भारताबद्दल जगभरात आदराची भावना निर्माण झाली आहे. तीर्थयात्रा करण्याची परंपरा समाजातील सर्व स्तरांमध्ये पूर्वापार असली तरी भारतातील नागरिक आपल्या उत्पन्नातील काही भाग आपली पर्यटनाची हौस पूर्ण करण्यासाठी खर्च करत असल्याने देखील त्यात वाढ झाली आहे. जागतिक आर्थिक मंचाच्या प्रवास आणि पर्यटनासंदर्भातील २०१३ सालच्या तुलनात्मक अहवालात भारताला आशिया-प्रशांत महासागर क्षेत्रात सांस्कृतिक वारशासाठी ११ वे स्थान, नैसर्गिक साधनसंपत्तीच्या बाबतीत ९ वे स्थान, सांस्कृतिक परंपरेच्यासंदर्भात २४ वे आणि एकूणच सर्व अर्थव्यवस्थांच्या तुलनेत ६५ वे स्थान देण्यात आले आहे.

पर्यटनाच्या क्षमतेचा जास्तीत जास्त फायदा कसा मिळवता येईल पर्यटनाशी संबंधित विविध क्षेत्रांचा एकात्मिक दृष्टिकोनातून विचार करण्याबरोबरच पर्यटन उद्योगाचा कायापालट करण्याची नितांत गरज आहे. पर्यटनाची प्रवृती ही सामाजिक भावभावनेतून निर्माण होते, त्यामुळे तशाप्रकारच्या सेवा देण्याच्या स्थितीत पर्यटनक्षेत्र असले पाहिजे आणि समाजातील सर्व स्तरांना त्याचा अनपेक्षित लाभ मिळाला पाहिजे.

२०१२-१३ मध्ये सादर करण्यात आलेल्या भारताच्या आर्थिक पाहणी अहवालामध्ये देण्यात आलेल्या, २००९-१० वर्षाच्या पर्यटनाशी अनुषंगिक आर्थिक माहितीतून (Tourism Satellite Account data) असे दिसून आले आहे की, भारताच्या एकूण देशांतर्गत उत्पादनामध्ये पर्यटनाचा वाटा ६.८ टक्के होता, ज्यापैकी ३.७ टक्के वाटा प्रत्यक्ष तर ३.१ टक्के वाटा अप्रत्यक्ष स्वरूपातील होता. रोजगार निर्मितीत देखील पर्यटन क्षेत्राचे योगदान लक्षणीय आहे. प्रत्यक्ष रोजगार निर्मितीत त्याचा सहभाग ४.४ टक्के आणि अप्रत्यक्ष सहभाग ५.८ टक्के होता. पर्यटन मंत्रालायानुसार, भारतात केलेल्या प्रत्येक दहा लाख रूपयांच्या गुंतवणुकीतून उत्पादन क्षेत्रात अकुशल रोजगारापासून विशेष कौशल्याची आवश्यकता असलेले ४५ रोजगार तयार होतात मात्र त्याच्या तुलनेत प्रवास आणि पर्यटन क्षेत्रात ७८ रोजगार निर्माण होतात याशिवाय महिलांना फार मोठ्या प्रमाणावर पर्यटनाचे फायदे देखील (रोजगार आणि लहान स्वरूपातील व्यापार संधी) मिळतात.

भारतात आलेल्या परदेशी पर्यटकांची (FTAs) संख्या २०१३ मध्ये ६० लाख ९७ हजार होती तर वर्ष २०१२ मध्ये हीच संख्या ६० लाख

५८ हजार इतकी होती. २०१३ मध्ये भारतात आलेल्या परदेशी पर्यटकांच्या संख्येतील वाढीचा दर २०१२ सालच्या तुलनेत ५.९ टक्के इतका होता तर २०१२ ला हाच दर २०११ च्या तुलनेत ४.३ टक्के होता. भारतासाठी २०१३ मधील पर्यटक वाढीचा ५.९ हा दर २०१३ मधील आंतरराष्ट्रीय पातळीवर झालेल्या प्रवाशांच्या संख्येतील ५ टक्के वाढीपेक्षा चांगला होता. सुमारे ९१ टक्के परदेशी पर्यटक हवाई मार्गाने तर अन्य परदेशी पर्यटक जमिनीवरून प्रवास करून भारतात आले. केवळ ०.५ टक्के पर्यटक सागरी मार्गांनी भारतात आले. भारतात आलेल्या एकूण परदेशी पर्यटकांपैकी सुमारे ५२.८ टक्के पर्यटक दिल्ली आणि मुंबई विमानतळांवर उतरले. २०१३ मध्ये भारतात सर्वाधिक संख्येने आलेल्या परदेशी नागरिकांमध्ये १५ देशातील नागरिक होते. त्यामध्ये अमेरिका, युनायटेड किंग्डम, बांगलादेश, श्रीलंका, रशियन संघराज्य, कॅनडा, जर्मनी, फ्रान्स, मलेशिया, जपान, ऑस्ट्रेलिया, चीन, सिंगापूर, थायलंड आणि नेपाळ या देशांचा समावेश होता. २०१३ मध्ये भारतात आलेल्या एकूण परदेशी पर्यटकांपैकी ७०.७२ टक्के पर्यटक याच १५ देशांमधील होते. संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक पर्यटन संघटनेने भारतातील पर्यटनाच्या वाढीचा दर २०१६ पर्यंत दरसाल ८ टक्के राहिल असा अंदाज वर्तवला आहे.

भारतातील देशांतर्गत पर्यटकांची संख्या २०१२ सालमधील १०४५.०५ दशलक्ष पर्यटकांच्या तुलनेत २०१३ मध्ये ११४५.२८ दशलक्ष इतकी होती. वाढीचा हा दर ९.६ टक्के होता.

परकीय चलनाचे उत्पन्न मिळवण्यात पर्यटन क्षेत्र कायमच महत्त्वाची भूमिका बजावत आले आहे. २०१३ मध्ये पर्यटन क्षेत्राच्या माध्यमातून १८.४५ अमेरिकी डॉलर इतके परकीय चलनाचे उत्पन्न (FEE) मिळाले होते. २०१२ मध्ये मिळालेल्या १७.७४ अमेरिकी डॉलर उत्पन्नाच्या तुलनेत ही वाढ ४ टक्के इतकी नोंदली गेली. २०१६ मध्ये परदेशी पर्यटकांची संख्या ११.२४ दशलक्ष, देशांतर्गत पर्यटकांची (DTVs) संख्या १४५१.४६ दशलक्ष, परकीय चलनाचे उत्पन्न (FEE) ३०.३ दशलक्ष अमेरिकी डॉलर असेल आणि एकूण २४.५ दशलक्ष रोजगार निर्माण होतील असा अंदाज आहे.

### क्षमता निर्मिती आणि कौशल्य विकासाचे उपाय

देशातील पर्यटन क्षेत्राला कुशल मनुष्यबळाची समस्या फार मोठ्या प्रमाणावर भेडसावते आहे. क्षमतानिर्मितीच्या या योजनेत मनुष्यबळाच्या प्रशिक्षण आणि प्रमाणीकरणासाठी आवश्यक असलेल्या संस्थात्मक पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा आणि त्यांचा दर्जा सुधारण्याचा विचार करण्यात आला आहे. इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट आणि फूड क्राफ्ट इन्स्टिट्यूट या सारख्या नव्या संस्था सुरू करण्यावर भर देण्यात आला आहे.

३१ जुलै २०११ पर्यंत राज्यस्तरिय १६ इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट आणि १३ फूड क्राफ्ट इन्स्टिट्यूटना मंजुरी देण्यात आली होती. अस्तित्त्वात असलेल्या सेवा पुरवठादारांच्या हितासाठी १५ राज्यस्तरिय इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटमध्ये कौशल्य तपासणी आणि प्रमाणीकरण सुविधा निर्माण करण्यात आली होती. पर्यटन मंत्रालयाच्या अहवालानुसार, या योजनेअंतर्गत २०१०-११ या कालावधीत ५५०० चे ध्येय असताना ९८६९ सेवा पुरवठादारांचे प्रमाणीकरण करण्यात आले.

भारत सरकारचा 'हुनर से रोजगार' हा आघाडीचा समजला जाणारा कार्यक्रम ८ वी इयत्ता उत्तीर्ण झालेल्यांना (२८ वर्षांपर्यंत वयाच्या) डोळ्यासमोर ठेवून अन्न उत्पादन तसेच अन्न आणि पेय (Food & Beverages) सेवा या क्षेत्रांचे प्रशिक्षण देण्यासाठी सुरू करण्यात आला आहे. हा कार्यक्रम राज्यांमधील निवडक सरकारी संस्था आणि काही विशिष्ट तारांकनप्राप्त हॉटेलांमध्ये पर्यटन मंत्रालयाने प्रायोजित केलेल्या इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट आणि फूड क्राफ्ट इन्स्टिट्यूटच्या माध्यमातून आयोजित करण्यात आला आहे. २०१०-११ मध्ये ५५०० युवकांना प्रशिक्षित करण्याचे उद्दीष्ट असताना प्रत्यक्षात ६९८१ युवकांना या कार्यक्रमाच्या अंतर्गत प्रशिक्षण देण्यात आले. यासाठी देण्यात आलेला ३५० कोटी रूपयांचा निधी ११ व्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या चार वर्षांमध्ये या योजनांद्वारे १०० टक्के उपयोगात आणण्यात आला. १२ व्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत अनेक धार्मिक

शृंखलांवर भर देण्यात आला. १२ व्या पंचवार्षिक योजनेत, गरीबांना आणि गरीबी निर्मूलनासाठी सातत्याने थेट फायदा होत राहिल अशा, गरीबांचे हित जोपासणाऱ्या पर्यटनाची गरज पूर्ण करण्यात आली आहे.

**जगातील भारताची स्थिती**

| | | |
|---|---|---|
| १. | आंतरराष्ट्रीय पर्यटकांच्या संख्येतील भारताचा वाटा | ०.६४% |
| २. | जगातून येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येनुसार क्रमवारीत भारताचे स्थान | ४२ |
| ३. | आंतरराष्ट्रीय स्तरावरील पर्यटनातील भारताच्या उत्पन्नाचा वाटा | १.५४% |
| ४. | जागतिक स्तरावर पर्यटनातून मिळणाऱ्या उत्पन्नानुसार क्रमवारीत भारताचे स्थान (रिझर्व्ह बँकेच्या अंदाजानुसार) | १६ |

**स्रोत** : पीएचडी चेंबर, ४ थे भारतीय वारसा पर्यटन संमेलन

**आशिया-प्रशांत महासागर क्षेत्रातील भारताची स्थिती**

| | | |
|---|---|---|
| १. | पर्यटकांच्या संख्येतील भारताचा वाटा | २.८१% |
| २. | पर्यटकांच्या संख्येनुसार क्रमवारीतील भारताचे स्थान | १२ |
| ३. | पर्यटनातून मिळणाऱ्या उत्पन्नातील भारताचा वाटा | ५.१४% अमेरिकी डॉलर |
| ४. | पर्यटनातून मिळणाऱ्या उत्पन्नानुसार क्रमवारीत भारताचे स्थान (रिझर्व्ह बँकेच्या अंदाजानुसार) | ८ |

**स्रोत** : पीएचडी चेंबर, ४ थे भारतीय वारसा पर्यटन संमेलन

## पर्यटनातील सहकार

स्थानिक समुदायांना त्यांच्या नैसर्गिक आणि सांस्कृतिक वारशाचे महत्व पटवून देत सहकाराच्या तत्त्वावर आधारित पर्यटनस्थळ व्यवस्थापन संघटनेच्या आदर्श प्रारूपाच्या माध्यमातून व्यावसायिकस्तरावर पर्यटनविषयक उपक्रम सुरू करण्यासाठी त्यांच्यात क्षमता निर्माण करून शाश्वत आर्थिक विकास घडवून आणणे हा सहकारी पर्यटन या संकल्पनेमागील हेतू आहे. हा व्यावसायिक उपक्रम केवळ जोडधंदा नसेल तर स्थानिक कला आणि संस्कृती जपण्यासाठी तसेच स्थापत्यकला, खाद्य संस्कृती, वेशभूषा इत्यादी परंपरा कायम राखण्यासाठी प्रोत्साहक (किंवा प्रेरणादायी घटक) ठरू शकेल.

चांगल्या संधी उपलब्ध असलेल्या पर्यटनस्थळांच्या परिसरात मिळत असलेल्या बहुतेक सोयीसुविधा या व्यक्तीगत खासगी प्रयत्नातून उभ्या असलेल्या सध्या बघायला मिळतात आणि परिणामी सामाजिक-आर्थिक फायदे समुदायांमधील फार मोठ्या प्रमाणात असलेल्या संबंधित घटकांपर्यंत पोहोचतच नाहीत असे दिसून येते. पर्यटन आणि त्याचे फायदे याबाबतीत जाणीव-जागृती अत्यल्प प्रमाणात असल्याने या क्षेत्रातील ग्रामीण उद्योजकतेची क्षमता विकसित होण्यात अडचण निर्माण होते.

ही दरी भरून काढण्यात सहकारी तत्त्वावरील आदर्श प्रारूप सहाय्यकारी ठरू शकते. व्यक्तीगत प्रयत्नातून एकहाती

कारभार करण्यापेक्षा सहकाराच्या माध्यमातून पर्यटनाशीसंबंधित सर्वप्रकारच्या सोयीसुविधा सहकारी संरचनेच्या एकाच छताखाली एकत्र येतात. त्यामुळे पर्यटनाशी संबंधित व्यवस्था आणि विविध घडामोडी यांच्यावर केवळ नियंत्रणच राहते असे नाही तर प्रत्येकाचे वेगवेगळे स्वतंत्र अस्तित्त्व राहण्याऐवजी संपूर्ण पर्यटनस्थळाचा नावलौकिक होण्याची खात्री निर्माण होते.

स्कॉटलंड सरकारच्या आंतरराष्ट्रीय विकास निधीच्या माध्यमातून आर्थिक मदत देण्यात आलेल्या भारतातील प्रकल्पांचे व्यवस्थापन यस बँकेकडे आहे. भारताच्या ग्रामीण भागात सहकारी तत्त्वावरील पर्यटन विकास प्रकल्प सुरू करण्याच्या शक्यता अजमावून बघण्याचे काम ते करतात. सहकारी तत्वावरील पर्यटनस्थळ व्यवस्थापन संघटनेच्या (CDMO) आदर्श प्रारूपाच्या माध्यमातून पर्यटनविषयक व्यावसायिक संधी निर्माण करण्यासाठी स्थानिक समुदायांमध्ये त्यांच्या नैसर्गिक आणि सांस्कृतिक वारशाबद्दल जाणीव-जागृती करून त्यांच्यात व्यावसायिक क्षमता निर्माण करून भारतातील सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या अतिमागास असलेल्या काही जिल्ह्यांचा शाश्वत आर्थिक विकास करण्याचा त्यांचा हेतू आहे. उत्तराखंड आणि पश्चिम बंगाल या राज्यांमधील असा प्रकल्प पूर्ण झाला आहे. देशभरात सहकारी तत्त्वावरील अशी यंत्रणा उभारण्यासाठी आराखडा तयार करण्यात येत आहे तसेच एका प्रदेशात आदर्श प्रारूप निर्माण करण्यासाठी उपयोगात आलेली कौशल्ये अन्य प्रदेशांमध्ये किती कार्यक्षमतेने उपयोगात येऊ शकतात हे तपासण्यात येत आहे.

## पायाभूत सुविधांबाबत पुढाकार

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दृष्टीकोनातून महत्त्वाची असलेली पर्यटनस्थळे आणि पर्यटनशृंखलांचा अतिव्यापक प्रकल्पांच्या माध्यमातून विकास करण्यासाठी मंत्रालयाने एक योजना सुरू केली आहे. त्याचबरोबर विकासाबाबत ध्येयलक्ष्यी दृष्टीकोन निर्माण करण्यासाठी रेल्वे, नागरी हवाईवाहतूक, रस्ते आणि महामार्ग वाहतूक, अन्नप्रक्रिया आणि शहरी विकास ही केंद्र सरकारची मंत्रालये तसेच संबंधित राज्य सरकारे यांच्याबरोबर काम करत आहे. आत्तापर्यंत ५३ अतिव्यापक प्रकल्प निश्चित करण्यात आले असून त्यापैकी ३५ प्रकल्पांना मंजुरीदेखील देण्यात आली आहे. पर्यटकांना परिपूर्ण आनंद मिळावा याकरिता या अतिव्यापक प्रकल्पांमध्ये सांस्कृतिक, वारसास्थळे, अध्यात्मिक आणि पर्यावरणाशी निगडित पर्यटनाचा दूरदर्शीपणे समन्वय साधण्यात आला आहे.

## वारसास्थळांचे पर्यटन

वारसा स्थळांच्या पर्यटनामध्ये नैसर्गिक वारसा, सांस्कृतिक तसेच ऐतिहासिक वारसा याबरोबरच भारतीय परंपरेचा गर्भितार्थ आणि खोलवर ठसा अनुभवास येतो. भारतीय समाजाच्या सर्व वर्गांमध्ये वारशाचा समयोचितपणा आणि सखोलपणा याबाबतची जाण निर्माण झाली पाहिजे. अतिशय लक्षवेधी रचना, भव्य इमारती, वैयक्तिक रूची असलेले काही धार्मिक पैलू या गोष्टी फार मोठ्या संख्येत लोकांना आकर्षित करून घेतात. परंतू आता भारतीयांचा दृष्टीकोन नव्याने तयार होत असल्याने आजूबाजूला असलेल्या वारसा ठिकाणांबद्दल आणि संस्कृतीबद्दल जाणून घेण्याची नवी आकांक्षा निर्माण झाली आहे. भारतात आत्ताच २८ जागतिक वारसास्थळे आहेत.

वारसास्थळांचा माग काढण्याची कल्पना अतिशय रोमहर्षक ठरू शकते. सन-एट-ल्युमिरी (Son-et-lumidre) या ऐतिहासिक विषयाशी संबंधित असलेल्या आणि खुल्या आकाशाखाली रात्रीच्या वेळी सादर केल्या जाणऱ्या फ्रान्समधील ध्वनी-प्रकाश कार्यक्रमाने आपल्या यशातून ते दाखवून दिले आहे. तेव्हाच्या समाजातील वातावरण पुन्हा निर्माण करण्याची गरज आहे. त्रिमीत आकृत्यांचा समावेश असलेली प्रतिकृती साकारणे हे अतिशय प्रभावी साधन आहे. अशा गोष्टींचा अनुभव हा चांगल्या संख्येने लहान मुलांचा समावेश असलेल्या पर्यटकांसाठी महत्वाचा ठरतो. मात्र या सगळ्यासाठी फार मोठ्या प्रमाणावर विद्वानांच्या सूचनांची आणि पोषक गुणवत्तेची गरज असते. त्यामुळे फार मोठ्या संख्येने असलेल्या तज्ञ आणि रचनाकार त्याचप्रमाणे वैज्ञानिक तंत्रज्ञांनी अतिशय जाणीवपूर्वक आपले योगदान दिले पाहिजे.

संगीत आणि नृत्य महोत्सव आणि साहित्य संमेलने हे सर्वांपर्यंत पोहोचण्याचे

योग्य मार्ग आहेत. या महोत्सवांची कक्षा पर्यटकांच्या समुदायाचे स्वरूप लक्षात घेऊन ठरवली पाहिजे. भारतात दरवर्षी तीनशेपेक्षा जास्त संमेलने भरतात. या संमेलनांचा आनंद लुटण्यासाठी इतर ठिकाणांहून देखील लोक येतात. मणिपूर राज्यात होणारा परंपरागत ''हॉर्स पोलो'', पशु-पक्षांच्या स्पर्धा, बैलगाडी शर्यती किंवा रथांच्या स्पर्धा पर्यटकांना आनंद देणाऱ्याच असतात. नौकानयन स्पर्धा (Regatta) या पर्यटकांसाठी जबरदस्त आकर्षण असते.

संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक पर्यटन संघटनेने केलेल्या अभ्यासात असे म्हटले आहे की -

- नष्ट होणाऱ्या किंवा जिर्णोद्धार/ बदल करण्यात येत असलेल्या आणि अप्रत्यक्ष संपत्ती असलेल्या सांस्कृतिक वारशाचे दस्तावेज तयार करण्यासाठी समुदाय, परंपरा जतन करणारे क्षेत्र आणि शैक्षणिक संस्था यांच्या सहकार्याने प्रकल्प सुरू करा.
- मूळ गाभा असलेल्या सांस्कृतिक मूल्यांचा अवमान करू नका.
- अप्रत्यक्ष संपत्ती असलेल्या सांस्कृतिक वारशातून निर्माण झालेल्या आणि स्मरणिका तसेच अन्य स्वरूपात (पारंपरिक संगीताच्या ध्वनीफिती, सीडी, खाद्यपदार्थ तयार करण्याच्या पद्धती, सौंदर्य प्रसाधने आणि औषधे अशासारख्या) उपयोग आणण्यात आलेल्या समुदायांच्या बौद्धिक संपदा हक्कांचे रक्षण करा.
- नव्याने पर्यटन सुरू करण्यासाठी आणि अप्रत्यक्ष संपत्ती असलेल्या सांस्कृतिक वारशाच्या आधारे वस्तूंचे उत्पादन करण्यासाठी, सध्या अस्तित्वात असलेल्या उत्पादनांची उपलब्धता वाढवण्यासाठी आणि उत्पादनांचे विपणन जबाबदारीने करण्यासाठी धोरण निश्चित करण्याकरिता संबंधित घटकांबरोबर काम करा.

## ग्रामीण पर्यटन

देशातील नागरिकांबरोबरच जगभरातील लोकांना आकर्षित करू शकते इतकी भारतातील ग्रामीण परंपरा संपन्न आणि विलक्षण आहे. ही अतिशय गुंतागुंतीची आणि विस्तृत प्रक्रिया आहे. पर्यटक आणि स्थानिक नागरिक यांच्यातील संवाद हा परस्परांना समृद्ध करणारा अनुभव आहे.

केरळ आणि हिमाचल प्रदेशच्या काही विशिष्ट भागांमधील ग्रामीण पर्यटनाने आपली स्वत:ची खास ओळख निर्माण केली आहे. गुजरातला जर सोळा प्रकारची भडक रंगसंगती असलेल्या आपल्या कशिदाकारीचा गौरव वाटत असेल तर ग्रामस्तरावरील परिषद, सरकारी संस्था किंवा स्वयंसेवी संस्थाच्या माध्यमातून हस्तकौशल्य असलेल्या वर्गाला प्रशिक्षण दिले पाहिजे. यजमान आणि कारागिरांना त्यांच्या लोकसाहित्याची अधिक माहिती करून दिली पाहिजे. पर्यटकांच्या निवासाची व्यवस्था जर स्थानिकांच्या घरातच असेल तर यजमानांना आरोग्याच्यादृष्टीने अहितकारक असलेल्या जर काही सवयी असतील तर एक चांगला यजमान बनण्यासाठी त्यांनी त्या सोडून देण्याची गरज आहे. त्या परिसरात जर डासांची समस्या असेल तर आरोग्य विभागाने ती दूर करण्यासाठी धूर, फवारणीसारख्या उपाययोजना केल्या पाहिजेत. त्याचबरोबर अशा भागातील स्वच्छता व्यवस्था सुव्यवस्थित केल्या पाहिजे. तेथे रूग्णवाहिकेसह आरोग्यकेंद्र असण्याची गरज आहे. गुंडांचा प्रभाव असलेल्या भागात कठोर उपाययोजना केली पाहिजे.

पर्यटकांची जेव्हा लूटमार होते तेव्हा त्याचा सर्वाधिक वाईट परिणाम पर्यटनावर होतो. चापलूस यजमान आणि लोभी गाईड यांच्यामुळे पर्यटकांच्या मनामध्ये घृणा निर्माण होते. अशी कृत्ये रोखण्यासाठी सर्वंकष उपाययोजना करण्याचा प्रयत्न करण्यावर भर दिला पाहिजे. आपल्या वाईट परिस्थितीचे प्रदर्शन करून पर्यटकांकडून गोष्टी फुकट पदरात पाडून घेणाच्या वृत्तीमुळे सरळ स्वभावाचे पर्यटक दुखावले जातात. पर्यटकांचे सर्वेक्षण करू शकेल अशी स्थानिक मध्यस्थ संस्था अशा भागात नेमली पाहिजे. ग्रामीण भागात पर्यटकांची निवास व्यवस्था आपल्या घरात करणाऱ्या व्यक्तींनी त्यांच्या पाहुण्यांबाबतची माहिती संबंधित संस्थेला दिली पाहिजे.

ग्रामीण समाजाला मिळणाऱ्या सामाजिक-आर्थिक फायद्यांमुळे परिस्थितीला कंटाळून ग्रामीण भागातून शहरांमध्ये येणारे माणसांचे लोंढे थांबवता येऊ शकतात. पर्यटन मंत्रालयाने आत्तापर्यंत २८ राज्य/ केंद्रशासित प्रदेशातील १५३ पर्यटन प्रकल्पांना मंजुरी

दिली आहे. त्यामध्ये क्षमता निर्मितीसाठी संयुक्त राष्ट्रांच्या विकास कार्यक्रमाचे (UNDP) पाठबळ असलेल्या ३६ ग्रामीण ठिकाणांचा समावेश आहे. भारतीय आदिवासी सहकारी पणन विकास महासंघ मर्यादित (TRIFED) आणि हस्तकलेच्या निर्यातीला प्रोत्साहन देणारी परिषद यासारख्या संस्था या कामामध्ये मौलिक भूमिका पार पाडू शकतात.

## साहसी पर्यटन

साहसी पर्यटनाच्या क्षेत्रात झालेली वेगवान वाढ ही १९९२ सालानंतरच्या आर्थिक वाढीचे काही प्रमाणात वैशिष्ट्य ठरू शकते. विशेषत: नव्या सहस्त्रकाच्या सुरवातीच्या काळात माहिती तंत्रज्ञान क्षेत्राची फार मोठ्या प्रमाणात वाढ झाली. त्यामुळे झालेल्या आर्थिक वाढीमुळे प्रवाशांच्या, विशेषत: अशा गोष्टींकडे स्वाभाविकपणे खेचल्या जाणाऱ्या आणि मोठ्या प्रमाणात प्रवास करण्याची प्रवृत्ती असलेल्या युवक वर्गाच्या खर्च करण्याच्या क्षमतेत वाढ झाली आहे.

## सरकारचा पुढाकार

पर्यटन मंत्रालयानेदेखील वेगळेपणा असलेल्या, विशेषत: साहसी पर्यटनामध्ये शाश्वत आणि व्यक्तीगत जबाबदारी असलेल्या नवनवीन पर्यटन प्रकारांची भर पडत असल्याने या क्षेत्राचे सामर्थ्य मान्य केले. निसर्गाशी जवळीक साधणाऱ्या उपक्रमांच्या माध्यमातून साहसी पर्यटनाने सामाजिक-सांस्कृतिक त्याचप्रमाणे नैसर्गिक वातावरण यांच्यावर किमान परिणाम होईल यावर लक्ष्य केंद्रीत केले आहे.

भारतातील पर्यटनाच्या उपक्रमांमध्ये विविधता आणण्याच्या धोरणानुसार देशात साहसी पर्यटनाच्या विकासाकडे विशेष लक्ष देण्यात येत आहे. साहसी सफरी आयोजित करणाऱ्यांना मान्यता देण्यासाठी पर्यटन मंत्रालयाने यापूर्वीच मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत. ही स्वैच्छिक योजना असून सर्व विश्वासार्ह साहसी सफर आयोजकांसाठी ती खुली आहे. साहसी पर्यटनस्थळांबरोबरच सर्वच पर्यटनस्थळी पर्यटनासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी केंद्र सरकारने विविध राज्य सरकार/ केंद्रशासित प्रदेशांच्या प्रशासनाला आर्थिक मदत देऊ केली आहे.

मंत्रालयाने भारतासाठीचे शाश्वत पर्यटन निकष (STCI) जागतिक शाश्वत पर्यटन निकषाशी (GSTC) संलग्न देखील केले आहेत. विपणन आणि प्रोत्साहनाच्या आघाडीवर अतुल्य भारत मोहिमेने साहसी आणि निसर्गावर आधारित उपक्रमांचा आपल्या प्रचारात वाढत्या प्रमाणावर उपयोग केला आहे. तसेच ऑस्ट्रेलिया आणि न्यूझिलंड सारख्या लक्ष्यकेंद्रीत बाजारपेठांमध्ये "रोड शो'' सुरू केले आहेत.

धोरणात्मक दृष्टिकोनातून विचार केला तर पर्यटन मंत्रालयाने प्रमाणीकरणासाठीची मार्गदर्शक तत्त्वे लागू केली आहेत. ज्यामध्ये सेवा पुरवठ्याबरोबरच सुरक्षाविषयक मार्गदर्शन आणि पर्यावरण संरक्षण यांच्याशी संबंधित मुद्दांवर अधिक प्रमाणात भर देण्यात आला आहे. अर्ज करण्याची आणि मंजुरी देण्याची यंत्रणा सुलभ आहे. मंजुरी देण्यात आलेल्या आयोजकांची यादी सार्वजनिकरित्या मिळू शकते. सेवा पुरवठादारांच्या क्षमता निर्मितीसाठीच्या योजनेच्या (CBSP) छताखाली सुरू करण्यात आलेल्या पर्यटन मंत्रालयाच्या 'हून्नर सें रोजगार' या योजनेत साहसी पर्यटन क्षेत्रासाठी मनुष्यबळ एकत्र आणण्यासाठी विविध शीर्षकांखालील कार्यक्रमांचा विचार करण्यात आला आहे.

संरक्षण मंत्रालयाने २००९ मध्ये साहसी पर्यटनासाठी जम्मू आणि काश्मीरच्या लेह भागातील आणखीन १०४ शिखरांवर चढाई करण्यासाठी परवानगी दिली. २०१२ मध्ये हिमाचल प्रदेशला साहसी पर्यटन स्थळांसाठीचे सर्वोत्तम राज्य "म्हणून गौरवण्यात आले. सरकार सध्या आशियाई विकास बँकेने दिलेल्या ४८२.२२ कोटी रूपयांच्या आर्थिक सहकार्याने विविध पर्यटन विकास प्रकल्प राबवित आहे. ज्यामध्ये परदेशी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या साहसी पर्यटनाचा विकास करण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. 'दी ग्रेट हिमालयन नॅशनल पार्क' ला देखील आता जागतिक नैसर्गिक वारसास्थळाच्या दर्जासाठी नामांकन देण्यात आले आहे.

## चित्रपट पर्यटन

चित्रपट पर्यटनामध्ये चित्रपट निर्मिती आणि चित्रीकरण तसेच चित्रपटामुळे चालना मिळालेले उपक्रम यांचा समावेश होतो. निर्मिती आणि वितरण या दोन्ही प्रक्रियांमध्ये कालावधीचा विचार

करता फार मोठ्या प्रमाणात प्रवास करावा लागतो त्याचबरोबर प्रवास करणारी माणसे आणि त्यासाठी आवश्यक असलेल्या सोयीसुविधा यांची संख्यादेखील खूप जास्त असते. त्यामुळेच चित्रपट विकास मंडळ आणि पर्यटन विकास मंडळाने चित्रपट निर्मात्यांना चांगले प्रस्ताव देण्याची गरज आहे. अमेरिका आणि युरोपमधील बहुतेक सर्व विकसित देशात स्थळ व्यवस्थापन संघटना (DMOs) वाढत्या प्रमाणावर चित्रपटांच्या चित्रिकरणासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात आणि त्यातून निर्माण होणाऱ्या व्यावसायिक संधींचा योग्यप्रकारे उपयोग करून घेण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत, त्याचबरोबर आर्थिक अपव्यव कमीतकमी व्हावा याचीदेखील काळजी घेत आहेत.

### सहनिर्मितीचा मार्ग

दोन्ही देशांमध्ये चित्रपटाच्या विषयाकडे जेव्हा राष्ट्रीय संपत्ती म्हणून बघितले जाते तेव्हा दोन देश एकत्र येऊन चित्रपटनिर्मिती करतात आणि त्यामुळेच करविषयक फायदे किंवा सवलती मागण्याची परवानगी दिली जाते. भारताचा जर्मनी, इटली, युनायटेड किंग्डम, न्यूझीलंड, ब्राझील आणि फ्रान्स या देशांशी चित्रपट निर्मितीसाठीचा सहकार्य करार आहे. त्यामुळे आता जाताना संहिता घेऊन जायची आणि परत येताना तयार झालेला चित्रपट घेऊन यायचे हे शक्य झाले आहे. परदेशी चित्रपट निर्मात्यांना फार थोड्या कालावधीत म्हणजे अगदी तीन आठवड्यात अनुमती देता येऊ शकते.

अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असलेल्या दहा चित्रपटांची निर्मितीपश्चात सेवा देणाऱ्या सुमारे दहा प्रक्रिया केंद्रांसह (post production labs) सुधारित पायाभूत सुविधा आणि पाठबळ देणारी व्यवस्था अस्तित्त्वात असल्याने, इंग्रजी भाषा बोलता येणारे तांत्रिक मनुष्यबळ विपुल प्रमाणात उपलब्ध असल्याने निर्मितीपश्चात सेवेसाठी भारत हे देखील प्राधान्य देण्यात येणारे ठिकाण आहे. ॲनिमेशन सॉफ्टवेअरच्या बाबतीत हे यापूर्वीच दिसून आले आहे. भारत हा आता जागतिक स्तरावर प्राधान्य दिला जाणारा आऊटसोर्सिंग हब मानला जातो. भारत हा एक असा देश आहे की जिथे फायदेशीर ठरणाऱ्या या तुलनात्मक गोष्टींशिवाय चित्रीकरण आणि निर्मितीपश्चात सेवा ही कामे निश्चितपणे सर्वात कमी खर्चात होतात व त्यामुळे येथे चित्रपटनिर्मिती करणे आर्थिकदृष्ट्या परवडते. प्रतिभासंपन्न कलाकार आणि तंत्रज्ञ यांना त्यांच्या कल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी पर्याय उपलब्ध आहेत. चित्रिकरण दिग्दर्शकापासून नेपथ्य रचनाकारापर्यंत सर्वजण निर्मात्याच्या हाकेला प्रतिसाद देण्यास आणि त्याचा शब्द झेलण्यास तयार आहेत. भारतामध्येच दरवर्षाकाठी एक हजार चित्रपट तयार होतात. भारतात कायद्याला सर्वोच्च स्थान आहे.

सरकारचे पाठबळ असलेल्या राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळ किंवा स्थानिक पातळीवरील एखाद्या व्यावसायिक संस्थेच्या माध्यमातून काम करणे देखील शक्य आहे. पीएचडी चेंबर, असोचेम किंवा फिक्की या सारख्या औद्योगिक संस्था भारतातील व्यावसायिक निर्मिती संस्थांची श्रेणीनुसार यादी तयार करून संदर्भासाठी मार्गदर्शक पुस्तिका म्हणून विविध देशांच्या उच्चायुक्तालयांना उपलब्ध करून देऊ शकतात.

### सरकारचा पाठिंबा आणि धोरणात्मक पुढाकार

भारतीय पार्श्वभूमी असलेल्या चित्रपटांचे सामाजिक-आर्थिक त्याचप्रमाणे सांस्कृतिक महत्त्व लक्षात घेऊन केंद्र सरकारने चित्रपट क्षेत्राला उद्योगाचा दर्जा दिला आहे आणि अनेक राज्ये चित्रपट निर्मात्यांना करांमध्ये सवलती आणि अन्य प्रोत्साहन देत आहेत. "अतुल्य भारत" या प्रसिद्धी मोहिमेला आणि अतुल्य भारत मोहिमेचे उप-व्यापारचिन्ह म्हणून चित्रपटाला विविध आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांमध्ये आणि परदेशी बाजारपेठांमध्ये प्रोत्साहन देण्यासाठी, माहिती आणि प्रसारण मंत्रालय आणि पर्यटन मंत्रालयाने २०१२ मध्ये चित्रपट पर्यटनाला पाठिंबा देण्यासाठी एक सहमती करार केला आहे.

पर्यटन मंत्रालयाने आपल्या केंद्रीय आर्थिक सहकार्य योजनेच्या अंतर्गत (CFA) चित्रपट पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य सरकारे आणि केंद्रशासित प्रदेशांच्या प्रशासनाला आर्थिक पाठिंबा देऊ केला आहे. देशाचा नावलौकिक वाढवण्यासाठी आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांचा देखील उपयोग करून घेण्यावर त्याचबरोबर केरळ

आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव, चेन्नई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव, कोलकाता आणि मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव या सारख्या कार्यक्रमांद्वारे राज्यांमध्ये चित्रपटनिर्मितीला प्रोत्साहन देण्यावर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे.

भारताच्या ईशान्येकडील राज्यांनी देशाचा ७.९ टक्के भौगोलिक भाग व्यापला आहे आणि देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ३.८ टक्के लोकसंख्या या राज्यांमध्ये वास्तव्यास आहे. निसर्गाने मुक्त हस्ताने उधळण करूनदेखील आसाम राज्याचा अपवाद वगळता पर्यटन, पर्यटकांच्या वर्दळीपासून हा भाग मोठ्या प्रमाणात दुर्लक्षितच राहिला आहे. या भागाबद्दल लोकांमध्ये असलेले एकतर्फी आकर्षण लक्षात घेऊन योग्य पद्धतीने जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि लोकप्रियता वाढवण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे.

२०१६ मध्ये देशात अंदाजे ११.२४ दशलक्ष परदेशी पर्यटक येतील, देशातील १४५१.४६ दशलक्ष पर्यटक विविध ठिकाणांना भेटी देतील, परकीय चलनाचे उत्पन्न ३३०.३ बिलियन अमेरिकी डॉलर असेल आणि एकूण २४.५ दशलक्ष रोजगार मिळतील असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. आपली परंपरा, वारसा हा देशातील पर्यटन उद्योगाचा मुख्य प्रेरणास्त्रोत असल्याने, पर्यटनाची निर्मिती व सेवा यांची निश्चिती, नियोजन आणि विकास याबाबत पर्यटन मंत्रालय, सांस्कृतिक मंत्रालय आणि इतर संबंधित मंत्रालये यांच्या सहकार्याने एकात्मिक आणि विविध संस्थांचा एकलक्ष्यी दृष्टिकोन असण्याची आवश्यकता आहे.

**संदर्भ :**

हेरीटेज टुरिझम - अ स्ट्रॅटेजिक पर्सपेक्टिव्ह; आयसीएआय-सीएमए अॅड पीएचडी चेंबर ऑफ कॉमर्स नॉलेज स्टडी सीरीज.

अॅडव्हेंचर टुरिझम इन इंडिया - स्टडी डन बाय एटीओएआय अॅड यस बँक.

फिल्म टुरिझम - स्टडी डन बाय फिक्की अॅड यस बँक.

डोमेस्टीक टुरिझम इन इंडिया - स्टडी डन बाय फिक्की अॅड आरआरसी.

डोमेस्टीक टुरिझम, इव्होल्यूशन, ट्रेंड्स अॅड ग्रोथ - स्टडी डन बाय फिक्की अॅड यस बँक.

इंडिया २०१३, टुरिझम अॅड हॉस्पिटॅलिटी - स्टडी डन बाय असोचेम अॅड यस बँक.

*(**रत्नदीप बॅनर्जी** हे प्रिन्ट आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमामध्ये फिलान्स जर्नेलीस्ट असुन त्यांनी आतापर्यंत देश विदेशच्या कला संस्कृती वर लिखाण केले आहे.)*

## प्रकाशन विभागाची नवी पुस्तके (हिंदी)

१. भारतीय दुर्ग- ₹ ४८५.००

२. जाने अपने जिगर की ₹ २०५/-

३. माऊंट एव्हरेस्ट की गाथा ₹ ११५/-

## प्रकाशन विभागाची नवी पुस्तके

१. छत्रपती शिवाजी महाराज (हिंदी) ₹ ९५/-


## अन्य काही पुस्तके

१. भारतेंदू हरिश्चंद्र (हिंदी) ₹ ११०/-

२. आपला राष्ट्रीय ध्वज (मराठी) ₹ ११०/-

# वैद्यकीय पर्यटन - भारतातील नवीन उदयोन्मुख व्यवसाय

**- डॉक्टर हरिहरन**




**नजिकच्या भविष्यात वैद्यकीय पर्यटनाद्वारे जरी १०० अब्ज डॉलर्सची आर्थिक उलाढाल होऊन भारताच्या परदेशी गंगाजळीत वाढ होणार असली तरी, वैद्यकीय पर्यटन हा नाजुक विषय आहे. आरोग्याशी निगडीत गोष्टींवर जेव्हा वैद्यकीय पर्यटनाचे दालन खुले करतो तेव्हाचं संभाव्य धोक्यांची जाणिव आपणास असायला हवी. वैद्यकीय उपचारासाठी आलेले विदेशी पर्यटकांच्या व्याधींच्या प्रसारणाचा धोका लक्षात घेऊन भारताची आर्थिक - सामाजिक स्थिती, येथील कुशल कामगांराची संख्या, वैद्यकीय पायाभूत सेवा या गोष्टींचाही विचार व्हावयास हवा.**

पर्यटन म्हणजे काय? याचा आपल्याला अगदी साधा, सोपा अर्थ अभिप्रेत आहे. कामाच्या धबडग्यातून बाहेर पडून; चार दिवस अगदी आरामात सुट्टी घालवायची. मौजमजा करायची; आणि प्रसन्नचित्त होऊन परतल्यानंतर दैनंदिन कामकाजाला सुरुवात करायची. परंतु आता काळाबरोबर पर्यटनाची संकल्पनाही बदलत चालली आहे. गेल्या काही दशकांपासून समाजात सर्वच स्तरावर आरोग्यविषयक जागृती मोठ्या प्रमाणावर झाली आहे. वैद्यकीय क्षेत्रामध्ये अनेक शोध लागले असून विशेषज्ञांची संख्या प्रचंड वाढली आहे. सामाजिक जागृतीबरोबरच वैद्यक क्षेत्रामध्ये पायाभूत सेवा-सुविंधामध्ये दर्जात्मक वाढही खूप चांगली झाली आहे. वैद्यकीय क्षेत्रामध्ये नव्याने विकसित झालेली शाखा म्हणजे- वैद्यकीय पर्यटन! याचा आरोग्य आणि पर्यटन यांची ज्या वेगाने वृद्धी झाली ती लक्षात घेवून प्रवासी कंपन्या आणि प्रसार माध्यमांनीच या शाखेचे 'वैद्यकीय पर्यटन' असे नामकरण केले आहे. अर्थ असा आहे की, जगातील कानाकोपऱ्यातून लोक पर्यटनासाठी एका देशातुन दुसऱ्या देशात (इथे त्याचा अर्थ भारतात) जातात त्याचवेळी तेथील विशेषज्ञांकडून वैद्यकीय सेवाही घेतात. भारतामध्ये दंतवैद्यकांकडे मोठ्या संख्येने पर्यटक रुग्ण येतात, तसेच इतर वेगवेगळ्या शस्त्रक्रिया करून घेणाऱ्या पर्यटकांची संख्याही दिवसेंदिवस वाढत आहे. त्याचबरोबर आता बरेच देशही आपल्या पर्यटन खात्याचा विकास चांगल्या पद्धतीने व्हावा, यासाठी पर्यटनाला वैद्यकीय क्षेत्राची जोड देण्याच्या योजना तयार करीत आहेत. भारतामध्ये वैद्यकीय पर्यटन हा प्रकार अधिक लोकप्रिय होण्यामध्ये आधुनिक त्याचबरोबर पारंपरिक वैद्यकीय व्यवसायही कारणीभूत ठरत आहेत, हे विशेष. या दोन्ही व्यवसायांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येते.

आधुनिक औषधोपचार पद्धती- यामध्ये सर्वसाधारणपणे मुखावाटे औषधे दिली जातात. त्याचप्रमाणे जरूरी असेल तर शस्त्रक्रिया करणे, सांधे बदलणे, एखाद्या अवयावाचे प्रत्यारोपण करणे, विविध प्रकारच्या निदान चाचण्या करणे, सौंदर्यवृद्धीसाठी शस्त्रक्रिया करणे आणि बहुवैशिष्ट्यपूर्ण वैद्यकीय काळजी घेणे, वंध्यत्व निवारणासाठी उपचार करणे, रक्ताविषयीचे आणि रक्तवाहिन्यांचे आजार यावर उपचार घेणे यासाठी वैद्यकीय पर्यटन मोठ्या प्रमाणावर केले जाते. अलिकडच्या काळामध्ये दात पुन्हा बसवणे, दातांसंदर्भात जबड्याची शस्त्रक्रिया करणे, लेसरच्या

सहाय्याने नको असलेले केस काढून टाकणे किंवा केसांचे रोपण करणे यासारख्या कारणांसाठी भारतात बरेच पर्यटक येतात. आता सौंदर्यवर्धनासाठी वेगवेगळ्या उपचारांसाठी येणाऱ्या परदेशी पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

**आयुर्वेद -** भारतामध्ये आयुर्वेद उपचार पद्धतीचा वापर गेली शकडो वर्षे करण्यात येतो. संपूर्णपणे नैसर्गिक घटकांचा वापर करून केले जाणारे उपचार हे आयुर्वेदाचे वैशिष्ट्य असून हे एक वैद्यकीय शास्त्र आहे. नाडीपरीक्षा करून शरीरामध्ये कोणता आजार आहे, हे वैद्य शोधून काढतात आणि उपचार करतात. शरीरामध्ये कायाकल्प घडवून आणण्याची क्षमता आयुर्वेद उपचार पद्धतीमध्ये आहे, हे आता सर्वांच्या लक्षात आले आहे. त्यामुळेच कोणताही दुष्परिणाम नसणाऱ्या या पद्धतीने उपचार घेण्याकडे लोकांचा कल गेल्या काही वर्षांमध्ये वाढत आहे.

**योग-** संस्कृत भाषेत योग म्हणजे जोडणे, एकत्रित करणे. योगाच्या दैवी शक्तीमुळे तुम्ही थेट देवत्वाशी जोडले जाता, असा अनुभव असंख्य लोकांना आला आहे. शारीरिक आणि मानसिक शिस्त, एकाग्रता साधून शास्त्रीय पद्धतीने योगाभ्यास केला तर तुम्हाला आत्मिक समाधान तर लाभतेच त्याचबरोबर मन-शरीर-आत्मा यांच्या एकात्मतेचा अनुभव येतो. योग आणि ध्यान, चिंतन हीच खरी भारताची जीवन पद्धती असल्याची ओळख बाहेर बनली.

आणखी पर्यायी औषधोपचारांच्या पद्धतीमध्ये होमिओपॅथी, निसर्गोपचार, ध्यान आणि संगीतोपचार, सुगंधोपचार (अरोमा), प्राणिक उपचार आणि रेकी यांचाही समावेश आहे.

भारतामध्ये या सगळ्या प्रकारांची उपचार पद्धतींची उपलब्धता मोठ्या प्रमाणावर आहे, त्यामुळे वैद्यकीय पर्यटन हा व्यवसाय अधिकाधिक वेगाने वाढत आहे. परदेशांमध्ये कोणत्याही वैद्यकीय उपचारांपूर्वी मोठ्या रकमेचा विमा उतरावावा लागतो. विम्याचा हा प्रचंड खर्च टाळण्यासाठी लोक वास्तव्य असलेल्या स्थानापासून दूर जाऊन उपचार करणे पसंत करतात. अनेक लोक पर्यटनासाठी म्हणून भारतात येतात आणि आपल्या व्याधींवर औषधोपचार करून घेतात. त्यांना कमी खर्चात भारतात उपचारही मिळतात. विशेष म्हणजे कमी खर्चाबरोबरच परदेशी नागरिकांना उपचारासाठी प्रतिक्षा यादी आहे, म्हणून थांबावे लागत नाही. अतिशय तज्ज्ञ, अनुभवी डॉक्टरांशी थेट संपर्क साधून ते उपचार घेवू शकतात. या सर्व कारणांमुळे भारतात संपूर्ण जगभरातून वैद्यकीय पर्यटनासाठी येणारे प्रवासी आहेत.

वैद्यकीय पर्यटनाबरोबरच भारताने ''अतिथी देवो भव'' ही संकल्पना परदेशी पर्यटकांसाठी मोठ्या प्रमाणावर राबविली आहे. देशामध्ये येणारा पाहुणा हा देवासमान आहे, आणि त्याला सर्वच्या सर्व आवश्यक त्या सोयी, सुविधा मिळाल्या पाहिजेत अशी व्यवस्था करण्यात आली आहे. यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश आहे.

विशेषज्ञांकडून उपचार, रुग्ण प्रवाशाला अतिशय आरामदायक वाटावे असे उपचाराचे स्थान, कमी किंमत, आणि प्रतिक्षेचा काळ कमी. याच बरोबर उपचारासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. सध्या भारतामध्ये उपचार घेणाऱ्या पर्यटकांमध्ये सर्वात जास्त प्रवासी अफ्रिका, मध्य पूर्व, अफगाणिस्तान, इराक आणि बांगलादेश या देशांतील आहेत. विकसित देशांपैकी युरोपीय देश आणि उत्तर अमेरिकेतून तुलनेने फारच कमी प्रवासी वैद्यकीय कारणासाठी येतात.

अलिकडच्या काळात अँजिओप्लास्टी, हृदयावरील शस्त्रक्रिया, सांध्यांचे प्रत्यारोपण, मोतीबिंदूसारख्या डोळ्यांच्या शस्त्रक्रिया, पित्ताशय, मूत्रपिंड अशा अवयवांचे प्रत्यारोपण, आयव्हीएफ, कर्करोग यांच्यावर उपचार घेण्यासाठी येणाऱ्यांची संख्या सातत्याने वाढते आहे. भारतात या गुंतागुंतीच्या रोगांवर उपचार करण्याची सुविधा आहेच; त्याचबरोबर आता विमा बाजार आणि औषधांचा बाजारही विस्तारला आहे. यामध्ये आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय तसेच पर्यटन मंत्रालय यांनी एकत्रित कार्याला प्रारंभ केला आहे.

भारतातील वैद्यकीय, आरोग्य सुविधा पर्यटन सेवा क्षेत्राचे जाळे आणि इतर घटक, या संदर्भात एस. डब्ल्यू. ओ. टी. यांच्यावतीने अलिकडेच पाहणी करण्यात आली आहे. सूक्ष्म विभागीय पर्यावरणीय नियोजनानुसार वैद्यकीय कारणांसाठी येणाऱ्या पर्यटकांना भारत म्हणजे स्वर्ग वाटतो. इथे मिळणारी सेवा, इथला आल्हाददायक निसर्ग, आधुनिकता

आणि पारंपरिकता यांची वैद्यकीय क्षेत्राने घातलेली सांगड यांच्यामुळे रुग्णाला अपेक्षेपेक्षा खूपच आराम लवकर मिळतो, असे पाहणीत दिसून आले आहे. भारतातील 'वैद्यकीय पर्यटन व्यवसाय' याविषयावर एक स्वतंत्र सॉफ्टवेअर विकसित करण्यात आले आहे. विशेष म्हणजे भारतीय उद्योग संघ (सीआयआय) आणि मॅककिन्से यांनीही वैद्यकीय पर्यटनाला भारतात फार चांगले दिवस येतील आणि नजिकच्या भविष्यात चांगले उत्पन्न देणारा हा व्यवसाय सिद्ध होईल, असा विश्वास व्यक्त केला आहे. भारताच्या एकूण आरोग्य, वैद्यकीय व्यवसायापैकी वैद्यकीय पर्यटकांमुळे ३ ते ५ टक्के उत्पन्न वाढण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. आजमितीला भारतात वैद्यकीय पर्यटनासाठी म्हणून येणाऱ्यांची संख्या प्रतिवर्षी ३० टक्क्यांनी वाढतेय. पश्चिम अशिया, मध्य पूर्व अफ्रिका या देशांतून सर्वात जास्त प्रवासी येत आहेत. त्याचबरोबर अमेरिका, युरोपमधूनही थोडेफार प्रवासी येत आहेत. ग्रीस, दक्षिण अफ्रिका, जॉर्डन, मलेशिया, फिलिपिन्स आणि सिंगापूर या देशांनी कशी 'स्मार्ट'पणाने प्रगती केली. अगदी त्याचप्रमाणे भारतात हा उद्योग विस्तारत आहे, असे म्हणता येईल.

परदेशी रुग्णांवर उपचार करणे म्हणजे 'निर्यात' करण्यासारखे आहे. त्यातून मिळणारे उत्पन्न हे निर्यातीतून मिळणाऱ्या उत्पन्नासारखे असून निर्यातीला देण्यात येणाऱ्या सवलतीही देण्यात येतील असे भारत सरकारचे धोरण आहे. भारताला वैद्यकीय पर्यटनामधून एक अब्ज ते दोन अब्ज (१.२५ ते २.५० अब्ज युरो) रूपयांचे उत्पन्न सरकारी आणि खाजगी क्षेत्रातील वैद्यकीय सेवांमुळे मिळेल असे वाटते. भारतामध्ये वैद्यकीय पर्यटन प्रतिवर्षी ३० टक्के या दराने वेगाने वाढत आहे. २०१५ पर्यंत या व्यवसायाची उलाढाल एक ते दीड दशलक्ष डॉलर्सपर्यंत वाढेल, असा अंदाज आहे. आता भारतातील उच्च शैक्षणिक संस्थांना फक्त संगणक तज्ज्ञ निर्माण करून चालणार नाही; तर अतिवेगाने विस्तारणाऱ्या वैद्यकीय पर्यटन क्षेत्राला आवश्यक ठरणारे २०,००० ते ३०,००० डॉक्टर्स आणि परिचारिका दरवर्षी पुरविण्याची जबाबदारी घ्यावी लागणार आहे. या क्षेत्रामध्ये सिंगापूर, थायलंड सारखे देश मोठ्याप्रमाणावर कमाई करतात. त्यांच्या स्पर्धेत भारताला टिकाव धरता आला पाहिजे. वैद्यकीय पर्यटनामुळे येत्या काही वर्षामध्ये ४० दशलक्ष नवीन नोकऱ्या उपलब्ध होऊ शकणार आहेत.

वैद्यकीय पर्यटनामुळे मोठ्या प्रमाणावर कोणत्या क्षेत्रात वृद्धी होईल, हे पाहणे नक्कीच उचित ठरेल.

**विपणन-** वैद्यकीय पर्यटनाची सेवा उपलब्ध करून देणाऱ्या रुग्णालयांना माहितीच्या महाजालामार्फत (इंटरनेट) विपणनाचे काम करावे लागणार, त्यासाठी 'फॅसिलिएटर' नियुक्त करावे लागतील. त्यांना बाहेरही जाऊन आपल्या रुग्णालयातील सेवा, सुविधांची माहिती गरजू व्यक्तिंपर्यंत पोहाचवावी लागेल. थोडक्यात काय अतिशय कार्यक्षम विपणन अधिकारी या क्षेत्राला लागतील.

भाषा सेवा- इंग्रजी न बोलणाऱ्या युरोपातल्या देशातून येणाऱ्या रूग्ण ग्राहकांची भाषेची अडचण सोडवावी लागेल. त्याच बरोबर पश्चिम अशियातील देशातील सर्वांनाच इंग्रजीची समस्या निर्माण होऊ शकते. रुग्णांचे आरोग्यविषयक प्रश्न व्यवस्थित समजण्यासाठी आणि त्यांना योग्य उपचार देण्यासाठी अनुवादकांची गरज भासणार आहे.

**कार्यालयामागची कार्ये -** फक्त कार्यालयात म्हणजे वैद्यकीय उपचार केले की, झाले असे होऊ शकणार नाही. इतरही अनेक गोष्टींसाठी सेवा पुरवाव्या लागतील. यासाठी उत्तम संवाद साधणारा आणि व्यक्तिश: संप्रेषण साधणारा कुशल कर्मचाऱ्यांचा एक स्वतंत्र समूह सदोदित तत्पर ठेवण्याची व्यवस्था रुग्णालयांना करावी लागेल.

व्यावसायिक आदरातिथ्य - जर आपण अतिशय चांगल्या दर्जाची वैद्यकीय सेवा देत असू तर तितक्याच उत्तमरितीने व्यावसायिक पद्धतीने आदरातिथ्यही पर्यटक रुग्णांचे केलेच पाहिजे. आदरातिथ्यामध्ये व्यावसायिकता अनिवार्य ठरणार आहे. इथे व्यवस्थापकीय कौशल्य दाखवलेच पाहिजे.

भारतामध्ये आरोग्यविषयक उद्योजकता वाढीस लागण्यामागे महत्वाचे कारण म्हणजे वैश्विक मानकाचा विचार करता, आपण त्याच्या जवळपास जात आहोत. भारतातील काही डॉक्टरांचे आणि मोठ्या रुग्णालयांचे परदेशात खूप चांगले नाव आहे. त्यांची नावे जागतिक वैद्यकीय

व्यवसायात खूप आदराने घेतले जाते. त्यांनी भारतीय वैद्यकीय व्यवसायाला जगामध्ये प्रतिष्ठा प्राप्त करून दिली आहे. परंतु भारतातील वैद्यकीय क्षेत्राचा सर्वात महत्वाचा घटक म्हणजे सर्वात स्वस्त सेवा! आणि या कमी किंमतीचा फायदा घेण्यासाठीच परदेशातले असंख्य रूग्ण भारतात येतात. भारतातील वैद्यकीय सेवा म्हणजे ''तिसऱ्या जगातील किंमतीत सर्वोच्च, प्रथम दर्जाची सेवा'' असे परदेशात मानले जाते.

**वैद्यकीय पर्यटनाचे लाभ/फायदे.**

- परकीय चलनातील मिळकतीमुळे देशाच्या आर्थिक संपत्तीमध्ये भर पडण्यास मदत.
- विकसित देशांच्या तुलनेमध्ये किंमतीमध्ये फायदा.
- माहितीचे आदान-प्रदान वाढण्यास मदत.
- रुग्णांची काळजी अधिक तत्परतेने घेतली जाऊ शकेल.
- रुग्णालयांना पुरवठा करणारी साखळी अधिक कार्यक्षमतेने काम करू लागेल.
- देशांतर्गत आणि देशांबाहेरच्या व्यावसायिक भागिदारांशी अधिक चांगल्या पद्धतीने व्यूहरचना करू शकतील.
- ज्ञान आणि तंत्रज्ञान यांचे आदान-प्रदान होईल.
- अंतर्गत आणि बाह्य क्षेत्रात सर्वोत्कृष्ट परिणाम देणे शक्य होईल.
- या क्षेत्रामध्ये अधिकाधिक रोजगार निर्माणाच्या संधी उत्पन्न होतील.
- आरोग्य, पर्यटन आणि प्रवास या क्षेत्रांमध्ये अधिक पायाभूत विकासाच्या संधी निर्माण होतील.
- दरडोई उत्पन्नामध्ये वाढ होईल.
- वैद्यकीय क्षेत्रातील समस्यांवर सर्वंकष संशोधन आणि विकास करण्यास अमर्याद संधी उपलब्ध होतील.
- आरोग्यविषयक सुविधा पुरविणारा देश म्हणून जागतिक स्तरावर मान्यता भारताला मिळेल.
- सामाजिक आणि मिश्र संस्कृतीचा अनुभव.
- आंतरराष्ट्रीय ग्राहकांशी संबंध


## Subscription Coupon

**[For New Membership / Renewal / Change of Address]**

I want to subscribe to :

**Yojana** : 1 Yr. **Rs. 100/-;** 2 Yrs. **Rs. 180/-;** 3 Yrs. **Rs. 250/-**

(Circle the period of subscription)

DD / MO No. ____________________ date ____________

Name (in block letters) : ____________________

Subscriber profile : Student / Academician / Institution / Others

Address : ____________________

____________________

____________________

PIN : □□□□□□

Please allow us 4 to 6 weeks to the despatch of the first issue.

P.S. : For Renewal / change in address, please quote your subscription number.

**DD किंवा MO Editor Yojana च्या नावे काढावा.**

प्रस्थापित होतील.

- स्पर्धेचा फायदा.
- रुग्णालय आणि आदरातिथ्य उद्योग यांच्यामध्ये अधिक चांगला समन्वय निर्माण होईल.
- वैद्यकीय पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी, सरकारचा ठाम पाठिंबा नाही.
- या उद्योगातील वेगवेगळ्या सहभागीदारांमध्ये समन्वय अजिबात नाही. म्हणजे हवाई सेवा पुरविणारे, उपाहारगृह आणि रुग्णालये यांच्यात समन्वय नाही.
- स्वच्छतेच्याबाबतीत अतिशय अनारोग्यकारक देश असे ग्राहकांचे असणारे मत.
- रुग्णालयांच्या सेवाशुल्कांमध्ये समानता नाही.
- थायलंड, मलेशिया, सिंगापूर या देशांबरोबर तीव्र स्पर्धा करावी लागणार.
- आंतरराष्ट्रीय प्रमाणिकरणाचा अभाव.
- आरोग्यविषयक पायाभूत सुविधांमध्ये अतिशय कमी गुंतवणूक.
- या क्षेत्रासाठी योग्य विमा धोरणाचा अभाव.
- मध्यस्थी करणारी व्यक्ती वैद्यकीय क्षेत्राविषयी अनभिज्ञ. तसेच रुग्णांचे व्यवस्थापन करण्यात पारंगत नाही, प्रशिक्षित नाही. यामुळे बऱ्याचवेळा घोटाळ्याची परिस्थिती निर्माण होते.

**पुढे जाण्याचे मार्ग-**

- वैद्यकीय पर्यटनामध्ये आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाबरोबरच पर्यटन मंत्रालयाचाही सहभाग असतो. त्यामुळे या दोन्ही मंत्रालयांमध्ये समन्वय साधण्यासाठी सरकारला 'कृती दला'ची नियुक्ती करण्याची आवश्यकता आहे.
- त्रृटी आणि आव्हाने लक्षात घेवून त्यावर तोडगा काढण्यासाठी दोन्ही विभागांमध्ये समन्वयाची गरज.
- कृती दलाने या क्षेत्रातील अधिक संधींचा शोध घेवून त्याचा व्यवसाय वृद्धीच्या दृष्टीने कसा फायदा घेता येईल याविषयी कृती करणे.
- उत्तम रुग्णालयांची निवड करून परदेशी प्रवाशांना देण्यात येणाऱ्या सोयी, सुविधांचे प्रमाणिकरण करणे.
- या क्षेत्राच्या उज्ज्वल भवितव्याचा विचार करून रुग्णालयेसुद्धा


Yojana : Published in Hindi, English, Urdu, Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Punjabi, Bengali, Assamese & Oriya

Send your subscription by DD / MO in the name of Director, Publications Division, addresses to :

**Advertisement & Criculation Manager, Publications Division, East Block-IV, Level-VII, R.K. Puram, New Delhi 110 066. Tel. : 011-2610 0207, 011-2610 5590; Fax : 011-2617 5516**

**Subscriptions will arise also be accepted at our sales emporia:**

● Hall No.196, Old Secretariat, **Delhi-110054,** Ph.011-2389 0205 ● A-wing, Rajaji Bhavan, Besant Nagar, **Chennai-600090,** Ph.: 044-2491 7673 ● 8, Esplande East, **Kolkata - 700069,** Ph: 033-2248 8030 ● Bihar State Co-operative Bank Building, Ashoka Rajpath, Patna-800004. Ph.: 0612-268 3407 ● Press Road, Near Govt., Press **Thiruvananthapuram-695001,** Ph.: 0471-2330 650 ● Hall No. 1, 2nd floor, Kendriya Bhawan, Sector - H, Aliganj, **Lucknow-226024,** Ph.: 0522-232 5455 ● 701, C-Wing, 7th Floor, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, **Navi Mumbai-400614,** Ph.: 022 2757 0686 ● Block 4, 1st Floor, Gruhakalpa Complex, M.G. Road, Nampally, **Hyderabad - 500001.** Ph.: 040-2460 5383 ● 1st Floor, F-Wing, Kendriya Sadan, Koramangala **Bangalore-560034.** Ph.: 080-2553 7244 ● KKB Road, New Colony, House No.7, Chenikuthi, Guwahati-781003, Ph.: 0361-2665 090 ● Ambica Complex, 1st Floor, Paldi, **Ahmedabad - 380007.** Ph.: 079-2658 8669.

**For Yojana Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Bengali, Assamese, Oriya, Urdu and English, Hindi - please enrol yourself with Editors of the respective at the addressess given Below;**

Editor, Yojana (Marathi), B-701, Kendriaya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai-400614. Ph.: 022-2756 6582
Editor, Yojana (Gujarati), Ambika Complex, 1st Floor, Paldi, Ahemdabad-380007. Ph.: 079-2658 8669
Editor, Yojana (Assamese), KKB Road, New Colony, House No. 7, Chenikuthi, Guwahati-781003. Ph.: 0361-266 5090
Editor, Yojana (Bengali), 8, Esplanade East, Ground Floor, Kolkata-700069. Ph.: 033-2248 2576
Editor, Yojana (Tamil), 'A' Wing, Rajaji Bhawan, Basant Nagar, Chennai-600090. Ph: 044-2491 7673
Editor, Yoajna (Telugu), Block No. 4, 1st Flr., Gruhakalpa Complex, M.G.Rd, Nampally, Hyderabad-500001. Ph.:040-2460 5383
Editor, Yojana (Malayalam), Press Road, Near Govt. Press, Thiruvananthapuram-695001, Ph: 0471-233 0650
Editor, Yojana (Kannada), 1st Floor, 'F' Wing, Kendriya Sadan, Koramangala, Bangalore-560034, Ph: 080-2553 7244.

आंतरराष्ट्रीय दर्जानुसार आपल्या सेवेचे प्रमाणिककरण करू शकतात. रुग्णांना पारंपरिक आणि मूल्यवर्धित, अत्युच्च रुगालयीन सेवा देण्यासाठी प्रयत्न करणे.

- गृहदेशाशी उत्तम संपर्क व्यवस्था.
- वैद्यकीय पर्यटकांना भारतातील सुविधांची इत्यंभूत माहिती पुरविणे.
- भिन्न संस्कृतीतून रूग्ण येणार त्यामुळे निर्माण होणारे नाजूक प्रश्न हाताळणारे प्रशिक्षित कर्मचारी तयार करणे.

**निष्कर्ष-**

वैद्यकीय, आरोग्यसंबंधित पर्यटनही सर्वस्वी नवीन संकल्पना आहे, त्यामुळे देशाबरोबरच विदेशामध्ये तिचा जास्तीत जास्त प्रसार करण्याची गरज आहे. आजारामुळे त्रासलेले लोक आपल्या देशात होणारा प्रचंड खर्च वाचविण्यासाठी आपल्या देशात येतात. इथे त्यांना चांगले उपचार मिळाले आणि ते बरे होऊन मायदेशी परतले तर आपलाच फायदा होणार आहे. हे लक्षात घेऊन जास्त प्रवासी वैद्यकीय कारणासाठी आपल्या देशात आले पाहिजेत.

वैद्यकीय पर्यटनामुळे आपल्या परकीय चलनाच्या गंगाजळीमध्ये मोठ्या प्रमाणावर भर पडणार आहे. या सेवेला पुरक ठरणाऱ्या हॉटेल व्यवसायाचीही भरभराट होणार आहे. कोणताही रूग्ण पूर्णपणे बरा होऊन मायदेशी जाताना नक्कीच भारताची आठवण म्हणून इथल्या वस्तू खरेदी करून जाणार हे नक्की! यामुळे त्या पर्यटकाचा आपल्या अर्थव्यवस्थेला हातभार लागणार आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावरची रूग्णसेवा अतिशय कमी शुल्कात देण्याविषयी भारताने विशेष योजना आधीच तयार केल्या आहेत. वैश्विक दर्जाचा विचार करून व्यावसायिक दृष्टिकोन ठेवूनही युरोप किंवा अमेरिकेपेक्षाही किमान २५ टक्के कमी खर्चात भारतात चांगले उपचार होऊ शकतात. अलिकडच्या आकडेवारीनुसार भारतात ज्या रुग्णालयांमध्ये परदेशी नागरिकांवर उपचार केले जातात, त्याचे प्रमाण त्यांच्या एकूण रूग्णसंख्येपैकी १५ टक्के आहे. म्हणजे भारतातील रुग्णालयांमध्ये प्रतिवर्षी १५ टक्के परदेशी प्रवासी रुग्णांवर उपचार केले जातात. यातून कित्येक अब्ज डॉलर्सची वार्षिक उलाढाल होते.

अपोलो, फोर्टीस, मॅक्स, नारायण रुग्णालय, सेव्हन हिल्स, वॉकहार्डट्, वेदांता, बीएलके, पुष्पांजली क्रॉसले, विजया हॉस्पिटल्स, मणिपाल, मलया यासारख्या शृंखला रुग्णालयांमध्ये संपूर्ण जगभरातून उपचारासाठी रूग्ण येतात. जगात इतर कोणत्याही मोठ्या, आधुनिक रुग्णालयात मिळू शकेल, अशीच उत्तम सेवा परदेशी रुग्णांना या रुग्णालयांमधून मिळते.

भारतात वैद्यकीय पर्यटन झपाट्याने वाढत असूनही या क्षेत्रात असंघटीतपणा जास्त आहे. मध्यस्थांना वैद्यकीय क्षेत्राचे फारच तोकडे ज्ञान असल्यामुळे अनेक प्रश्न निर्माण होतात, घोटाळे होतात. रुग्णांना योग्य प्रकारे मार्गदर्शन, मदत मिळत नाही, माहिती व्यवस्थित पोचविली जात नाही. त्यामुळे रुग्णांच्या, त्यांच्या नातेवाईकांच्या मनात संभ्रम निर्माण होतात. उपचार घेऊन मायदेशी परत जाताना आलेल्या वाईट अनुभवामुळे भारताविषयी सकारात्मक भावना त्यांच्या मनात क्वचित निर्माण होते.

या नकारात्मक गोष्टी आपण टाळल्या तर हा उदयोन्मुख व्यवसाय खूप प्रचंड प्रमाणावर भरभराटीला लागल्याशिवाय राहणार नाही. नजीकच्या भविष्यात या व्यवसायामध्ये १०० अब्ज डॉलर्सची उलाढाल होईल, हे नक्की. या बरोबरच, सर्वात महत्वाचे म्हणजे, जगाच्या नकाशावर भारताची एक वेगळी नाममुद्रा उमटेल. वैद्यकीय क्षेत्रात भारताला प्रतिष्ठा मिळेल. भारताचे नाव आदराने घेतले जाईल.

(***डॉ. हरिहरन*** हे गेल्या ३४ वर्षापासुन वैद्यकीय व्यवसायात कार्यरत आहेत. ते ''सार्वजनिक आरोग्य'' चे सल्लागार असुन एफ ओ आर यु टी नॉर्वे आणि ग्लोबल अल्कोहोल पॉलिसी अलायन्स (जीएपीए) संयुक्त राष्ट्रसंघाच्या भारतीय मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत.)

# इ- पर्यटन व्हिसा- पर्यटनासाठी प्रवास आता आणखी सुखकर

**श्रीमती नानू भसीन व श्रीमती नवनीत कौर**




**जानेवारी - मार्च २०१५ दरम्यान ई व्हिसावर ७५,८५९ पर्यटक आले आधीच्या टीव्हीओए (मानवी पातळीवर आगमनानंतर व्हिसा) योजनेत जानेवारी-मार्च २०१४ दरम्यान केवळ ५८४१ पर्यटक आले होते. ही वाढ ११९८.७ टक्के आहे.ताज्या आकडेवारीनुसार १४ एप्रिल २०१५ अखेरीस १ लाख १० हजार व्हिसा इ-पर्यटक व्हिसा मोहिमेत देण्यात आले. आधीची टीव्हीओए पद्धत बारा देशांपुरतीच होती व आता इ-पर्यंटक मोहिमेत ४० देश आहेत त्यामुळे पर्यटकांची संख्या वाढली आहे. ज्या देशातून येणाऱ्या पर्यटकांची टक्केवारी वाढली आहे त्यात मार्च २०१५ च्या आकडेवारीनुसार अमेरिका (३३.२५ टक्के), जर्मनी (१४.६४ टक्के), रशिया महासंघ (१३.१३ टक्के), ऑस्ट्रेलिया (८.३७ टक्के), कोरिया प्रजासत्ताक (६.३९ टक्के), युक्रेन (४.२१ टक्के), मेक्सिको (२.९३ टक्के) जपान (१.९९ टक्के) आणि इतर छोटया देशांचा समावेश आहे.**

आजच्या काळात पर्यटन हा विरंगुळ्याचा, धार्मिक यात्रांचा, कौटुंबिक व औद्योगिक कारणांनी आपोआप होणाऱ्या प्रवासाचा विषय झाला आहे. पर्यटनासाठी मोकळा वेळ काढावा लागतो, पण त्यामुळे मनाचा शिणवटा निघून जातो व आपण पुन्हा एक नवी उर्जा घेऊन येतो. पर्यटन काहीवेळा खास ठरवून केलेले असते, काहीवेळा प्रवासानिमित्ताने ते घडून जाते. पर्यटन हा आंतरराष्ट्रीय प्रवासाचा विषय आहे पण देशांतर्गत प्रवासही पर्यटनात मोडतो. जागतिक पर्यटन संस्थेने पर्यटकांची व्याख्या ही, ''जे लोक नेहमीच्या वातावरणातून दुसरीकडे जाऊन विरंगुळा म्हणून, व्यवसायाचा भाग म्हणून किंवा इतर कारणांनी बराच काळ राहतात त्यांना पर्यटक म्हणतात'' अशी केली आहे.

पर्यटन ही जागतिक पातळीवर फावल्या वेळातील विरंगुळ्याची कृती आहे. पर्यटन हे देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय असे दोन्ही असते. आंतरराष्ट्रीय पर्यटन हे बाहेरून येणारे पर्यंटक व आपल्याकडून दुसऱ्या देशात जाणारे पर्यटक अशा दोन पातळ्यांवर असते.जे पर्यटक भारतात येतात त्यांच्यापासून आपल्याला परकीय चलन मिळत असते. त्यामुळे अनेक देशांसाठी पर्यटन हे उत्पन्नाचे साधन असते. आज बाहेरून येणारे पर्यटक हा स्थानिक अर्थव्यवस्था व जिथे पर्यटक नेहमी येतात तेथील रोजगार निर्मितीवर परिणाम करणारा घटक ठरला आहे.

भारत हा संपन्न सांस्कृतिक वारसा असलेला देश आहे व अनेक देशातील पर्यटकांना आकर्षित करणारा देश आहे. नैसर्गिक विविधतेत भारतामध्ये वाळवंट, समुद्र, जंगले, पर्वत, फुले, पशुपक्षी एकाच भौगोलिक सीमेत आपण बघू शकतो. जो कुणी भारताला भेट देतो त्याला येथील विविध राज्यातील पोशाख, खाद्यपदार्थ, संस्कृती, फुले, फळे, पशुपक्षी भुरळ घालतात. त्यामुळे भारत हा नेहमीच पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्र राहिला आहे. संस्कृती व संपन्न वारसा, परंपरा यांचे अनोखे मिश्रण भारतात पर्यटकांना अनुभवता येते. येथे येऊन गेलेले पर्यटक हे नंतर भारतीय संस्कृतीचे दूत बनतात व तो संदेश जगाला देतात.

भारत सरकारने पर्यटनाला उत्तेजन देण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या आहेत. पर्यटन स्थळे विकसित केली आहेत. पर्यटकांसाठी इ-व्हिसा योजना सुरू केली आहे.त्यामुळे परदेशी पर्यटकांना भारतात प्रवास करणे सोपे झाले आहे.

### इ-पर्यटक व्हिसा- पार्श्वभूमी

ही सगळी योजना पर्यटन उद्योगाने,

परदेशी पर्यटकांना भारतात येणे सोपे जावे व ''व्हिसा योजना'' खुली करावी या मागणीतून पुढे आली. त्यामुळे परदेशी पर्यटकांची संख्या वाढणार आहे. ''भारतात येताच व्हिसा'' अशी योजना सरकारने २०१० मध्ये मर्यादित पातळीवर सुरू केली होती ती आता व्यापक केली आहे. भारतात येताच व्हिसा याचा अर्थ परदेशी पर्यटक आल्यानंतर त्याला देशात फिरण्यासाठी व्हिसा लागतो तो ती व्यक्ती प्रत्यक्ष त्या देशात आल्यानंतरच मिळतो त्याला व्हिसा ऑन अरायव्हल असे म्हणतात. २०१० मध्ये फिनलंड, जपान, लक्झेमबर्ग, न्यूझीलंड व सिंगापूर या पाच देशांसाठी ही योजना होती. त्या पाच देशांचे पर्यटक आल्यानंतर त्यांना व्हिसा मिळत असे पण ती मानवी पातळीवर करून दिली जाणारी प्रक्रिया होती. नंतर ही योजना कंबोडिया, इंडोनेशिया, व्हिएतनाम, फिलीपीन्स, लाओस व म्यानमार यांच्यासाठी जानेवारी २०११ मध्ये विस्तारित करण्यात आली नंतर एप्रिल २०१४ मध्ये त्यात दक्षिण कोरियाचा समावेश करण्यात आला, तरीही व्हिसा प्रक्रिया खूप मर्यादित होती

तथापि नवीन सरकारने या योजनेचा विस्तार केला असून ती २७ नोव्हेंबर २०१४ पासून ४३ देशांसाठी विस्तारली आहे. जानेवारी २०१५ मध्ये त्यात गयाचाही समावेश करण्यात आला त्यामुळे एकूण ४४ देशांसाठी ''व्हिसा ऑन अरायव्हल'' सुविधा आता आहे. यात इलेक्ट्रॉनिक पद्धतीने प्रवास अधिकारपत्र म्हणजे ''इ- व्हिसा'' जारी केला जातो.

## इलेक्ट्रॉनिक प्रवास प्राधिकार- इ- पर्यटक व्हिसा

जास्त परदेशी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी नवीन सरकारने ''इ-पर्यटक व्हिसा'' (इटीए) पद्धत जारी केली आहे त्यामुळे पर्यटकाला भारतात येताच तातडीने ''इ-पर्यटक व्हिसा'' मिळतो पण त्याच्या मार्गदर्शक तत्वात मात्र बदल केलेले नाहीत. देशात येणाऱ्या पर्यटकांना सोयी सुविधा दिल्याशिवाय कुठल्याही देशाला पर्यटन व्यवसायाचा आर्थिक फायदा मिळत नाही. इलेक्ट्रॉनिक ट्रॅव्हल अथोरायझेशन म्हणजे (इ- प्रवास प्राधिकरण) हे येणाऱ्या पर्यटकांना लगेच व्हिसा देते. २७ नोव्हेंबर २०१४ रोजी ही योजना सुरू झाल्यानंतर तिचे नामकरण ''इ-टुरिस्ट व्हिसा'' (इ पर्यटन व्हिसा) असे करण्यात आले. किमान १५० देशांसाठी ही सेवा विस्तारित करण्याचा सरकारचा इरादा आहे. २०१५-१६ मध्ये त्यात १०६ देशांची भर पडणार आहे.

नवीन योजनेत भारतात छोट्या कालावधीचा प्रवास करणाऱ्या परदेशी व्यक्तीला प्रत्यक्ष भारतीय दूतावासात न जाताही ऑनलाईन शुल्क भरून व्हिसा मिळू शकेल, व्हिसा मंजूर झाल्यानंतर त्या व्यक्तीला भारतात प्रवास करण्याचा परवाना मिळेल, अर्थातच त्या परवान्याची म्हणजे व्हिसाची प्रत त्या पर्यटकाकडे असेल. भारतात आल्यानंतर पर्यटक ते अधिकार पत्र स्थलांतर अधिकाऱ्यांना दाखवतील व त्यांच्याकडून त्या व्हिसा कागदपत्रावर शिक्का घेईल. सध्या व्हिसा ऑन अरायव्हल हा एक महिना चालतो व एका व्यक्तीला एकच व्हिसा मिळतो, तो वाढवता येत नाही.

आंतरराष्ट्रीय पर्यटकांना भारतातील पर्यटन स्थळे बघायची असतील तर त्यांना इ-पर्यटक व्हिसा मिळतो, मित्रांना किंवा नातेवाईकांना भेटण्यासाठी, व्यवसायाच्या निमित्ताने, वैद्यकीय उपचारांसाठी हा व्हिसा दिला जातो पण राजनैतिक व अधिकृत पासपोर्टधारक व्यक्तींना तो लागू नाही. नवीन पद्धत ही डिजिटलायझेशनवर आधारित असून सोपी व सुलभ आहे, त्यामुळे सर्व अडथळे दूर झाले आहेत.

## पर्यटक व्हिसाला वाव-

स्थलांतर विभागाने नऊ विमानतळांवर ७२ केंद्रे इ-पर्यटक व्हिसा देण्यासाठी उघडली आहेत त्यात दिल्ली, मुंबई, चेन्नई, कोलकाता, हैदराबाद, बंगळुरू, कोची, तिरूअनंतपुरम व गोवा यांचा समावेश आहे. सध्या नऊ विमानतळांवर इ-पर्यटक व्हिसा केंद्रे असली तरी भारतात आलेले परदेशी पर्यटक कुठल्याही अधिकृत स्थलांतर केंद्रातून त्यासाठी मंजुरी घेऊ शकतात. जानेवारी २०१५ पर्यंत इ-पर्यटक व्हिसा हा ४४ देशांसाठी उपलब्ध आहे त्यात ऑस्ट्रेलिया, ब्राझील, कंबोडिया, कुक आयलंडस (बेटे), दिगबौती, फिजी, फिनलंड, जर्मनी, गयाना, इंडोनेशिया, इस्रायल, जपान, जॉर्डन, केनिया, किरीबाटीस लाओस, लक्झेमबर्ग, मार्शल बेटे, मॉरिशस, मेक्सिको, मायक्रोनेशिया, म्यानमार. नाऊरू, न्यूझीलंड, निऊ बेटेस

नॉर्वे, ओमान , पलाऊ, पॅलेस्टाइन, पापुआ न्यूगिनी, फिलीपीन्स, कोरिया प्रजासत्ताक, रशिया, सिंगापूर, सोलोमन बेटे, थायलंड, टोंगा, तुवालूस संयुक्त अरब अमिरात,सामोआ, अमेरिका, युक्रेन, वानुटू, व्हिएटनाम यांचा समावेश आहे

प्रवासाची पूर्व परवानगी न घेता प्रवास करण्याची संधी बारा देशांच्या पर्यटकांना पूर्वी दिली होती त्यात जपान, सिंगापूर, फिलीपीन्स, फिनलंड, लक्झेमबर्ग, न्यूझीलंड, कंबोडिया, लाओस, व्हिएतनाम, म्यानमार, इंडोनेशिया व दक्षिण कोरिया यांचा समावेश होता, तो ई पर्यटक व्हिसा लागू केल्यानंतर आता २७ जानेवारी २०१५ पासून रद्द करण्यात आली आहे.

**ई-पर्यटक व्हिसा योजनेचे यश-** ई पर्यटक व्हिसा योजना लागू केल्यानंतर

## ई- पर्यटन व्हिसा २७ नोव्हेंबर २०१४ रोजी सुरू केला

**ई- पर्यटन व्हिसा व आगमनानंतर मानवी पातळीवर व्हिसा देणे यांची तुलना**

| वर्ष | जानेवारी | फेब्रुवारी | मार्च | जानेवारी ते मार्च |
|---|---|---|---|---|
| २०१४ आगमनानंतर व्हिसा (मानवी पातळीवर) | १,९०३ | १,९८० | १,९५८ | ५,८४१ |
| २०१५ इ-पर्यटक व्हिसा | २५,०२३ (१२१५%)* | २४,९८५ (११६२%)* | २५,८५१ (१२२०%)* | ७५,८५९ (११९९)* |

**स्त्रोत-** पर्यटन मंत्रालय भारत सरकार यांचा विपणन संशोधन विभाग

भारताने, ''आपल्याला पर्यटनात खरोखर नाविन्यपूर्ण काहीतरी करायचे आहे'' हा संदेश जगापर्यंत पोहोचवला, परदेशी पर्यटकांचा प्रवास सोपा केला व त्यामुळे बाराव्या पंचावार्षिक योजने अखेरीस आंतरराष्ट्रीय पातळीवरुन भारतात येणाऱ्या पर्यटकांच्या संस्थेत १ टक्का वाढ होईल. सध्या हा वाटा ०.६४ टक्के इतका कमी आहे

### आधीच्या वर्षाच्या तुलनेत टक्केवारीतील वाढ

आधीच्या पूर्वपरवानगी आवश्यक नसलेल्या पद्धतीतील संख्या.

वरील सारणीवरून हे लक्षात येते की, इ-पर्यटन व्हिसा चालू केल्यानंतर पर्यटकांच्या संख्येत वाढ झाली आहे. मार्च २०१५ मध्ये इ-पर्यटक व्हिसावर २५८५१ पर्यटक भारतात आले त्यातुलनेत गेल्यावर्षी मार्च २०१४ मध्ये टीव्हीओए(मानवी पातळीवर आगमनानंतर व्हिसा) योजनेत केवळ १९५८ पर्यटक आले होते. ही वाढ १२२०.३ टक्के आहे. फेब्रुवारी २०१५ मध्ये इ-पर्यंटन व्हिसावर २४९८५ पर्यटक आले. गेल्या वर्षी मध्ये टीव्हीओए(मानवी पातळीवर आगमनानंतर व्हिसा) योजनेत केवळ १९८० पर्यटक आले होते ही वाढ ११६१.९ टक्के आहे.

जानेवारी २०१५ दरम्यान इ व्हिसावर ७५८५९ पर्यटक आले आधीच्या टीव्हीओए(मानवी पातळीवर आगमनानंतर व्हिसा) योजनेत जानेवारी-मार्च २०१४ दरम्यान केवळ ५८४१ पर्यटक आले होते. ही वाढ ११९८.७ टक्के आहे.ताज्या आकडेवारीनुसार १४ एप्रिल २०१५ अखेरीस १ लाख १० हजार व्हिसा इ-पर्यटक व्हिसा मोहिमेत देण्यात आले. आधीची टीव्हीओए पद्धत बारा देशांपुरतीच होती व आता इ-पर्यंटक मोहिमेत ४० देश आहेत त्यामुळे पर्यटकांची संख्या वाढली आहे. ज्या देशातून येणाऱ्या पर्यटकांची टक्केवारी वाढली आहे त्यात मार्च २०१५ च्या आकडेवारीनुसार अमेरिका (३३.२५ टक्के), जर्मनी (१४.६४ टक्के), रशिया महासंघ (१३.१३ टक्के),ऑस्ट्रेलिया (८.३७ टक्के), कोरिया प्रजासत्ताक (६.३९ टक्के), युक्रेन (४.२१ टक्के), मेक्सिको (२.९३ टक्के) जपान (१.९९ टक्के) न्यूझीलंड (१.९१ टक्के) व इस्त्रायल (१.६८ टक्के) यांचा समावेश आहे. ज्या इ-पर्यटन व्हिसा केंद्रांवर मार्च २०१५ मध्ये पर्यटकांची नोंद झाली त्यात नवी दिल्ली ( ४७.३२

टक्के), मुंबई (१८.५५ टक्के), गोवा (१२.०३ टक्के), बेंगळरू (६.२७ टक्के), चेन्नई (५.६० टक्के), हैदराबाद (२.९३ टक्के), कोलकाता ( २.७८ टक्के) कोची २.६८ टक्के) व त्रिवेंद्रम (१.८४ टक्के) यांचा समावेश आहे.

## इ- पर्यटक व्हिसा संदर्भातील काही मुद्दे

इ-पर्यटक व्हिसा आता ४० पेक्षा अधिक देशांना प्राप्त होतो पण ही योजना काही देशांपुरतीच अंमलात आहे, त्यात चीन, इंग्लंड, स्पेन, इटली व मलेशिया यांचा समावेश करण्यात आलेला नाही पण ही योजना या देशांनाही लागू करायला पाहिजे.तसेच वाराणसी, गया, अहमदाबाद, जयपूर, तिरूचिरापल्ली या शहरातील विमानतळांचा समावेश त्यात करायला पाहिजे, त्यामुळे इतर ठिकाणचा पर्यटकांचा लोंढाही कमी होईल. त्यामुळे या नऊ विमानतळांवर इ-व्हिसा सुविधा लागू केली पाहिजे. याशिवाय विविध ठिकाणी पर्यटकांना येताच व्हिसा देण्याची केंद्रे सुरू केली पाहिजेत त्यामुळे शेजारी देशात येणारे पर्यटक आपल्याही देशाला भेट देऊ शकतील, बहुप्रवेश सुविधा दिल्यास पर्यटकांच्या संख्येत वाढ होईल. आंतरराष्ट्रीय पर्यटकांना बायोमेट्रिक यंत्राला सामोरे जाण्यात अडचणी असतात. आपल्या देशात जर दूरवरचा प्रवास करायचा असेल तर बायोमेट्रिक तपासणी आवश्यक असते त्यामुळे ऑनलाईन अर्जाचा हेतु साध्य होत नाही. मानवी पातळीवर पर्यटकाला भारतात येताच व्हिसा देण्याच्या व्हीओए पद्धत रद्द केल्यापासून पर्यटक म्हणतात की इ-व्हिसा ही पद्धतच मुळी नावाप्रमाणे सुविधा देणारी नाही. नवीन इ-व्हिसा पद्धतीत केवळ इ व्हिसाच मिळतो व्हिसा ऑन अरायव्हल खऱ्या अर्थाने मिळतच नाही कारण आधीच्या व्हिसा ऑन अरायव्हलपद्धतीसाठी पूर्वपरवानगीचे पत्र आवश्यक नव्हते.

**निष्कर्ष-** थोडक्यात इ- पर्यटक व्हिसा पद्धतीने पर्यटन उद्योगाची गेले वीस वर्ष सुरू असलेली व्हिसा व्यवस्था खुली करण्याची मागणी पूर्ण झाली आहे.. इटीए यादीत अमेरिका, जर्मनी, संयुक्त अरब अमिरात या आपल्या जवळपासच्या ४० टक्के देशांची भर पडली आहे. असे असले तरी इ-पर्यटक व्हिसा पर्यटक वाढवण्याचा एकमेव मार्ग नाही पण त्यामुळे पर्यटकांची संख्या वाढेल यातही शंका नाही. इ-पर्यटक व्हिसा भारताला एक आकर्षक पर्यटन केंद्र बनवल्याशिवाय राहणार नाही.

**संदर्भ-** मार्केट रीसर्च अँड स्टॅटिस्टिक्स डिव्हीजन ऑफ मिनिस्ट्री ऑफ टुरिझम, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया

पाथ ब्रेकिंग इनिशिएटिव्हज ऑफ गव्हर्नमेंट ऑफ इंडिया- मिनिस्ट्री ऑफ टुरिझम (बुकलेट फेब्रुवारी २०१५)

ऑफिशियल वेबसाईट ऑफ मिनिस्ट्री ऑफ टुरिझम, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया tourism.gov.in/

ऑनलाईन व्हिसा अप्लीकेशन साइट ऑफ गव्हर्नमेंट ऑफ इंडिया-https://indianvisaonline.gov.in

ऑफिशियल वेबसाईट ऑफ ब्युरो ऑफ इमिग्रेशन, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया : www.immigrationindia.nic.in/

प्रेस रिलीजेस ऑन ऑफिशियल वेबसाईट पब्लिक इनफॉर्मेशन ब्युरो- pib.nic.in

विकिपीडिया -: http://en.wikipedia.org/wiki/Tourism

*(नानु भसीन या पत्र सुचना कार्यालय नवी दिल्ली येथे संचालक असुन नवनीत कौर या उपसंचालक म्हणुन कार्यरत आहे. )*

***संपर्कासाठी ईमेल*** - pibcultour@gmail.com

**लेखकांना आवाहन**

योजना मासिकासाठी लेख पाठविताना लेखकांनी खाली नमूद केलेल्या फॉन्ट पैकी कोणत्याही एका फॉन्ट मध्येच आपले लेख पाठवावेत.

KRUTI DEV or APS or Mangal or DVTT or SHIVAJI or SHREE LIPI,

हे नम्र आवाहन.

# भारतातील पर्यावरण पर्यटन : वन्यजीव भितरकणिका अभयारण्याचे उदाहरण

- मधुमिता दास आणि बानी चॅटर्जी



**भितरकणिका पर्यावरण पर्यटन आणि विकास सोसायटी (बिईईएस) नुकतीच स्थापन करण्यात आली असून ज्यात स्थानिक आणि वन विभाग, संवर्धानासाठी काम करणाऱ्या अशा इतर सदस्यांचा समावेश आहे. सोसायटी अकुशलांना प्रशिक्षण देते ज्यामुळे त्यांना पर्यावरण पर्यटनाच्या कार्यामध्ये सहभागी करणे शक्य होते. सुधारीत पायासुविधांमुळे भेट देणाऱ्याच्या संख्येत वाढ झाली आहे आणि त्यामुळे स्थानिकांना त्यांच्याकडील उपलब्ध नैसर्गिक संपत्तीचा अभिमान निर्माण होण्यास मदत झाली आहे. घराच्या चार भिंतीच्या बंधनातुन स्त्रीया बाहेर येऊ शकल्या. अनेक आर्थिक गट तयार करण्यात आले आहेत. जरी सध्या हे गट मध्यम वा लघु उपक्रम राबवण्यास सक्षम नसले तरी ते सौदार्ह्य आणि एकत्र येण्यात यशस्वी झाले आहेत.**

## १. परिचय

पर्यटन हा विकासाला चालना देणारा महत्वाचा घटक असून त्यामुळे अनेक देशांच्या उत्पन्नात वृद्धी होते. तरीही टीकाकारांच्या मतानुसार पर्यटन विकास हा आत्मघातकी असून अगामी काळात त्यामुळे पर्यावरणाची हानी होणार हे निश्चित. वाढत्या पर्यटकांमुळे पर्यावरण आणि आयुष्य यांच्या दर्जावर परिणाम होतो. पर्यटन उद्योगाच्या शीघ्र विकासामुळे वाढते हरितगृह वायु उत्सर्जन, आवाजाची वाढती पातळी, हवेचा घसरता दर्जा, वाढते जलप्रदुषण, जैवविविधतेचा ऱ्हास, प्रवाळ बेटांचे नुकसान अशा वाढत्या पर्यावरण समस्यांना चालना मिळून निसर्गाचा ऱ्हास होतो. म्हणूनच, आंतरराष्ट्रीय निसर्ग संवर्धन संस्थेने १९९२ मध्ये संरक्षित स्थळांना धोका असणाऱ्या गोष्टींच्या यादीत पर्यटनाचा दुसऱ्या क्रमांकावर समावेश केला आहे. पर्यटनाबाबतच्या वाढत्या नकारात्मकतेमुळे अनेक लेखकांनी पर्यावरण उद्योगाने काळजी पुर्वक आणि शाश्वत वाढ साधावी अशी सूचना केली आहे.

रिओ२० च्या निश्पत्ती मसुद्यात ''द फ्युचर वुई वॉंट'' मध्ये शाश्वत पर्यटनावर भाष्य करुन पर्यटनाच्या घातक परिणामांतून बाहेर येण्यासाठी मार्ग सांगितला आहे. संयुक्त राष्ट्रांच्या व्याख्येनुसार शाश्वत पर्यटन म्हणजे ''जे पर्यटन सध्याच्या आणि भविष्यातील आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय परिणामांना लक्षात घेते आणि अभ्यांगत, उद्योग, पर्यावरण आणि रहिवासी समुदायाच्या गरजा लक्षात घेते.'' रहिवासी समुदायांना दीर्घकालीन आर्थिक प्रक्रीया, उत्पन्नाच्या संधी आणि सामाजिक सेवांद्वारे सर्वांना आर्थिक-सामाजिक फायद्यांचा व्यवस्थित लाभ मिळावा यासाठी असलेली तरतूद हे शाश्वत पर्यटनाचे एक महत्वाचे अंग आहे. त्यामुळे नैसर्गिक स्त्रोतांचे संवर्धन आणि दारीद्रय निवारण असे दुहेरी इप्सित साध्य होते.

पर्यावरण पर्यटन हे शाश्वत पर्यटनाचा एक प्रकार म्हणून पुढे आले आणि त्याची औपचारीक व्याख्या करण्याचे श्रेय हेक्टर सेबाल्लॉस लेसक्यरेन यांना दिले जाते जे त्यांनी १९८० मध्ये केले होते. त्यांच्या व्याख्येत ''पर्यावरण पर्यटन म्हणजे, नैसर्गिक स्त्रोत संवर्धन करतांना बऱ्याच अंशी बाधित नसलेल्या विविध देशातील भागांना पर्यावरण अभ्यासांतर्गत भेट देणे, ज्यात पर्यटकांचा नकारात्मक प्रभाव कमी असेल आणि ज्यात स्थानिकांना सामाजिक-आर्थिक सहभाग मिळू शकेल.'' आंतरराष्ट्रीय निसर्ग संवर्धन संस्थेने (आता जागतिक संवर्धन संस्था) मॉंट्रीआल येथे १९९६ मध्ये भरलेल्या पहिल्या जागतिक संवर्धन परिषदेत ही

व्याख्या अधिकृतरीत्या स्वीकारली आहे.

सध्या 'पर्यावरण पर्यटन' हा वेगाने वाढणारा बाजार असून जगातील सर्वात मोठा उद्योग आहे. स्टार्मर स्मिथ यांच्या अभ्यासात (२००४) असे दिसुन आले की, पारंपारीक पर्यटकांपेक्षा पर्यावरण पर्यटन पर्यटक हे तिपटीने वाढत आहेत. जागतीक सुट्यांचे अवलोकन केल्यास २०२४ पर्यंत ५% हिस्सा पर्यावरण पर्यटन काबीज करेल असे भाकीत या अभ्यासात केले आहे. ग्राहकांच्या बदलत्या सवयींमुळे या वेगळ्या बाजारपेठेचा विकास झाला आहे. पर्यटक हे पर्यावरणाच्या दृष्टीने सजग होत असून त्यांचा कल हरीत होत आहे. उदा. २०१२ मध्ये ''ब्ल्यु आणि ग्रिन टुमॉरो'' ने हाती घेतलेल्या सर्वेक्षणात ४७% प्रतिसादकांनी २०१३ मध्ये आम्ही मुख्य सुट्टीसाठी तात्विक किंवा पर्यावरणात्मक गोष्टींचा विचार करु असे सांगितले. भारतात, भीतरकणिका राष्ट्रीय उद्यानात २००८-०९ ते २०१२-१३ या काळात पर्यटकांच्या संख्येत ३७,०८० वरुन ४६, ९१७ एवढी वाढ झाली (माहिती पत्रक, खारफुटी वन विभाग (डब्ल्युएल), राजनगर, केंद्रपारा, ओरीसा). आंतरराराष्ट्रीय पर्यटनाच्या आगमनाचा ६.५% एवढा वार्षिक विस्तार होत आहे आणि यात सुद्धा पर्यावरण पर्यटन वेगाने वाढाणारी बाजरपेठ ठरुन ५% एवढ्या वार्षिक वेगाने वाढत आहे.

भारतासारख्या विकसनशील देशांसाठी आर्थिक विकास आणि संवर्धन साध्य करण्यासाठी पर्यावरण पर्यटन हा योग्य उद्योग आहे. नैसर्गिक स्त्रोतांनी समृद्ध असे विकसीत देश एकूण पर्यटकांच्या संख्येत नाट्यमय वाढ बघत आहेत. **जन पर्यटनाची परिणिती अनेकवेळा नैसर्गिक स्त्रोतांच्या विध्वंसात होते.** पर्यावरण पर्यटनाने जन पर्यटनाचे नकारात्मक परिणाम कमी होऊ शकतात आणि संवर्धनातही मदत मिळू शकते. तर दुसऱ्या बाजुला रोजगाराच्या संधी, उत्पन्न निर्मिती आणि शिक्षणाच्या संधी यांच्यावर सकारात्मक परिणाम होऊन त्याद्वारे विकासाला चालना मिळू शकेल.

## २. भारतातील पर्यावरण पर्यटन

भारताची ओळख ही 'नैसर्गिक सौंदर्याची खाण' अशी आहे. मॅक्स म्युलरने एकदा सुचित केले होते की ''जर निसर्ग देऊ शकत असेल अशा सामर्थ्य, समृद्धी आणि सौंदर्य लाभले आहे याची प्रचिती आणून देणारा देश शोधण्यासाठी जर जगभर बघितले तर मी भारताकडे बोट दाखविन.'' पर्यटन मंत्रालयाने १९९८ मधे विकसित केलेल्या पर्यावरण पर्यटन धोरण आणि नियमावलीचा आधार घेऊन पर्यावरण आणि वन मंत्रालयाने जून २०११ मध्ये संरक्षित क्षेत्रात पर्यटन कार्यक्रम राबविण्यासाठी राज्य सरकारांनी पर्यावरण पर्यटन धोरण तयार करण्यास सांगितले होते. भारत सरकारने १२ व्या पंचवार्षिक योजनेत (२०१२-१७) गरीबांसाठी पर्यटनाचे फायदे वाढवण्याचे लक्ष्य ठेवताना पर्यटनविषयक कृतींमधुन मिळालेले उत्पन्न संरक्षित क्षेत्राच्या व्यवस्थापनासाठी वापरले जावे यावर भर दिला आहे. सध्या भारतात १०० राष्ट्रीय उद्याने, ५१५ वन्यजीव अभयारण्ये, ४३ संवर्धन प्रकल्प आणि ४ समुदाय प्रकल्प असे ६६१ संरक्षित क्षेत्र विविध भौगोलीक भागात असून त्याचे प्रमाण देशाच्या एकूण क्षेत्रफळाच्या ५% आहे.

भारतातील पर्यावरण पर्यटनाच्या धोरणात रोजगाराच्या संधी आणि संवर्धन याचा मेळ घालण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्याचबरोबर स्थानिकांसाठी नैसर्गीक स्त्रोतांच्या शोषणाला पर्याय शोधण्याचा प्रयत्न यात करण्यात आला आहे. त्यांच्यासाठी रोजगाराच्या संधी निर्माण केल्या जातात. त्यांचा सहभाग भागधारक म्हणून असतो. या प्रकीयेत त्यांना त्यांच्या नैसर्गिक स्त्रोतांचा अभिमान वाटून ते संवर्धनात वाटा उचलतात. केरळ मधील पेरीयार व्याघ्र प्रकल्प हे याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. प्रकल्पात पर्यावरण पर्यटन लागू करतांना अनेक पर्यावरण विकास समित्या स्थापन करण्यात आल्या. राफ्टींग, ट्रेकींग, घोडे स्वारी, निसर्ग शिबिरे अशा संधींद्वारे स्थानिकांना अनोख्या आणि व्यवहार्य अशा रोजगाराच्या संधी देण्यात आल्या. या प्रकल्पाने ५,००० कुटूंबामधिल ४०,००० लोकांना याचा फायदा मिळाला आहे. रोजगाराच्या अशा पर्यायी संधींमुळे शिकारी, तस्कर हे आता वनांचे खरोखरचे संवर्धक ठरले आहेत. सुंदरबन व्याग्र प्रकल्प, पश्चिम बंगाल मध्येही पर्यावरण पर्यटनामुळे सहभागी

१- रिसर्च स्कॉलर, मानवशास्त्र आणि समाजशास्त्र विभाग, भारतीय तंत्रज्ञान संस्था, खरगपुर, भारत madhumita.das@hss.iitkgp.ernet.in
२- प्राध्यापक, Department of Humanities and Social Sciences, Indian Institute of Technology Kharagpur, India. Email: bani@hss.iitkgp.ernet.in
३- येथून मिळाले http://www.unep.org/greeneconomy/GreenEconomyandTrade
४- येथून http://www.planeta.com/ecotravel/weaving/hectorceballos.html १ एप्रिल, २०१५ रोजी मिळाले

लोकांना रोजगाराच्या चांगल्या संधी मिळू शकल्या आहेत. गुहा आणि घोष (२००७) यांच्या अभ्यासात केलेल्या दाव्यानुसार पर्यटनात सहभागी होणारे १९% लोक अन्नावर जास्त तर ३८% लोक अन्ना व्यतिरीक्त गोष्टीवर खर्च करतात. अशा प्रकारे पर्यटनात सहभागी होणाऱ्याच्या अशा वाढीव खर्चामुळे उत्पादनाच्या वेगळ्या पद्धतीना चालना मिळून त्या भागाच्या विकासाला चालना मिळू शकते.

पर्यावरण पर्यटन स्थानिक रहिवाशांच्या रहाणिमानाचा दर्जा सुधारताना आर्थिक आणि सामाजिक-राजकीय दृष्ट्या त्यांना सक्षम करतात आणि विविध संसस्कृती, मानवाधिकार यांच्याबाबत आदर ही वाढवतात. पर्यटन विकासातून सुधारीत पायाभूत सुविधा, आरोग्य सुविधा, जागृती आणि शिक्षण या बाबतीत अप्रत्यक्ष प्रोत्साहन मिळून संवर्धना बाबत सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होतो. सुंदरबन प्रकल्पात पर्यावरण पर्यटनाने वाढलेल्या उत्पन्नाचा वापर मुलांच्या शिक्षणासाठी केला गेला. ग्रेट हिमालयन राष्ट्रीय उद्यान हा सुद्धा भारतातील पर्यावरण पर्यटनाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. प्रकल्प क्षेत्र व्यवस्थापनाने केवळ संतुलित विकास समित्या संवर्धनासाठीच बनवल्या नाहीत तर संवर्धनाला पाठिंबा म्हणून दारीद्रय निवारणासाठी, महिला सबलीकरणासाठी, दुर्गम भागात पोहचण्यासाठी आणि रोजगाराच्या संधीं आणि संवर्धन यांचा मिलाप करण्यासाठी स्थापन करण्यात आल्या. गरीब घरातील महिला ज्या संवर्धित क्षेत्रातल्या नैसर्गिक स्त्रोतांवर अवलंबून होत्या त्यांना महिला बचत आणि पत गट स्थापन करायला प्रोत्साहन दिले गेले. आता हे गट त्यांच्या विविध उपक्रमातून मिळालेल्या उत्पन्नातील बचतीतून उद्योग करत आहेत. स्थानिक पातळीवरील सक्षम संस्था आणि रोजगाराभिमुख दृष्टीकोन अवलंबून डोंगराळ भागातील दुर्बलातील दुर्बल घटकाच्या सक्षमीकरणाची परिणिती सुक्ष्म नियोजन आणि निर्णय घेण्यात होऊन त्यांची वनांवरील अवलंबता कमी झाली आहे. याची परिणिती आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरण जे पर्यावरण टिकण्यासाठी आवश्यक आहे त्यात होऊन जैवविवीधिततेच्या यशस्वी संवर्धनात झाली आहे. (मिश्रा, बडोला आणि भारद्वाज, २००९).

परंतु अनेक पर्यावरण पर्यटन प्रकल्पांवर, संवर्धनाचे धोरण यशस्वी होण्यासाठी समोर ठेवण्यात आलेल्या ध्येयांना साध्य करण्यात अपयशी ठरल्यामुळे प्रचंड टीका झाली आहे. अनेक वेळा स्थानिक समुदायाचा रोजगार आणि संवर्धन यांच्यातला घनिष्ट संबंध दुर्लक्षित होऊन पर्यावरणा बाबतच्या ध्येयांना इतर ध्येयांपेक्षा प्राधान्य दिले जाते. अनेक बाबींमध्ये बंदुकीचा धाक आणि असंरक्षित करण्याच्या दृष्टीकोन वापरला जातो आणि स्थानिकांना सर्व माहितीपासुन दुर ठेवले जाते. यामुळे संरक्षित भाग आणि स्थानिकांमध्ये संघर्ष होतो. उदाहरण द्यायचे झाले तर केवलदेव राष्ट्रीय उद्यानात पर्यावरण पर्यटन काही जाट पुरुषांना रोजगार देऊ शकले. त्यामुळे बहुतेक समुदायांचा संवर्धनाला पाठींबा मिळू शकला नाही. राष्ट्रीय उद्यानांच्या निर्मितीसाठी जबरदस्तीने हुसकावण्यात येणे, संरक्षित भागात प्रवेश न मिळणे, असुरक्षित जमीन कार्यकाल, हिंस्त्र प्राण्यांमुळे पीके आणि पाळीव प्राण्यांना हानी पोहचवणे अशा प्रकारांमुळे समस्येत वाढ झाली आहे(बासु आणि चॅटर्जी,२०१५). जागतिक वारसा स्थान असलेल्या हिमालयातील नंदादेवी राष्ट्रीय उद्यानाबाबत मैखुरी, नौतियाल, राव आणि सक्सेना (२००१) यांच्या अंदाजानुसार अन्न पिके, फळ झाडे आणि मोहोळ यांना हिंस्त्र पशूंनी हानी पोहचवून प्रत्येक घरामागे अंदाजे प्रती वर्ष रु.१२८५, रु.११९५ आणि रु. १५६ चे नुकसान झाले, वन्य औषधी गोळा करुन वितरीत करण्यावर बंदी घालण्यात आल्यामुळे प्रती वर्ष रु.१५८७ आणि मुख्य क्षेत्रात पर्यटनाला बंदी घातल्यामुळे रु. ७९०४ एवढे नुकसान झाले. जरी प्रकल्प यंत्रणांनी हिंस्त्र प्राण्यांनी केलेल्या नुकसानासाठी नुकसान भरपाई जाहीर केली तरीही ती मृत्युमुखी पडलेल्या पशुधनाच्या एकूण बाजारमुल्याच्या स्थानिकांच्या अंदाजाच्या ५% ही नव्हती. जनता वनीकरणाच्या कामासाठी प्रकल्प यंत्रणाकडून मिळणारा रोजगार, पशूधनाच्या नुकसानीची मिळणारी भरपाई, आणि सौर उर्जा उपकरणांची उपलब्धता, लोकर आणि हातमाग यंत्रा बाबत समाधानी नव्हती. अंतत: अशा कृतींमुळे संवर्धनाबाबत स्थानीकांवर घातक दृष्टीकोन बिंबवला जातो.

### ३. भितरकणिका वन्यजीव अभयारण्य, ओरीसा, भारताचे उदाहरण

भितरकणिका वन्यजीव अभयारण्य (बिकेडब्ल्युएस) हे धोक्यात असलेल्या

खाऱ्या पाण्यातील मगरींसाठी प्रसिद्ध असून त्याचे स्थान पूर्व भारतातील ओरीसा राज्याच्या केंद्रापारा जिल्ह्यात आहे. या उद्यानाचा समावेश गिनीज बूक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये २३ फुटाच्या खाऱ्या पाण्यातील मगरींसाठी करण्यात आला जी जगातील सर्वात मोठी मगर ठरली. राष्ट्रीय उद्यानाची निर्मिती (भितरकणिका राष्ट्रीय उद्यान) १९९८ मध्ये भितरकणिका वन्यजीव अभयारण्य जे १९७५ साली स्थापन करण्यात आले त्याच्या मुख्य भागातुन करण्यात आली. सदर अभयारण्य ही भारतातील दुसरी सर्वात मोठी खारफुटीची यंत्रणा आहे. सदर उद्यान भितरकणिका खारफुटीच्या ६७२ चौ.कि.मी एवढ्या भागात असून सदर खारफुटीची दलदल ब्राम्हीणी, बैतारणी आणि धारणा नदीच्या त्रिभूज भागात आहे.

बिकेडब्ल्युएस बाबत सर्वंकश माहिती मिळावी यासाठी माहिती प्राथमिक सर्वेक्षण आणि खारफुटी वन विभाग (डब्ल्युएल),राजनगर, केंद्रापारा, ओडिसा, प्रधान मुख्य वन संवर्धक, भुवनेश्वर, ओरीसा अशा दुय्यम स्त्रोतांकडून मिळवण्यात आली आहे.

खारफुटी वन विभाग (डब्ल्युएल), राजनगर, केंद्रापारा, ओडिसा यांच्या माहितीपत्रकावरुन असे माहिती पडले की, अलिकडे उद्यानाला लाभलेल्या निसर्गदत्त सौंदर्यामुळे पर्यटकांच्या संख्येत वाढ झाली आहे. खालील तक्त्यात उद्यानात आलेले एकुण पर्यटक आणि त्यांच्या कडून वसुल झालेले एकुण उत्पन्न यांची माहिती दिली आहे:

**तक्ता १ : पर्यटकांची आवक आणि मिळालेले उत्पन्न**

| वर्ष | एकुण पर्यटक | | | मिळालेले उत्पन्न (भारतीय रुपयात) |
|---|---|---|---|---|
| | भारतीय | परदेशी | एकूण | |
| 2008-09 | 36,792 | 288 | 37,080 | 12,63,479 |
| 2009-10 | 45,178 | 249 | 45,427 | 11,19,696 |
| 2010-11 | 48,972 | 300 | 49, 272 | 15,86,383 |
| 2011-12 | 39,295 | 275 | 39,570 | 13,86,868 |
| 2012-13 | 46,714 | 203 | 46,917 | 15,48,989 |

एकूण पर्यटकांच्या संख्येत वाढ झाल्यामुळे स्थानिकांसाठी रोजगाराच्या वेगळ्या संधी निर्माण केल्या गेल्या. स्थानिकांना पर्यावरण पर्यटनात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहीत करण्याकरता प्रयत्न केले गेले जेणेकरुन नैसर्गिक स्त्रोतांवर त्यांची असलेली अवलंबता कमी होईल आणि ते पर्यावरण पर्यटन संवर्धनात सकारात्मकरीत्या सहभागी होऊ शकेल. वन विभागाच्या मदतीने गावकऱ्यांनी अनेक पर्यावरण विकास समित्या (इडीसी) स्थापन केल्या आहेत. भितरकणिका पर्यावरण पर्यटन आणि विकास सोसायटी (बिईईएस) नुकतीच स्थापन करण्यात आली असून ज्यात स्थानिक आणि वन विभाग, संवर्धानासाठी काम करणाऱ्या अशा इतर सदस्यांचा समावेश आहे. सोसायटी अकुशलांना प्रशिक्षण देते ज्यामुळे त्यांना पर्यावरण पर्यटनाच्या कार्यामध्ये सहभागी करणे शक्य होते. उद्यानांतर्गत आणि बाहेर उपलब्ध संधी पूढील तक्त्यात दिल्या आहेत:

येथून http://www.ukessays.com/essays/tourism/the-indian-tourism-industry-tourism-essay.php on १ एप्रिल २०१५ रोजी मिळाले.
येथून http://www.unep.org/greeneconomy/GreenEconomyandTrade रोजी १ एप्रिल २०१५ रोजी मिळाले
येथून http://www.ecoclub.com/library/epapers/13.pdf रोजी १ एप्रिल २०१५ रोजी मिळाले

**तक्ता २ : पर्यावरण पर्यटनात सहभागी होणार्यांसाठी कामाच्या संधी**

| उद्यानातील संधी | उद्यानाबाहेरील संधी |
|---|---|
| ▪ उद्यानातील रोजगाराद्वारे पगार (देखरेखी साठी, लागवडीसाठीचे मजदूर, बोट चालक) पर्यावरण विकासांतर्गत चालवलेले उपक्रम (आठवणी जागवणाऱ्या गोष्टींचे दुकान, उपहारगृह, लॉज)<br>▪ पर्यावरण मार्गदर्शकासारखे व्यावसाईक<br>▪ उद्यानाच्या बांधकामासाठी आणि इतर विकासाच्या कामांसाठी हंगामी कामगार. | ▪ लॉज, रेस्टॉरंट, परिवहन असे स्वत:चे उद्योग<br>▪ लॉज, रेस्टॉरंट, परिवहन यामधून रोजगाराद्वारे उदरनिर्वाह<br>▪ नर्सरी विकासातून रोजगार<br>▪ पार्कींग फी द्वारे रोजगार |

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार पर्यावरण पर्यटन चालु करण्यात आल्यावर एक महत्वाची घडलेली बाब म्हणजे परिवहन आणि संभाषणाच्या ऐक सुविधांची उपलब्धता होणे होय. राजनगर ते राष्ट्रीय उद्यानाला जोडणारा पक्का रस्ता प्रधानमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत बांधण्यात आला. अशा सुधारीत पायासुविधांमुळे भेट देणाऱ्याच्या संख्येत वाढ झाली आहे आणि त्यामुळे स्थानिकांना त्यांच्याकडील उपलब्ध नैसर्गिक संपत्तीचा अभिमान निर्माण होण्यास मदत झाली आहे. घराच्या चार भिंतीच्या बंधनातुन महिला बाहेर येऊ शकल्या आहेत. अनेक आर्थिक गट तयार करण्यात आले आहेत. जरी सध्या हे गट मध्यम वा लघु उपक्रम राबवण्यास सक्षम नसले तरी ते सौदार्ह्य आणि एकत्र येण्यात यशस्वी झाले आहेत. आरोग्य आणि शिक्षणाच्या बाबतीतसुद्धा थोडीफार सुधारणा आहे. शासनातर्फे चालवण्यात येणारी १०८ ही रुग्णवाहीका सेवा गरजुंच्या ठिकाणी सुधारीत सुविधांमुळे पोहचू शकते. गावातील मुले पावसाळ्यातसुद्धा शाळेत जाऊ शकतात जी कच्च्या रस्त्यांमुळे आधी समस्या होती. पण, उद्यानापासून दुर असलेल्या गाावांमध्ये मात्र स्थिती सुधारणे आवश्यक आहे.

आर्थिक-सामाजिक आणि सांस्कृतीक फायद्यांमुळे, बीकेडब्ल्युएस मध्ये इंधनासाठीचे लाकुड, खारफुटीची पाने, मध गोळा करणे इ. मध्ये घट दिसून आली आहे. या बरोबरच हिंस्त्र प्राण्यांच्या एकूण संख्येत सुद्धा वाढ झाली आहे. वनप्रजातींच्या जनगनेत धोक्यात असलेल्या खाऱ्या पाण्यातील मगरी ज्या २००२-०३ मध्ये १३०८ होत्या त्यांच्यात २००९-१० मध्ये १६१० एवढी वाढ झाली आहे. स्थानिकांच्या निरीक्षणानुसार ते चितल्स, रान अस्वल हे प्राणी नेहमी पाहू शकतात जे १० वर्षांपुर्वी दृष्य नव्हते. इंधनासाठीच्या लाकुड गोळा करण्यावर बंदी घालण्यात आल्यामुळे एकूण वनांच्या घनतेत वाढ झाल्याचेही त्यांना वाटते. बहुतेक स्थानिकांना पर्यावरण पर्यटनाविषयी सकारात्मक दृष्टीकोन निर्माण झाल्याचे जाणवते.

पर्यावरण पर्यटनानमूळे स्थानिकांच्या उत्पन्नात सकारात्मक वाढ झाली असली तरी सहभागी होणाऱ्या बरोबर विस्तारीत चर्चे दरम्यान असे लक्षात आले की, बीकेडब्ल्युएस मध्ये सहभागी असणारे बहुतांश हे रोजंदारीवर काम करणारे मजदूर आहेत. बोट व्यवसाय हा दुसऱ्या प्रकारात येतो तर उपहारगृह आणि डब्बा पोहचविण्याचा व्यवसाय तिसऱ्या प्रकारत येतो. अभयारण्यात काही रेस्टॉरंट असली तरी ती बिकेडब्ल्युएस मधील रहिवाश्याच्या मालकीची नाहीत. थोडेपार पर्यावरण मार्गदर्शक हे पर्यटकांच्या सर्वोच्च मागणीच्या काळात असतात. रोजंदारी कामगार मोठ्या प्रमाणावर असण्याचे कारण म्हणजे गावकऱ्यांमध्ये कमी शिक्षण अथवा शिक्षणाचा अभाव हे आहे. उपलब्ध कामाचे स्वरुप आणि शिक्षणाचा अभाव यांमुळे सहभागी पुरूषांच्या तुलनेत महिलांचे पर्यावरण पर्यटनाबाबतच्या कामां मध्ये सहभागी होण्याचे प्रमाण तसे

कमी आहे. बहुतेक महिला उद्यानात हंगामी कामगार म्हणून काम करतात. पर्यावरण पर्यटनात सहभागी होणाऱ्यांच्या उत्पन्न मिळकतीत सुद्धा मोठ्या प्रमाणावर तफावत आहे. पर्यटनाचे आयोजन करणारे मोठ्या प्रमाणावर नफा कमवतात आणि त्यांच्यानंतर हॉटेल मालक, रेस्टॉरंट मालक आणि बोट चालवणारे यांचा क्रमांक लागतो. उद्यानातील रोजंदारी कामगार हे मोठ्या प्रमाणावर हंगामी स्वरुपाचे असतात जे बाजारातील दरापेक्षा कमी दराने पगार घेतात. कमी पगारामुळे आपले रहाणीमान उंचावलेले नाही हे बहुतांश लोक मान्य करतात. म्हणूनच इंधनासाठीचे लाकूड, मध, चारा जंगलातून जमवणे, नद्यांमधे मासेमारी, नद्यांच्या काठी कोळंबीची लागवड करणे अशा नैसर्गिक स्त्रोतांवर स्थानिकांची अवलंबिता आहे. चुकीच्या व्यवस्थापन सवयींमुळे पर्यावरण मार्गदर्शक हे सगळ्यात खराब कर्मचारी आहेत आणि काही बाबतीत बोट मालकांची मक्तेदारी ही एक समस्या आहे. काही बाबतीत पर्यटकांच्या बरोबरच्या संभाषणात असे समोर आले की पर्यावरण मार्गदर्शक हे काही खास सक्षम नाहीत आणि त्यामुळे त्यांच्यासाठी अतिरिक्त खर्च करण्यात काही अर्थ रहात नाही. सगळ्यात मोठी समस्या म्हणजे पर्यटन ऑक्टोबर ते फेब्रुवारी या चार महिन्यात केंद्रीत असल्यामुळे स्थानिक मुबलक प्रमाणात आणि सातत्याने कमावण्यात यशस्वी होत नाहीत. बीकेडब्ल्युएस मधिल पर्यावरण पर्यटनाचा नकळत परिणाम पुढील दोन कारणांसाठी कमी प्रभावी आहे १) स्थानिक उपक्रमांच्या उपलब्धतेचा अभाव २) वस्तु आणि सेवांची आयात

पर्यावरण पर्यटनाने हिंस्त्र प्राण्यांमुळे मानवी पशुधन संपत्तीचे आणि पिकांचे नुकसान होणे, इंधन सामुग्रीचा अभाव अशा काही समस्यांना स्थानिकांना सामोरे जावे लागते. अनेक बाबतीत प्रकीया किचकट असल्यामुळे नुकसान भरपाई ही दिली जात नाही. गावकऱ्यांच्या म्हणण्यानुसार" नव्या आयुष्यापेक्षा सरकारला हिंस्त्र पशु जास्त प्रिय आहेत. प्रशिक्षित मानवी स्त्रोत आणि वन विभागाच्या लालफितीच्या कारभारामुळे समुदाय सहभागाला रचनात्मक मर्यादा आल्या आहेत.

बिकेडब्ल्युएस मधे पर्यावरण पर्यटन यशस्वी होण्यासाठ स्त्रोत, समुदाय पर्यटक या तीन भागधारकांचे योग्य व्यवस्थापन आवश्यक आहे. स्थानिकांचा संवर्धनाच्या प्रकीयेत सहभाग व्हावा यासाठी मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्याची गरज असून त्यामुळे स्थानिक लोकांमध्ये जागृती वाढून त्यांना अशा धोरणांमध्ये रस वाटेल आणि ते पर्यटकांना संवर्धना बाबात शिक्षण देताना स्वत:ला भागधारक मानतील ज्यामुळे अशा धोरणांना यश मिळेल. एकदा की स्थानिकांना त्यांच्या नैसर्गिक स्त्रोतांचे महत्व कळले की, ते संवर्धनात सहाय्य करतील. संस्थात्मक अपयश आणि भ्रष्टाचारातून बाहेर येण्यासाठी सरकारने पावले उचलणे आवश्यक आहे. संवर्धन पुन्हा अंमलात आणण्यासाठी आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणात्मक पातळीवर स्थळांकडे योग्य लक्ष ठेऊन, व्यवस्थापन आणि मूल्यमापनाबाबत सकारात्मक पावले उचलणे आवश्यक आहे.

## निष्कर्ष

या अंमलबजावणीत जरी काही कमतरता असल्या तरी पर्यावरण पर्यटना बाबत खूप अपेक्षा आहेत. एकदा की नैसर्गिक स्त्रोतांचे संवर्धन आणि मानव कल्याणात सुधारणा यांच्यात चांगले सुसुत्रीकरण झाले की पर्यावरण पर्यटनाचे धोरण यशस्वी होऊ शकेल. धोरणातल्या कमतरतांवर संवर्धनाबाबत जनजागृती सहीत स्थानिक लोकांचा सहभाग, स्थानिकांचे आणि पर्यटकांचे लोक शिक्षण याद्वारे मात करता येते ज्यामुळे स्थानिक लोक आणि नैसर्गिक स्त्रोतांबाबत महत्वाची स्थिती असेल.

## संदर्भ :


दास, एम आणि चॅटर्जी, बी (२०१५) इकोटुरीझम अ पनासिआ ऑर प्रेडीसंटमेंट ? टुरीझम मॅनेजमेंट पर्स्पेक्टीव, १४, ३-१६

दास, एस (२०११), इकोटुरीझम, सस्टेनेबल डेव्हलपमेंट एँड द इंडीयन स्टेट, इपीडब्ल्यु, XLVI, (३७), सप्टेंबर १०

गुहा, आय, & घोष, एस (२००७), डझ टुरीझम काँट्रीब्युट टू लोकल लाइव्हलीहूड ? अ केस स्टडी ऑफ टुरीझम, पॉव्हर्टी एँड कंझर्वेशन इन द इंडीयन, सुंदरबन्स, संडी वर्कींग पेपर न. No. २६, ISSN १८९३-१८९१.

माहिती पत्रक, खारफुटी वन विभाग (डब्ल्युएल), राजनगर, केंद्रपारा, ओरीसा

मैखुरी, आर.के. नौतियाल स.,

राव के.एस, आणि सक्सेना, के.जी. (२०११). कंझरवेशन पॉलिसी पिपल कॉंफ्लिक्ट्स:अ केस स्टडी फ्रॉम नंदा देवी बायोस्फीयर रिझर्व, अ वर्ल्ड हेरीटेज साइट, इंडीया. फॉरेस्ट पॉलिसी एँड इकॉनॉमिक, २, ३५५,३६५

मिश्रा, बी, के, बडोला आर., भारद्वाज, ए.के. (२००९), सोशल इश्युज एँड कंसर्न्स इन बायोडायवर्सिटी कंझरवेशन: एक्सपिरीयन्स फ्रॉम वाईल्डलाईफ प्रोटेक्टेड एरीआज इन इंडीया. ट्रॉपिकल इकॉलॉजी ५०, १४७-१६१

स्टार्मेर-स्मिथ, सी (२००४०, इकोफ्रेंडली टुरीझम ऑन द राईज डेली टेलीग्राफ ट्रॅव्हल,६, नोव्हेंबर ६

शार्पले, आर. (२००६). इकोटुरीझम: अ कंझम्शन पर्स्पेक्टीव्ह. जर्नल ऑफ इकोटुरीझम, ५ (१-२), ७-२२

**वेब संदर्भ:**

http://www.ecoclub.com/library/epapers/13.pdf

http://www.planeta.com/ecotravel/weaving/hectorceballos.html

http://www.unep.org/greeneconomy/GreenEconomyandTrade

http://www.ukessays.com/essays/tourism/the-indian-tourism-industry-tourism-essay.php

https://www.scribd.com/doc/88158031/1/Eco-Tourism-Evolution-in-Protected-Areas

*(**मधुमिता दास** आणि **बानी चॅटर्जी** या मानवशास्त्र आणि समाजशास्त्र विभाग, भारतीय तंत्रज्ञान संस्था, खरगपुर येथे प्राध्यापक म्हणुन कार्यरत आहेत.)*

**संपर्कासाठी ईमेल** - madhumita.das@hss.iitkgp.ernet.in

## प्रकाशन विभागाची नवी पुस्तके

१. **व्हर्ल्ड ऑफ थिन फिल्म कोटिंग्स (इंग्रजी)**
₹ ९०/-

२. **तिलक का मुकदमा (हिंदी)**
₹ ३३५/-

३. **राजभाषा (हिंदी)**
₹ १००/-

१. **एक देश एक ह्दय (हिंदी)**

२. **उपभोक्ता संरक्षण (हिंदी)**


३. **पऱ्यावरण संरक्षण : चुनौतिया और समाधान**

## आगामी अंक

**जुन २०१५**
**'पर्यायी (पुरक) औषधे'**
**या विषयावर असेल.**

# पर्यटन व्यवसाय क्षेत्र : महिला उद्योजकता स्वप्नपूर्तीसाठी पर्यटन व्यवसाय एक नामी संधी

- डॉ.अंजली रामचंद्र कदम -नारायणे




**पर्यटनाच्या वाढत्या महत्वाबरोबरच पर्यटन व्यवसायाकडे, मुख्यतः महिलांचा मोठया प्रमाणावर पर्यटन हा व्यवसाय स्विकारण्याचा दर इतर महिलांना प्रेरणादायी ठरत आहे. प्रत्येक क्षेत्राचा विकास हा त्या क्षेत्रातील तज्ञांच्या अभ्यास, संशोधन, उपाय आणि कृती कार्यक्रम या टप्यातुन जात असतो. 'पर्यटन' हा व्यवसाय म्हणुन पत्करल्यानंतर त्यासाठी लागणाऱ्या खेळत्या भांडवलापासुन ते मनुष्य बळ आणि पर्यटन स्थळांपासुन ते प्रवास माध्यमांचा व्यवस्थापना पर्यंतच्या सर्व बाबींचा समावेश होतो. व्यावसायिक पदवीची आवश्यकता वैगरे सर्व गोष्टींचा अंर्तभाव यालेखामध्ये केला आहे.**

**प्रस्तावना :**

१९९० च्या दशकात आर्थिक उदारीकरणाचे,जागतिकीकरणाचे आणि खाजगीकरणाचे युग आल्यापासुन आर्थिक क्षेत्रात प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष असे अनेक अमुलाग्र बदल होत आहेत. हया बदलाचा परिणाम आपल्या समाजजीवनावर होत आहे. महिलांना मिळत असलेल्या शिक्षणाच्या संधी आणि त्यांचा आर्थिक कार्यातील वाढत्या सहभागामुळे कुटुंबसंस्थेचे स्वरूपही बदलत चालले आहे. आज 'हम दो हमारे दो' पासून 'हम दो हमारा एक' अशा कुटुंब व्यवस्थेचा कल वाढत चाललेला आहे. अनेक कुटुंबातील दुहेरी उत्पन्नामुळे आणि दोघेही नोकरी व्यवसायात असल्याने कुंटूबातील इतर सदस्यांना वेळ देता येत नाही मुख्य म्हणजे अशावेळी कुटुंबाला वेळ देण्यासाठी भटकंती म्हणजेच पर्यटनाचा अवलंब केला जात आहे. अशा कुटुंबांना नवीन क्षितीजाची प्रलोभने खुणावीत आहेत. याबरोबरच अर्थव्यवस्थेतील व्यवसाय व तांत्रिक व्यापारात होत असलेली वृध्दी, लोकांच्या उत्पन्नातील वाढ, वैद्यकिय सेवा आणि शैक्षणिक सेवा प्राप्त करण्यासाठी देशांतर्गत आणि बाहय देशातील आवश्यक असणारी पर्यटन सेवा, विशेष म्हणजे क्रीडा क्षेत्रातील विविध स्पर्धेचे आयोजन, तज्ञांना परिषदांत सहभागी होण्यासाठी, आणि लोकांमध्ये वाढत चाललेला ताण हलका करण्यासाठी आवश्यक असलेल्या वेळे साठीही सुट्टीचे पर्यटन, मित्र/मैत्रिण नातेवाईक समारंभाच्या भेटीप्रीत्यर्थ आवश्यक असणारे पर्यटन, ऐतिहासिक, भौगोलिक, सांस्कृतिक पर्यटन, साहसी पर्यटन अशा नानाविध कारणांसाठी पर्यटन क्षेत्राची मागणी दिवसेन् दिवस वाढतच चालली आहे.

भारताला लाभलेला सात हजार पाचशे सतरा किमी. लांबीचा सागर किनारा, काश्मिर ते कन्याकुमारीपर्यंत निसर्गाने संपन्न असलेल्या आपल्या देशात अगणित अशी प्रचंड पर्यटन स्थळे उपलब्ध आहेत आणि आंतरराष्ट्रीय विमानतळे, आर्थिक संरचना इ. चा विकास होत असल्यामुळे तसेच मुख्यत्वे करून भारताचा इतिहास आणि संस्कृति यांमुळे बाहय पर्यटकांचा भारताकडे येण्याचा ओघ वाढतच चाललेला दिसून येत आहे. महाराष्ट्राच्या संदर्भात औद्योगिक विकासा द्वारे औद्योगिक पर्यटन ही बाब अत्यंत महत्त्वाची ठरली असले तरीही येथील ऐतिहासिक वारसा असलेल्या किल्यांची भव्यता, धार्मिक् स्थळे, रम्य समुद्र किनारे, देऊळे, प्राचीन आणि आधुनिक वास्तुशिल्प, वेरूळ, अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने, जंगले, पर्वतरांगा, येथील संस्कृतीचे दर्शन आणि स्वादिष्ट भोजन अशा नानाविध संपन्नतेमुळे परदेशी पर्यटक आकर्षित होतात. सन २०१३ मध्ये महाराष्ट्रात ४१ लाख ५६ हजार ३४३ परदेशी पर्यटकांनी हजेरी लावली होती. सन २०१२ च्या तुलनेत १०.५४ टक्यांनी तर परदेशी

पर्यटन तब्बल ५६.८३ टक्यांनी वाढले आहे. पर्यटन क्षेत्रात होणारी वृध्दी ही उत्तम आणि प्रेरणादायी आहे. (वल्सला नायर, पर्यटन सचिव, महाराष्ट्र राज्य). परकीय पर्यटकांच्या आगमनाने देशाला परकीय चलन प्राप्ती, महसूल प्राप्ती तर होतेच, पण मुख्यत्वेकरून पर्यटन व्यवसायात रोजगाराच्या संधीत वाढ होते. जागतिक वाहतूक आणि पर्यटन परिषदेच्या निष्कर्षनुसार भारतीय अर्थव्यवस्थेत पर्यटन क्षेत्राचे महत्त्व वाढत आहे. सन २०१२ मध्ये एकूण स्थूल उत्पन्नाच्या ६.६ टक्के उत्पन्न हे पर्यटन क्षेत्रातील होते. एकूण रोजगारापैकी ३९.५ दशलक्ष रोजगार म्हणजे ७.७ टक्के रोजगार हे पर्यटन क्षेत्रातील आहे. सन २०१३ पासून ते २०२३ या कालावधीत वार्षीक सरासरी दर वाढ ७.९ टक्के इतकी असण्याची शक्यता वर्तविली आहे. पर्यटन क्षेत्राचे महत्त्व नव्या सरकारने लक्षात घेऊन यानुसार या क्षेत्रात अनेक महत्त्वाचे अनुकूल बदल केले आहेत.

**पर्यटन क्षेत्राची व्याप्ती :-**

पुणे-मुंबई एअरपोर्ट कार सेवा, पासपोर्ट नोंदणी व नुतनीकरण आणि व्हीसाचे मार्गदर्शन, परकीय चलन परीवर्तन मदतनीस, यात्रांच्या नियोजनाबाबातचा सल्ला, यात्राचे बुकिंग, देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय सहल बुंकींग, कुटुबांच्या गरजानुसार सहलींचे पॅकेज, हॉटेलचे बुकिंग, साईट सिनचे बुकींग, रेल्वे, बस, विमान, जहाज सेवा, इ अनेक आयाम या क्षेत्रात आहेत. तंत्रज्ञानाच्या युगामध्ये मोबाईल आणि इंटरनेटच्या माध्यमातून ग्राहकांना त्यांच्या वहातूक आणि पर्यटन क्षेत्रातील गरजांची पूर्तता अल्प कालावधीत पूर्ण करता येणे सहज शक्य असल्यामुळे भारताच्या ग्राहक वर्गाची मागणी पर्यटन व्यवसायाकडे प्रचंड वाढत आहे. गरज आहे ती सुरक्षित, विश्वासू आणि तत्पर सेवा देणाऱ्या पर्यटन व्यवसायिकांची..

महाराष्ट्रात पर्यटन क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या अनेक कंपन्या, महामंडळे कार्यरत आहेत. उदा. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मध्यप्रदेश टूरिझम, खाजगी कंपन्या जसे केसरी टुर्स, वीणा वर्ल्ड, थॉमस कुक, मर्क्युरी ट्रॅव्हल्स, एफससीएम ट्रॅव्हल्स सोल्युशन आणि प्लाईट शॉपए गुरूनाथ टॅव्हल्स, क्वेस्ट टूर्स, सॅन्ड्रीज टुर्स ऍण्ड ट्रॅव्हल्स कंपनी लिमिटेड, भाग्यश्री ट्रॅव्हल्स, पाषाणकर टूर्स, साठे टूर्स, सेडीज लिमोझीन, संस्कृती, यशोधन ट्रॅव्हल्स प्रा. लि.किंगस्टन ट्रॅव्हल्स, विहार ट्रॅव्हल्स, वायुदूत हॉलिडेज प्रा.लि, रघुकुल हॉलिडेज, पल्लवी ट्रॅव्हल कन्सल्टन्सी, मँगो हॉलीडेज, अमृतयात्रा, मिलीटरी टुरिझम, डीएसके ट्रॅव्हल सोल्यूशन, प्रणव टुर्स ऍण्ड ट्रॅव्हल्स, चौधरी ट्रॅव्हल्स, गिरीसागर, क्युओनी, सचिन ट्रॅव्हल्स, मिहीर टूरिझम, महिंद्रा क्लब, मॅजीक हॉलीडेज इ.आणि इतर अशा अनेक कंपन्या पर्यटकांना त्यांना हव्या असलेल्या सेवा पुरवण्यात तत्पर आहेत.

**पर्यटन क्षेत्रातील यशस्वी महिला उद्योजिका**

पर्यटन क्षेत्र हे पुरूष मक्तेदारी असलेले क्षेत्र तर मुळीच राहिलेले नाही. सदर क्षेत्रात महिलासुध्दा अग्रेसर आहेत. मुख्यत्वे करून महिलांनी चालवलेल्या पर्यटन कंपन्यामध्ये वीणा वर्ल्डच्या संस्थापक वीणा पाटील यांचा उल्लेख नक्कीच करावासा वाटतो. जिद्द, मेहनत, चिकाटी, नवनिर्मीतीच्या कल्पकता ध्यासातून अगदी अल्पावधीत पर्यटन क्षेत्रात आपला ठसा उमटविला आहे. याबरोबर केसरी टुर्स च्या संचालक झेलम चौबल आणि सहाय्यिका सुनिला पाटील सिग्नेचर हॉलीडेज च्या संगीता पाटील, सॅन्ड्रीज टुर्स ऍण्ड ट्रॅव्हल्स कंपनी लिमिटेडच्या संचालिका सौ. ज्योती पेंडसे, पल्लवी ट्रॅव्हल्सच्या सौ आशा पाटील , मीहीर टयुरिझम च्या सौ प्रतीभा कंरदीकर इ. आणि इतरही अनेक महिलांनी या क्षेत्रात एक यशस्वी उद्योजिका म्हणून आपला ठसा उमटविला आहे

**महिला कशा प्रकारे पर्यटन क्षेत्र हे व्यावसायिक क्षेत्र म्हणुन निवडू शकतात ?**

महिला उद्योजकांना स्वप्नपूर्तीसाठी पर्यटन व्यवसाय क्षेत्र ही एक नामी संधी असलेले क्षेत्र आहे. विविधांगी उपक्रम असलेले हे क्षेत्र महिलांना व्यवसायासाठी आकर्षित करीत आहे पर्यटनाची आवड असेल तर व्यवसाय म्हणुन सहज या क्षेत्रात पदार्पण करता येते.

यशस्वी उद्योजकता बनणण्यासाठी खास टीप्स

१) हे क्षेत्र १० ते ५ असे नोकरी सारखे विश्व बिलकुल नाही. तर सातही दिवस २४ तास कामाला वेळ देण्याची बांधीलकी ठेवायला लावणारे क्षेत्र आहे.

२) पंर्यटन विषयाला माहितीपूर्ण आणि सूक्ष्म अभ्यास आवश्यक आहे.

३) आपली संस्कृती ‘अथिती देवो भव’ असल्यामुळे उपभोक्ता देवासारखा आहे. त्याचे तक्ररीचे निवारण करून योग्य सेवा देणे महत्त्वाचे आहे. ख्याती टिकविता आली पाहिजे.

४) पर्यटन क्षेत्रात अनेक आयाम आहेत आपल्याला कोणत्या क्षेत्रात विशेषीकरण प्राप्त करायचे ते ठरविणे.

५) हा व्यवसाय टीम वर्क वर अवलंबुन आहे. नेतृत्व योग्य असावे.

६) पर्यटन क्षेत्रात मानसशास्त्रीय अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

७) सातत्यपूर्ण प्रयत्न याच बरोबर

मार्केटींगच्या कला आवश्यक आहे.

**भांडवलाची आवश्यकता**

इतर उद्योगांप्रमाने पर्यटन क्षेत्रात खूप मोठया प्रमाणावर भांडवलाची गरज भासत नाही. आजकाल जवळपास सर्वांकडेच मोबाईल, दूरध्वनी, कॉम्प्युटर, इंटरनेट असतोच. आवश्यक आहे ती फक्त थोडया भांडवलाचे, कारण बऱ्याचवेळा उपभोक्त्याकडून तिकीटाची रक्कम येण्याच्या पूर्वी त्याच्या विमान, जहाज, बस तिकीट खरेदी करण्यासाटी काही भांडवल स्वत:कडे असणे आवश्यक असते. शिवाय इतर खर्चासाठी कमित कमी दहा हजार ते दोन लाख इतक्या खेळत्या भांडवलाची आवश्यकता भासू शकते. आपण कोणत्या भागात आणि कोणत्या प्रकारात काम करणार आहोत यावर हे अवलंबून आहे. 'माऊथ पब्लीसीटी' हे या क्षेत्राचे गमक आहे. सुरवातीच्या काळात या व्यवसायात जम बसे पर्यंत आपल्या घरात किंवा बंगल्याच्या एखाद्या खोलीत हा व्यवसाय करता येतो. तसेच या क्षेत्रातील मूलभूत माहिती घेण्यासाठी एखादा सर्टीफिकेट कोर्स करावा किंवा ट्रॅव्हल कंपनीमधील कामाचा अनुभव घ्यावा. यामुळे सदर व्यवसायातील बारकावे कळून येतील.

**पर्यटन क्षेत्रात व्यवसाय करणाऱ्यांसाठी व्यावसायिक कोर्सची उपलब्धता.**

पर्यटन क्षेत्रात उतरायचे असेल तर या क्षेत्रातील मूलभूत ज्ञान अवश्यक असते.महिलांना या क्षेत्रात उतरायचे असल्यास एखाद्या ट्रॅव्हल ॲन्ड टूरिझम मॅनेजमेंटचा सर्टीफिकेट कोर्स करावा, की जेणेकरून हे कोर्स दोन ते तीन महिन्याचे असतात. त्याची फी सर्वसाधारणपणे दहा हजार पर्यंत असते. महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रात अशा प्रकारच्या सर्टीफिकेट कोर्सची सोय आहे. १०वी आणि १२वी व्होकेशनल कोर्सेस उपलब्ध आहेत. बॅचलर ऑफ सायन्स ही पदवी किंवा बॅंचलर ऑफ आर्टस् ही पदवी हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड टूरिझम स्टडीज् किंवा हॉस्पीटॅलिटी ॲन्ड टूरिझम स्टडीज् मध्ये प्राप्त करता येते. ट्रव्हल ॲन्ड टूरिझम, या क्षेत्रात पोस्ट ग्रॅज्युएट पदवीही प्राप्त करता येते. बॅंचलर ऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन, (हॉटेल ॲन्ड टूरिझम मॅनेजमेंट), आणि एम.बी.ए सुध्दा टूरिझम ॲन्ड हॉस्पीटॅलिटी मॅनेजमेंटमध्ये ही पदवी मिळू शकते. या क्षेत्रातील व्यवसायिक अभ्यासक्रम पुरविणाऱ्या अनेक संस्था आहेत. या संस्थाची यादी खाली दिली आहे. या संस्थाची गुगल सर्चला माहिती विचारल्यास विस्तृत माहिती आपणास प्राप्त होईल.

| पर्यटन व हॉटेल व्यवस्थापनाशी संबधीत असलेल्या कोर्सेसचा तपशील | |
|---|---|
| आर.एस.टी.एम. नागपूर युनिव्हर्सिटी, ट्रॅव्हल ॲन्ड टूरिझम डिपार्टमेंट | पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन ट्रॅव्हल ॲन्ड टूरिझम, एम.ए. इन ट्रॅव्हल ॲन्ड टूरिझम मॅनेजमेंट |
| आय.ए.टी.ए. (इन्टरनॅशलन एअर ट्रॅव्हल असोसिएशन) , | डिप्लोमा इन ट्रॅव्हल ॲन्ड टूरिझम कन्सलटंट, डिप्लोमा इन ट्रॅव्हल सेल्स ऑपरेटर, ट्रॅव्हल ॲन्ड टूरिझम प्रोफेशनल, बीएसपी इसोन्शियल फॉर ट्रॅव्हल एजंट (इ.लर्निग), फांडडेशन इन ट्रव्हल ॲन्ड टूरिझम फॉर द लीडरशिप ॲन्ड मॅनेजमेट ट्रनिंग प्रोग्रॅम, डिप्लोमा इन हॉस्पीटॅलिटी असे अनेक कोर्स आहेत. |
| महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र | सर्टीफिकेट कोर्स इन ट्रॅव्हल ॲन्ड टूरिझम मॅनेजमेंट |
| यशंवतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ ,नाशिक | १) बॅंचलर ऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन, (हॉटेल ॲन्ड टूरिझम मॅनेजमेंट) |
| | २) एम.बी.ए. ( ॲन्ड हॉ टूरिझम हॉस्पीटॅलिटी मॅनेजमेंट) |
| टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, गुलटेकडी, पुणे | १) बॅंचलर ऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन, ( हॉस्पीटॅलिटी ॲन्ड टूरिझम मॅनेजमेंट) |
| | २) बिझनेस मॅनेजमेंट, (ट्रॅव्हल ॲन्ड टूरिझम मॅनेजमेंट) |
| गव्हर्रमेंट पॉलीटेक्निक, ठाणे ,नागपूर | १) डिप्लोमा इन ट्रव्हल ॲन्ड टूरिझम मॅनेजमेंट |
| पद्मश्री डॉ. डी.वाय.पाटील युनिव्हर्सिटी डिपार्टमेंट ऑफ हॉस्पीटॅलिटी ॲन्ड टूरिझम स्टडिज, नवी मुंबई | १) बॅंचलर ऑफ सायन्स, ( हॉस्पीटॅलिटी ॲन्ड टूरिझम स्टडीज) |
| | २) डिप्लोमा इन हॉस्पीटॅलिटी ॲन्ड टूरिझम स्टडीज) |
| | ३) बी.एस.सी. अन हॉस्पीटॅलिटी ॲन्ड टूरिझम स्टडीज) |
| | ४) बी.एस.सी. इन हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड टूरिझम स्टडीज |
| | ५) एम.एस.सी. इन ( हॉस्पीटॅलिटी ॲन्ड टूरिझम स्टडीज) |

| | |
|---|---|
| नानीबेन नानावटी विमेन्स कॉलेज, फ्रॅन्कलिन इन्स्टिटयुट ऑफ एअर हॉस्टेस ट्रेनिंग , के.इ.एस.कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड कॉमर्स, गुरू नानक खालसा कॉलेज ऑफ आर्टस्‌ , सायन्स, ॲन्ड कॉमर्स, मुंबई कॉलेज ऑफ हॅाटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरींग टेक्नॉलॉजी, ॲव्हॅलोन ॲकॅडमी, सत्या कॉलेज, अन्जुमन कॉलेज ऑफ हॉटेल ॲन्ड टूरिझम मॅनेंजमेंट, एस.एन.डी.टी. विमेन्स युनिव्हर्सिटी, प्रेमलीला विठ्ठलदास पॉलीटेक्निक,एस.एन.डी.टी., क्युनी ॲकॅडमी ऑफ ट्रॅव्हल, IIFLY ॲव्हीएटर ट्रेनिंग सेंटर, मुंबई | १) सर्टीफिकेट कोर्स इन टॅव्हल ॲन्ड टूरिझम मॅनेजमेंट<br>२) सर्टीफिकेट कोर्स इन ॲव्हीएटर, हॉस्पीटॅलिटी ॲन्ड ट्रॅव्हल मॅनेजमेंट<br>३) डिप्लोमा इन ॲव्हीएटर, हॉस्पीटॅलिटी ॲन्ड ट्रॅव्हल मॅनेजमेंट |
| हेंरीटेज इन्स्टिटयुट ऑफ हॅाटेल ॲन्ड टूरिझम मॅनेजमेंट, मुंबई | १)बॅचलर ऑफ सायन्स, ( हॉटेल मॅनेजमेंट केटरींग टेक्नॉलॉजी ॲन्ड टूरिझम ) |
| चंगू काना ठाकूर आर्टय ,कॉमर्स ॲन्ड सायन्स कॉलेज, मुंबई | १) डिप्लोमा इन ट्रव्हल ॲन्ड टूरिझम मॅनेंजमेंट |
| केसरी टुर्स | सर्टीफिकेट कोर्स इन ट्रॅव्हल ॲन्ड टूरिझम |
| इगणु- इंदिरा गांधी नॅशनल ओपन युनिव्हर्सिटी, पुणे | बॅंचलर ऑफ टूरिझम स्टडीज |
| मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे | सर्टीफिकेट कोर्स इन ट्रॅव्हल ॲन्ड टूरिझम |
| जगन्नाथ राठी व्होकेशनल गायडन्स ट्रेनिंग इन्स्टिटयुट, पुणे | डिप्लोमा इन ट्रॅव्हल ॲन्ड टूरिझम |
| सुर्या दत्ता ग्रुप, पुणे | पोस्ट ग्रॅज्युइट डिप्लोमा इन ट्रॅव्हल ॲन्ड टूरिझम |
| सिल्व्हर ब्राईट इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट, पुणे | एम.बी.ए.- इन टूरिझम,ट्रॅव्हल ॲन्ड हॉस्पीटॅलिटी मॅनेंजमेंट |
| महाराष्ट्र कॉस्पोपॅलेटीन एज्युकेशन सोसायटी, पुणे | बी.एस.सी. इन हॅाटेल मॅनेजमेंट ॲन्ड टूरिझम स्टडीज |
| कोहिनूर आयएमआय स्कूल ऑफ हॉस्पीटॅलिटी मॅनेजमेंट, खंडाळा, कॉक्स ॲन्ड किंग्ज आणि SOTC & IATA, मिटकॉन कन्सलटन्सी ॲन्ड इंजिनिअर, पुणे फोरसाईट इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट ॲन्ड रिसर्च, पुणे तसेच या क्षेत्रातील ट्रेनिंग प्रोग्रॅम पुरवितात. इतरही अनेक संस्था आहेत. याची दखल घ्यावी. | |

**स्त्रोत :-** गुगल सर्च

## संदर्भ ग्रंथ सूची


| | |
|---|---|
| १ | Nelson Velvet<br>An Introduction to the geography of Tourism<br>Rawart Publications, New Delhi |
| २ | डॉ. करंदीकर वि. रा..<br>विदेश संचार आणि मुक्त चिंतन, स्नेहल प्रकाशन, पुणे. ३० |
| ३ | डॉ. जोशी प्रकाश,<br>रमणीय सागर किनारे, मैत्रेय प्रकाशन, मुंबई |
| ४ | डॉ. काडवेकर श्री. वि.<br>उद्योजकीय संस्कृती आणि महाराष्ट्र, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.३० |
| ५ | पाटील वीणा<br>प्रवास जगाचा---- जगण्याचा, अमेय प्रकाशन, पुणे-४ |
| ६ | सकाळ साप्ताहिक, ( २४ जानेवारी २०१५)<br>पर्यटक विशेषांक, सकाळ पेपर्स प्रा. लि, पुणे |
| ७ | डॉ. सुनिता शंकरराव शिंदे<br>पर्यटन भूगोल राजमुंद्रा ऑफसेट, औरंगाबाद. |



***(डॉ. अंजली रा. कदम - नारायणे** या एस. एन. डी. टी. कला व वाणिज्य महाविद्यालय, पुणे येथे अर्थशास्त्र विभागाच्या सहयोगी प्राध्यापिका आहेत.)*

***संपर्कासाठी ईमेल*** - aanjalikadam@gmail.com

# INSTITUTE OF CIVIL SERVICES

MPSC

राजपथ
अॅ । कॅ । ड । मी
MPSC ★ UPSC
Login to Excellence & Success

UPSC

**प्रा. मीता चौधरी**
(संस्थापक–संचालिका, राजपथ अॅकॅडमी, पुणे )

## IAS/IPS/IFS/ IRS/DC/Dy.SP/ ACP/ DDR/Dy.CEO/ACST

| MPSC राज्यसेवा परीक्षा | PSI/STI/ASST | UPSC बॅच |
|---|---|---|
| • एकत्रित बॅच – पूर्व +मुख्य + मुलाखत<br>• कालावधी – एक वर्ष<br>• विषय : GS, CSAT, मराठी, इंग्रजी , सामान्य अध्ययन पेपर १ ते ४<br>• बॅचचे माध्यम – मराठी तसेच इंग्रजी माध्यमाची बॅच उपलब्ध.<br>• बॅचेस सुरू : १० जून, २५ जून, १० जुलै, २५ जुलै , १० ऑगस्ट. | • एकत्रित बॅच – पूर्व + मुख्य + शारीरिक चाचणी + मुलाखत<br>• कालावधी – एक वर्ष<br>• विषय : अभ्यासक्रमानुसार मराठी, इंग्रजी, सामान्य अध्ययन<br>• बॅचचे माध्यम – मराठी<br>• बॅचेस सुरू : १० जून, २५ जून, १० जुलै, २५ जुलै , १० ऑगस्ट. | • एकत्रित बॅच– पूर्व +मुख्य + मुलाखत<br>• कालावधी – ११ महिने<br>• विषय – CSAT, सामान्य अध्ययन, निबंधलेखन<br>• वैकल्पिक विषय– भूगोल, राज्यशास्त्र, इतिहास<br>• माध्यम – मराठी व इंग्रजी<br>• बॅचेस सुरू: १० जून, १० जुलै, १० ऑगस्ट. |

## राजपथ अॅकॅडमीची वैशिष्ट्ये

१. प्रा. मीता चौधरी मॅडम यांची लेक्चर्स व प्रत्येक विद्यार्थ्यांशी सुसंवाद.
२. अनुभवी, तज्ज्ञ, तळमळीने शिकविणारे विषय प्राध्यापक.
३. दर्जेदार छापील व क्लासरूम नोट्स.
४. नियमित सराव परीक्षा.
५. विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकासासाठी विविध उपक्रमांचे आयोजन दोन भागात करणे.
६. विद्यार्थ्यांसाठी अभिरूप मुलाखतींच्या चर्चासत्राचे नियोजन.
७. विद्यार्थ्यांचे प्रगती पुस्तक व त्याचा पालकांना अहवाल.
८. गृहपाठासह शाळेच्या शिस्तीत विद्यार्थ्यांचा अभ्यास.
९. विविध दर्जेदार संदर्भ ग्रंथ व मासिकांचे परिपूर्ण वाचनालय.
१०. स्वच्छ, हवेशीर व शांत अभ्यासिका.

**PSI RESULT 2013**
**110+**
विद्यार्थी यशस्वी

'राजपथ अॅकॅडमी' प्रकाशनासाठी वितरक (डिस्ट्रीब्युटर्स) जिल्हयानुसार/ विभागानुसार नेमणे आहे.
इच्छुकांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**राज्यसेवा RESULT 2014**
**30+**
विद्यार्थी यशस्वी

राजपथ
अॅ । कॅ । ड । मी
MPSC ★ UPSC
Login to Excellence & Success

**राजपथ अॅकॅडमी**

मुख्य कार्यालय :
२६, आप्पा बळवंत चौक,
अनमोल पुस्तकालयासमोर, पुणे.

शाखा :
लोकमान्य टिळकभवन, बी–विंग दुसरा मजला,
५६८ नारायण पेठ, केसरीवाड्याजवळ, पुणे.

फोन नं. :
०२०–३२४२ २२२१,
०२०–३०२० ८८०३/८००७९०९१६०

www.rajpathacademy.com Email : info@rajpathacademy.com Joint with facebook - rajpath academy

**RNI No. MAHMAR/2009/32156**
Reg No. G/NMD/137/2013-15

Published Date : 12th May, 2015
Date of Posting : 12th May, 2015




Editor - **Bhavana Gokhale**
Printed and Published by **Dr. (Ms) Sadhana Rout,** Additional Director General (I/C), on behalf of Publication Division
and Printed at **Onlooker Press**, 16, Sassoon Dock, Mumbai - 400 005. Phone : 22183544/2939
Published at - B-701, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai - 400 614.